




# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

✦ अमरावती, मंगळवार ४ ऑगस्ट २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०







# राम मंदिर देणगी चोरीवरून संसदेत गदारोळ

## लोकसभेत SC मध्ये न्यायाधीशांची संख्या वाढवणारे विधेयक मंजूर,



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** राम मंदिराच्या देणगी चोरीच्या मुद्द्यावरून लोकसभेत विरोधी सदस्यांच्या सततच्या गदारोळामुळे सभागृहाचे कामकाज मंगळवारपर्यंत तहकूब करण्यात आले आहे. यापूर्वी लोकसभेने सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांची संख्या (CJI सह) ३४ वरून ३८ पर्यंत वाढवण्यासंबंधीचे विधेयक चर्चेविना मंजूर केले. प्रश्नकाळ सुरू होताच विरोधी खासदारांनी नीट पेपरफुटीच्या विरोधात आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवरील पोलीस कारवाई आणि राम मंदिराच्या देणगी चोरीच्या मुद्द्यावरून गदारोळ सुरू केला. यानंतर सभागृहाचे कामकाज दुपारी २ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आले. २ वाजता कामकाज सुरू होताच गदारोळ सुरू झाला. यावर सभागृहाचे कामकाज मंगळवारपर्यंत तहकूब करण्यात आले.

राज्यसभेचे कामकाजही गदारोळामुळे दुपारी २ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आले. दोन वाजल्यानंतर कामकाज सुरू झाले तरीही विरोधी सदस्य घोषणाबाजी करत होते. सभागृहात एमएसएमई विकास (सुधारणा) विधेयकावर प्रचंड गदारोळात चर्चा झाली. यानंतर आवाजी मतदानाने विधेयक मंजूर करण्यात आले. यानंतर सभागृहाचे कामकाज मंगळवारपर्यंत तहकूब करण्यात आले. विरोधकांनी विद्यार्थ्यांवरील पोलीस कारवाईच्या मुद्द्यावर गृहमंत्री अमित शहा यांनी सभागृहात येउन निवेदन करावे अशी मागणी करत घोषणाबाजी केली.

**विरोधी पक्षाचा प्रस्ताव फेटाळला-** लोकसभेत केंद्रीय कायदा मंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी सर्वोच्च न्यायालयात न्यायाधीशांची संख्या वाढवणारे विधेयक सादर केले. पीठासीन अधिकाऱ्यांनी सदस्यांना वैधानिक प्रस्तावावर बोलण्याची विनंती केली, परंतु घोषणाबाजी सुरू राहिल्याने विधेयक मतदानासाठी ठेवण्यात आले आणि नंतर ते मंजूर करण्यात आले. विरोधी पक्षाच्या सदस्यांनी अध्यादेश आणण्याविरोधात एक वैधानिक प्रस्ताव सादर केला होता, जो आवाजी मतदानाने फेटाळण्यात आला.

**पावसाळी अधिवेशनात दोन विधेयके मंजूर-** संसदेच्या सध्याच्या अधिवेशनात ८ विधेयके सूचीबद्ध करण्यात आली आहेत. यापैकी वंदे मातरम आणि सार्वजनिक परीक्षा (गैरव्यवहार प्रतिबंधक) विधेयक (पेपरफुटी) दोन्ही सभागृहांमध्ये मंजूर झाले आहेत. जन्म-मृत्यू नोंदणी (सुधारणा) विधेयक, सर्वोच्च न्यायालय (न्यायाधीशांची संख्या) सुधारणा विधेयक, आयकर (सुधारणा) विधेयक, एमएसएमई विकास (सुधारणा) विधेयक, परदेशी अंशदान (FCRA) सुधारणा विधेयक आणि विकसित भारत शिक्षण अधिष्ठान विधेयकाला संसदेची मंजुरी मिळणे बाकी आहे.

## राज्यसभेत MSME सुधारणा विधेयकाला मंजुरी

काँग्रेस खासदार राजीव शुक्ला यांनी सांगितले की, संसदेत सोमवारी राम मंदिराच्या देणग्यांचा मुद्दा पुन्हा उपस्थित केला जाईल. राम मंदिर ट्रस्टची जबाबदारी साधू-संतांकडे का सोपवली जात नाही आणि या ट्रस्टमध्ये विश्व हिंदू परिषदेच्या (VHP) सदस्यांचा➪(पान २ वर)



## संसद परिसरात प्रतिकात्मक देणगी चोरी आंदोलन सुरूच

***नवी दिल्ली*** *: राम मंदिरातील देणगी चोरीच्या प्रकरणावरून आज पुन्हा एकदा संसद परिसरात विरोधी पक्षांच्या नेत्यांनी जोरदार निदर्शने केली. यावेळी विरोधकांकडून एक प्रतिकात्मक दानपेटी ठेवण्यात आली होती, ज्यावर चंदा चोरी असे पोस्टर लावण्यात आले होते. समाजवादी पक्षाच्या खासदार जया बच्चन यांच्यासह अनेक विरोधी नेत्यांनी या दानपेटीत पैसे टाकून सरकारविरोधात निषेध नोंदवला आणि जोरदार घोषणाबाजी केली. या प्रकरणावरून समाजवादी पक्षाच्या* ➪(पान २ वर)

## आंदोलनांसाठी जंतरमंतर जागा अयोग्य

**नवी दिल्ली :** जंतरमंतर हे आंदोलनांसाठी योग्य ठिकाण राहिलेले नाही, असा दावा करणाऱ्या याचिकेवर सुनावणी करताना सर्वोच्च न्यायालयाने केंद्र



सरकारला नोटीस बजावली आहे. आंदोलनांमुळे वाहतूक व्यवस्था विस्कळीत होत असून रुग्णालयांसह अत्यावश्यक सेवांच्या पुरवठ्यावर परिणाम होत असल्याचा दावा याचिकेत करण्यात आला आहे. हे प्रकरण महत्त्वाचे असल्याचे नमूद करत सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या खंडपीठाने केंद्र सरकारकडून उत्तर मागवले. सुनावणीदरम्यान सरन्यायाधीश सूर्यकांत म्हणाले की, याचिकेत जंतरमंतर हे आंदोलनांसाठी आता योग्य ठिकाण राहिलेले नसल्याचे म्हटले आहे. आंदोलनांमुळे परिसरातील वाहतूक व्यवस्था प्रभावित होते, तसेच वैद्यकीय सेवांसह इतर अत्यावश्यक सेवांच्या पुरवठ्यातही अडथळे निर्माण होतात, असा युक्तिवाद याचिकेत करण्यात आला आहे. हे महत्त्वाचे प्रकरण असल्याचे आम्हाला वाटते असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले. यावेळी सरन्यायाधीशांनी सालिसिटर जनरल यांना या प्रकरणी केंद्र➪(पान २ वर)

## जॉब नहीं मिलेगा, तो सिंहासन हिलेगा

**नवी दिल्ली/ वृत्तसंस्था-** एकीकडे बिहारमध्ये प्रशांत किशोर यांनी भाजपला धक्का देत पोटनिवडणुकीत मोठा विजय मिळवला आहे. भाजपच्या राष्ट्रीय अध्यक्षांच्या होमग्राउंडवरच त्यांनी त्या पक्षाच्या उमेदवाराचा पराभव केला.



त्याचवेळी काँग्रेसचे नेते आणि लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांचे एक ट्वीट चांगलंच चर्चेत आले आहे. जॉब नहीं मिलेगा, तो सिंहासन हिलेगा, अशा आशयाचे ट्वीट राहुल गांधी यांनी केले आहे. नुकतंच झालेल्या दिल्लीतील जंतरमंतरवरील आंदोलनामुळे विद्यार्थ्यांची ताकद देशाला दिसून आली. आता त्याच विद्यार्थ्यांचे प्रश्न घेउन राहुल गांधीही मैदानात उतरले आहेत. येत्या ८ ऑगस्ट रोजी राहुल गांधी हे उत्तर प्रदेशातील प्रयागराज या ठिकाणी आंदोलन करणार आहेत. रोजगाराच्या मुद्द्यावर ते आंदोलन करणार असून या मध्ये तरुणांनी मोठया संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन त्यांनी केलं. त्याचवेळी जॉब नहीं मिलेगा, तो सिंहासन हिलेगा असा इशारा त्यांनी उत्तर प्रदेश सरकार आणि केंद्र सरकारला दिला आहे. राहुल गांधी यांनी त्यांच्या ➪(पान २ वर)

## घटनेतील दुरूस्त्यांबाबत कागदपत्रे सादर करावित

**मुंबई / प्रतिनिधी-**राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा सुनेत्रा पवार यांना केंद्रीय निवडणूक आयोगाने पत्र पाठवले असून, पक्षाच्या घटनेमधील दुरुस्त्यांसंदर्भातील आवश्यक कागदपत्रे आणि प्रस्ताव सादर करण्यास सांगितले



आहे. निवडणूक आयोगाने राष्ट्रवादी काँग्रेसच्या घटनेतील अनेक बदलांना समर्थन देणारी आवश्यक कागदपत्रे आणि प्रस्ताव सादर करण्यात आला नसल्याचा उल्लेख पत्रात केला आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर २६ फेब्रुवारी २०२६ रोजी राष्ट्रवादी काँग्रेसने राष्ट्रीय कार्यकारिणी बोलावून सुनेत्रा पवार यांची राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड केली होती. केंद्रीय निवडणूक आयोगाच्या मते २६ फेब्रुवारी २०२६ रोजीच्या राष्ट्रीय अधिवेशनाच्या ठरावात केवळ कलम १८ (१) मध्ये दुरुस्तीचा उल्लेख आहे. तथापि, पक्षाने कलम ६, ७, १२, ३२ आणि ३६ मध्येही बदल केले आहेत. या बदलांना मान्यता देणारे प्रस्ताव आयोगाला प्राप्त झालेले नाहीत. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसला आयोगाकडून या दुरुस्त्यांच्या समर्थनार्थ वैध कागदपत्रे आणि प्रस्ताव लवकरात लवकर सादर करावेत, असे सांगण्यात आले आहे. दरम्यान, निवडणूक आयोगाने पाठविलेल्या पत्रात राष्ट्रवादी काँग्रेसच्या घटनेत कलम ६, ७, १२, १८, ३२ आणि ३६ मध्ये बदल करण्यात आले. मात्र, राष्ट्रवादी काँग्रेसने केवळ कलम १८ संदर्भातील २६ फेब्रुवारी २०२६ च्या राष्ट्रीय कार्यकारिणीच्या ठरावांचा समावेश आहे. इतर कलमांसंदर्भातील ठराव आणि बदला संदर्भातील कागदपत्रे जमा करावीत, असे निवडणूक आयोगाने पत्रात म्हटले आहे.

## काशी विश्वनाथ मंदिरात व्हीआयपी दर्शनाच्या नावाखाली फसवणूक

**वाराणसी :** उत्तर भारतात श्रावण महिना सुरू झाला आहे. श्रावण महिन्याच्या पहिल्या सोमवारी वाराणसीतील काशी विश्वनाथ मंदिरात दर्शन



देण्याच्या नावाखाली भक्तांची फसवणूक करणाऱ्या एका बोगस पुजाऱ्याला पोलिसांनी अटक केली आहे. बसंत पांडे नावाच्या एका व्यक्तीने कर्नाटकातील म्हैसूर येथील नंदिनी, तिचा पती विनायक आणि त्यांच्या दोन साथीदारांकडून व्हीआयपी दर्शनाचे आश्वासन देत ऑनलाइन ४,००० रुपये घेतले होते. पैसे घेतल्यानंतर आरोपी फरार झाला. पीडितेच्या तक्रारीवरून पोलिसांनी ➪(पान २ वर)

## नितीन नबीन यांच्या जागेवर प्रशांत किशोर विजयी



### भाजप उमेदवाराचा पराभव

### एमपीतील दतियामध्ये काँग्रेस


### गुजरातमध्ये भाजप जिंकली

**पाटणा/भोपाळ/अहमदाबाद/वृत्तसंस्था :**बिहार, मध्य प्रदेश आणि गुजरात येथील तीन विधानसभा जागांवर झालेल्या पोटनिवडणुकांचे निकाल जाहीर झाले आहेत. मध्य प्रदेशातील दतिया येथे काँग्रेसने, तर गुजरातमध्ये भाजपने विजय मिळवला.बिहारमधील बांकीपूर येथे प्रशांत किशोर यांनी नितीन नबीन यांची जागा जिंकली. जनसुराज पक्षाचे संस्थापक प्रशांत किशोर १९,३२४ मतांनी विजयी झाले. प्रशांत यांना ६४,१५१ मते मिळाली, तर भाजपचे उमेदवार नीरज कुमार यांना ४४,८२७ मते मिळाली.बांकीपूर हा भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन यांचा पारंपरिक मतदारसंघ आहे. त्यांनी येथून सलग पाच वेळा आमदार म्हणून काम केले आहे. त्यांनी राज्यसभेत प्रवेश केल्यानंतर ही पोटनिवडणूक झाली.

मतमोजणीदरम्यान निवडणूक आयोगाच्या वेबसाइटवर एक तांत्रिक अडचण आढळून आली. सकाळपासून वेबसाइटवर मतमोजणीच्या ३१ फेऱ्या दाखवल्या जात होत्या. ३१ फेऱ्या पूर्ण होताच, आधी ३२, मग ३६ असे दाखवले. नंतर, पुन्हा ३२ फेऱ्या असे दाखवण्यात आले. मध्य प्रदेशातील दातिया येथे काँग्रेसचे उमेदवार घनश्याम सिंह विजयी झाले. भाजपने माजी गृहमंत्री नरोत्तम मिश्रा यांच्या जागी आशुतोष तिवारी यांना उमेदवारी दिली होती. नरोत्तम मिश्रा यांच्या मतदान केंद्रावरही आशुतोष यांना विजय मिळवता आला नाही. गुजरातच्या मांजलपूरमध्ये भाजपचे सतेंद्रभाई (सतीश) पटेल➪(पान २ वर)

## भय्याजी जोशींनी अयोध्येतील राम मंदिराचे पालकत्व सोडले

**अयोध्या/वृत्तसंस्था :** राम मंदिरातील दान चोरी प्रकरणात मोठे उलटफेर होताना पाहायला मिळत आहे. श्रीराम जन्मभूमि तीर्थक्षेत्र ट्रस्टमध्ये मोठ्या उलथापालथी होत आहेत. अनेक पदांचा खांदेपालट करण्यात येत आहेत. अशातच आता राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ नेते भय्याजी जोशी यांनी राम मंदिर ट्रस्ट संरक्षक (पालक) पदाचा राजीनामा दिला आहे. भाजपा आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघातील एक महत्त्वाचा दुवा म्हणून भय्याजी जोशी यांच्याकडे पाहिले जाते. त्यांनी दिलेल्या या राजीनाम्यामुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.



राम मंदिर ट्रस्टने किंवा भय्याजी जोशी यांनी या प्रकरणी कोणतेही अधिकृत निवेदन दिलेले नाही. भय्याजी जोशी यांनी दीर्घकाळ राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या सर्वोच्च नेतृत्वात काम केले आहे. राम मंदिर ट्रस्टच्या नवीन रचनेत आणि नवीन कार्यशैलीत नवीन चेहऱ्यांना प्राधान्य दिले जात आहे. अनेक जुनी माणसे आता सक्रियपणे सहभागी नाहीत. या चर्चांना कोणतीही अधिकृत पुष्टी मिळालेली नसली तरी या बदलाबाबत संघटनात्मक आणि राजकीय वर्तुळात विविध चर्चा सुरू आहेत.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ (आरएसएस) आणि भाजपमधील सर्वात प्रभावशाली व्यक्तींपैकी एक मानले➪(पान २ वर)

## आधी पंतप्रधानांनी डिग्री दाखवावी मग मी माझे कागदपत्रे दाखवेन

### वडिलांवरील तक्रारीवरून दिपकेंचे खुले आव्हान

**मुंबई/प्रतिनिधी :** कॉकरोच जनता पार्टीची पुढील दिशा आणि अजेंडा ठरवण्यासाठी येत्या ५ तारखेला पक्षाच्या कोअर कमिटीची एक महत्त्वाची बैठक पार पडणार



आहे. तत्पूर्वी घेतलेल्या पत्रकार परिषदेत सीजेपीचे संस्थापक अभिजित दिपके यांनी सरकारवर टीका केली आहे. आपल्या वडिलांविरोधात झालेल्या तक्रारीवरून त्यांनी थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या डिग्रीचा मुद्दा उपस्थित करत सरकारला खुले आव्हान दिले आहे. आगामी बैठकीबाबत माहिती देताना अभिजित दिपके म्हणाले की, आमचा पुढचा अजेंडा ठरवण्यासाठीच आम्ही ५ तारखेला कोअर कमिटीची बैठक बोलावली आहे. ही बैठक छत्रपती संभाजीनगरमध्ये माझ्याच घरी पार पडेल. या बैठकीला पक्षाचे प्रवक्ते आणि ज्या कोअर टीम मेंबरनी आम्हाला आंदोलन मॅनेज करण्यात मोठी मदत केली, ते सर्वजण➪(पान २ वर)

## 25 हजार मूळ वेतन असणाऱ्यांना पेन्शन मिळणार!

**नवी दिल्ली / वृत्तसंस्था-** ईपीएफओ अतंर्गत ईपीएफच्या पगाराची मर्यादा वाढविण्याच्या प्रस्तावाला वित्त मंत्रालयाकडून मंजुरी देण्यात आली. १५ हजार रुपयांवरुन ती रक्कम २५ हजार रुपये करण्याचा निर्णय केंद्र सरकारच्या कॅबिनेटने मंजुरी दिल्यानंतर तो लागू होईल. अजून या निर्णयाला केंद्रीय कॅबिनेटची मंजुरी मिळणे बाकी आहे. ईपीएफओच्या नियमांनुसार ज्या कर्मचाऱ्यांचे मूळ वेतन १५ हजार रुपयांपर्यंत असते, त्यांना पीएफ कान्ट्रिब्यूशन अनिवार्य असते. १५ हजारांपेक्षा अधिक मूळ वेतन असणाऱ्या कर्मचाऱ्यांना हा नियम लागू नसतो. मात्र, केंद्रीय वित्त मंत्रालयाकडून याची मर्यादा २५ हजार रुपये करण्याचा निर्णय घेतला. या निर्णयामुळे मोठ्या संख्येने नोकरदार लोक ईपीएफ आणि पेन्शनच्या कक्षेत येतील.केंद्रीय वित्त मंत्रालयाकडून



ईपीएफओच्या पगाराची मर्यादा वाढविण्याच्या प्रस्तावाला मंजुरी दिली. यात १५ हजार रुपयांच्या मूळ वेतनाची मर्यादा वाढवून २५ हजार रुपये पगार असणाऱ्यांना पीएफ आणि पेन्शनच्या कक्षेत आणण्याची तयारी करण्यात आली आहे. सुरुवातीला ही मर्यादा ३० हजार रुपये करण्याचा विचार होता. मात्र, वित्त मंत्रालयाकडून ही मर्यादा २५ हजार रुपये करण्यास मंजुरी देण्यात आली. आता कॅबिनेटच्या बैठकीत मंजुरी मिळाल्यानंतर हा निर्णय लागू करण्याची तारीख जाहीर केली जाउ शकते. मनीकंट्रोलच्या रिपोर्टनुसार सरकारने ईपीएफओ पगाराची मर्यादा वाढविल्यास त्याचा आर्थिक भार वाढू शकतो. कर्मचाऱ्यांच्या पीएफ आणि पेन्शन फंडमध्ये कंपनीसोबत सरकारही कान्ट्रिब्यूशन करत असतं. ईपीएसमध्ये एम्पलायर मूळ वेतनाच्या ८.३३ टक्के तर केंद्र सरकार १.१६ टक्के योगदान देते. आर्थिक वर्ष २०२६-२७ साठी केंद्र सरकारने ११,१४४ कोटींचा प्रस्ताव ठेवला होता. हा नियम २० पेक्षा अधिक ➪(पान २ वर)

# भाजप सोडा, ओबीसींचे नेतृत्व करा

### ● पंकजा मुंडेंना वडेट्टीवारांची खुली ऑफर ● मुख्यमंत्रीपदासाठीही पाठिंब्याची घोषणा

**नागपूर/प्रतिनिधी :** भाजप नेत्या तथा राज्याच्या पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी अलीकडेच राजकारणातून निवृत्तीचा विचार मनात येत असल्याचे वक्तव्य केल्यानंतर राज्याच्या राजकारणात नव्या चर्चांना सुरुवात



झाली आहे. या पार्श्वभूमीवर काँग्रेसचे ज्येष्ठ नेते विजय वडेट्टीवार यांनी पंकजा मुंडेंना थेट भाजप सोडून ओबीसी समाजाचे नेतृत्व करण्याचे आवाहन केले आहे. एवढेच नव्हे, तर त्या भाजपमधून बाहेर पडल्यास काँग्रेस त्यांचे शंभर टक्के स्वागत करेल आणि महाराष्ट्राच्या पहिल्या ओबीसी मुख्यमंत्रीपदासाठीही पूर्ण साथ देईल, असे मोठे विधान त्यांनी केले. वडेट्टीवार यांच्या या वक्तव्यामुळे राज्यातील राजकीय घडामोडींना नवे वळण मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात असून, पंकजा मुंडे यांची पुढील भूमिका काय असेल, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. भंडारा येथे मंडल यात्रेच्या उद्घाटनानंतर ते बोलत होते.

**पक्षात न्याय मिळत नसल्याची भावना असावी-** पंकजा मुंडे यांच्या अलीकडील वक्तव्यांचा संदर्भ देताना विजय वडेट्टीवार म्हणाले की, भाजपमध्ये त्यांना अपेक्षित सन्मान आणि न्याय मिळत नसल्याची भावना निर्माण झाली असावी. त्यांच्या कुटुंबाने पक्षासाठी दिलेल्या योगदानाची अपेक्षित दखल घेतली जात नसल्यामुळे त्यांनी अशा भावना व्यक्त केल्या असाव्यात, असेही त्यांनी नमूद केले. पंकजा मुंडे या राज्यातील प्रभावी ओबीसी नेत्या आहेत. त्यामुळे त्यांनी राजकारणातून निवृत्तीचा विचार करण्याऐवजी भाजपमधून बाहेर पडून ओबीसी समाजाचे नेतृत्व करावे. अशा निर्णयाला काँग्रेसचा पूर्ण पाठिंबा असेल, असे वडेट्टीवार यांनी स्पष्ट केले. पत्रकारांनी त्या भाजप सोडल्यास काँग्रेसमध्ये प्रवेश मिळेल का? असा प्रश्न विचारल्यानंतर त्यांनी, पंकजा मुंडे भाजपमधून बाहेर पडल्या तर काँग्रेस त्यांचे शंभर टक्के स्वागत करेल, असे स्पष्ट उत्तर दिले.

**पंकजा मुंडे नेमक्या काय म्हणाल्या?**

परळीतील एका कार्यक्रमात बोलताना पंकजा मुंडे यांनी रस्त्यांच्या कामांवर नाराजी व्यक्त केली होती. रस्त्यावर इतके खड्डे पाहिले की राजकारणाचा कंटाळा आला. विकासासाठी एवढे प्रयत्न करू नही अनेक प्रश्न सुटत नाहीत. कधी कधी राजकारणातून निवृत्त व्हावे, असे वाटते. मात्र जनतेचा उत्साह पाहिला की पुन्हा काम करण्याची उभारी मिळते.

### वडेट्टीवारांची ऑफर नेमकी काय?

- पंकजा मुंडेंनी भाजप सोडावे, असे खुले आवाहन
- ओबीसी समाजाचे नेतृत्व करण्याची सूचना
- काँग्रेसमध्ये शंभर टक्के स्वागत करण्याची तयारी
- राज्याच्या पहिल्या ओबीसी मुख्यमंत्रीपदासाठी पूर्ण पाठिंबा देण्याचा दावा
- पंकजा मुंडे यांच्या राजकारणातून निवृत्तीच्या वक्तव्यामुळे चर्चा सुरू
- भाजपमधील त्यांच्या स्थानाबाबत सातत्याने राजकीय चर्चा
- वडेट्टीवारांच्या ऑफरमुळे विरोधकांकडून नवे राजकीय संकेत
- ऑफरवर काय भूमिका घेतात, याकडे आता सर्वांचे लक्ष

## बृजभूषण सिंह महिला कुस्तीपटू लैंगिक शोषण प्रकरणात निर्दोष

**गोंडा-**दिल्लीच्या राउस अव्हेन्यू कोर्टाने सोमवारी महिला कुस्तीपटूंशी संबंधित लैंगिक शोषणाच्या प्रकरणात भाजप नेते बृजभूषण शरण सिंह यांची निर्दोष मुक्तता केली. सुनावणीदरम्यान कैसरगंजचे माजी खासदार बृजभूषण शरण सिंह आणि भारतीय कुस्ती महासंघाचे (WFI) माजी सचिव विनोद तोमर न्यायालयात उपस्थित होते. २ जुलै २०२६ रोजी दोन्ही बाजूंचे युक्तिवाद पूर्ण झाल्यानंतर कोर्टाने निकाल राखून ठेवला होता. हे प्रकरण जानेवारी २०२३ मध्ये समोर आले होते. तेव्हापासून आतापर्यंत एकूण ११३३ दिवसांत १२७ सुनावण्या झाल्या. अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी अश्वनी पंवार यांनी हा निकाल दिला. बृजभूषण २० जुलै २०२३ पासून नियमित जामिनावर होते. १० मे २०२४ रोजी न्यायालयाने दिल्ली पोलिसांच्या आरोपपत्राच्या आधारे आरोप निश्चित केले होते, त्यानंतर खटला सुरू झाला होता. न्यायाधीशांनी हे सांगितले की बृजभूषण आणि विनोद तोमर, तुम्हा लोकांना सन्मानपूर्वक निर्दोष मुक्त केले जाते. मी आधीच सांगितले होते की जर कोणताही आरोप सिद्ध झाला तर मी फाशीवर लटकून घेईन. माझ्यासाठी आनंदाचा दिवस आहे. कोर्टाची प्रत मिळाल्यानंतर पुढे सांगेन.




जनमाध्यम
e paper www.janmadhyam.com
एक प्रतिष्ठित सवय

# खा.अनिल बोंडे, आमदार प्रकाश भारसाकळेंचे बॅनर नगर परिषदेने हटविले

## दर्यापुरात भाजप आक्रमक -दोन तास ठिय्या आंदोलन

**खल्लार/प्रतिनिधीः-** भाजपचे राज्यसभा खासदार डॉ. अनिल बोंडे आणि आमदार प्रकाश भारसाकळे यांच्या वाढदिवसाचे दर्यापूरात लावण्यात आलेले बॅनर नगर परिषदेच्या पथकाने आज हटविल्याने भाजप पदाधिकारी कमालीचे आक्रमक झाले.दर्यापुरात राजकीय सूडबुद्धीने कारवाई केली जात असल्याचा आरोप भाजप पदाधिकाऱ्यांनी केला आहे. यामुळे दर्यापूरात राजकीय वातावरण अचानक तापले. या कारवाईचा निषेध करत संतप्त भाजप पदाधिकाऱ्यांनी नगरपरिषदेच्या मुख्य प्रवेशद्वारावर तब्बल दोन तास ठिय्या आंदोलन



केले आणि प्रशासनाविरोधात जोरदार घोषणाबाजी केली.

काँग्रेसचे खासदार बळवंत वानखडे आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाचे आमदार गजानन लवटे यांच्या राजकीय दबावाखाली येऊनच नगरपरिषद प्रशासन भाजपच्या बॅनरवर कारवाई करत असल्याचा आरोप भाजपचे अनुसूचित जाती मोर्चा जिल्हाध्यक्ष नकुल सोनटक्के यांनी केला. शहरात काँग्रेस आणि उद्धव ठाकरे गटाचे अनेक अवैध बॅनर आणि होर्डिंग्स उघड्या डोळ्यांनी दिसत असताना नगरपरिषदेला फक्त भाजपच्याच नेत्यांचे बॅनर कसे काय दिसतात?' असा संतप्त सवाल भाजप पदाधिकाऱ्यांनी केला. तसेच पक्षपातीपणे बॅनर हटविणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर तात्काळ निलंबनाची कारवाई करण्याची आक्रमक मागणी भाजपने लावून धरली आहे.

या ठिय्या आंदोलनात भाजपचे अल्पसंख्याक मोर्चा प्रदेश पदाधिकारी सलीमभाई घाणीवाले, जिल्हा उपाध्यक्ष रविंद्र ढोकणे, अनुसूचित जाती मोर्चा जिल्हाध्यक्ष नकुल सोनटक्के, दर्यापूर शहर मंडळ अध्यक्षा मेघा भारती, नगरपरिषद गटनेते व जिल्हा सचिव दिनेश पारडे, नगरसेवक मयूर लांडे, रविंद्र राजपूत, गोकुळ पाटील भडांगे, संकेत भूतडा, आरती वाभडे, कृष्णा स्वामी, सुरेश वाभडे, शुभम गजभिये यांच्यासह भाजपचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. दोन तासांच्या या आंदोलनामुळे नगरपरिषद परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

# अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांच्या न्यायासाठी काँग्रेसचे तहसीलदारांना निवेदन

**चांदूर रेल्वे/प्रतिनिधीः-** तालुक्यात दिनांक ३० व ३१ जुलै २०२६ रोजी झालेल्या मुसळधार पावसामुळे शेतजमीन खरडून जाणे, पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होणे तसेच अनेक शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाल्याच्या पार्श्वभूमीवर माजी आमदार विरेंद्र जगताप यांच्या नेतृत्वात चांदूर रेल्वे तालुका व शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने तहसीलदार, चांदूर रेल्वे यांना निवेदन सादर करण्यात आले.

निवेदनाद्वारे प्रशासनाने कृषी, महसूल व ग्रामविकास विभागाच्या संयुक्त पथकाद्वारे तातडीने पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासनाकडून त्वरित नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी करण्यात आली. तसेच खरडून गेलेल्या शेतीसाठी प्रति हेक्टर किमान ५०,००० आर्थिक मदत देण्यात यावी, अशीही मागणी करण्यात आली.यावेळी माजी आमदार विरेंद्र जगताप यांनी सांगितले की, नांदगाव खंडेश्वर, चांदुर रेल्वे, धामणगाव रेल्वे, तालुक्यामध्ये २०० ते २५० मिलिमीटर अतिवृष्टीमुळे तालुक्यातील शेतकरी मोठ्या संकटात सापडला असून शासनाने कोणताही विलंब न करता तातडीने पंचनामे पूर्ण करून आर्थिक मदत जाहीर करावी. शेतकऱ्यांना दिलासा मिळण्यासाठी प्रशासनाने संवेदनशीलतेने काम करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. चांदूर रेल्वे तालुका व शहर काँग्रेस कमिटीने शासनाला शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहून नुकसानभरपाईचे वितरण तातडीने करावे, अन्यथा काँग्रेस पक्ष शेतकऱ्यांच्या न्यायासाठी तीव्र लोकशाही मार्गाने आंदोलन उभारेल, असा इशाराही दिला. यावेळी गणेश आरेकर, प्रभाकरराव वाघ, राजेंद्र राजनेकर सभापती, बाळासाहेब ठाकरे अध्यक्ष, अमोल होले, गोविंदराव देशमुख, श्रीनिवास सूर्यवंशी, प्रफुल कोकाटे, शिट्टु सूर्यवंशी, अनिसभाई सौदागर, रावसाहेब शेळके हरिभाऊ ठाकरे, नितीन कोपरकर, दिनेश देशमुख, दत्ता भुयार, राजू लांजेवार, प्रवीण चीचे, गितेश सिंग ठाकूर, अर्जुन देशमुख, अरुण वाहने, सचिन वाहने, सुधीर नलगे सक्षम वानखडे पंकज मेश्राम, इत्यादी शेतकरी हजर होते.

पान १ व १० वरून

## आंदोलनांसाठी जंतरमंतर जागा

सरकारच्या सूचना घेण्यास सांगितले. त्यानंतर केंद्र सरकारला नोटीस बजावत हे प्रकरण स्वतंत्रपणे सुनावणीसाठी सूचीबद्ध करण्याचे निर्देश दिले.

**केजरीवाल यांच्या मोर्चाचाही उल्लेख-**सुनावणीदरम्यान एका वकिलांनी न्यायालयाला सांगितले की, अरविंद केजरीवाल यांनी बैठकीचे आयोजन केले असून त्यानंतर पंतप्रधानांच्या निवासस्थानापर्यंत मोर्चा काढण्याचा निर्णय घेतला आहे. २० जुलै रोजी घडल्याप्रमाणे पुन्हा कोणताही अनुचित प्रकार घडू नये, अशी विनंतीही त्यांनी न्यायालयाकडे केली.

**यंत्रणा सक्षम-**यावर सरन्यायाधीश सूर्यकांत म्हणाले संबंधित यंत्रणांना परिस्थिती कशी हाताळायची हे माहिती आहे. त्यांना परिस्थिती नियंत्रणात ठेवता आली नाही आणि काही गडबड झाली तर, ते आमच्याकडे येउ शकतात. मात्र, ते ही परिस्थिती योग्य प्रकारे हाताळतील, असा मला विश्वास आहे. या प्रकरणी केंद्र सरकारचे उत्तर आल्यानंतर सर्वोच्च न्यायालय पुढील सुनावणी घेणार आहे.

## जॉब नही मिलेगा, तो सिंहासन

ट्वीटमध्ये म्हटले आहे की, कोटा, देहराडून नंतर आता प्रयागराजमध्ये विद्यार्थ्यांचे आंदोनल करण्यात येईल. दरवर्षी लाखो युवक परीक्षांचे फार्म भरतात, त्याची फी देतात आणि निकालाची वाट पाहतात. पण पेपरफुटीमध्ये त्यांचे नुकसान झाले आहे. थांबलेल्या भरती प्रक्रियेमुळे त्यांच्या भविष्य धोक्यात आले आहे. विद्यार्थी त्यांच्या अधिकारांची मागणी करतात म्हणून दिल्ली पोलिसांनी त्यांच्यावर लाठीचार्ज केला, त्यांच्यावर पेलेटगनचा हल्ला केला. या प्रश्नावर आम्ही सातत्याने आवाज उठवू आणि विद्यार्थ्यांना न्याय देउ. जबाबदारी घ्या किंवा सत्ता सोडा असा इशारा त्यांनी दिला.

## काशी विश्वनाथ मंदिरात व्हीआयपी

तात्काळ आरोपीला अटक करून पुढील कारवाईसाठी पोलिस ठाण्यात नेले. वाराणसी पोलिसांनी श्रावण महिन्याच्या पहिल्या सोमवारी काशी विश्वनाथ मंदिरात व्हीआयपी दर्शन देण्याच्या नावाखाली भाविकांची फसवणूक करणा-या एका बोगस पुजा-याला अटक केली आहे. श्रावण महिन्याच्या पहिल्या सोमवारी काशी विश्वनाथांच्या दर्शनासाठी आणि जलाभिषेकासाठी चार ते पाच तास लागतात. वेळेअभावी, बाहेरून येणारे शिवभक्त अनेकदा मंदिर परिसरात फिरणा-या फसवणूक करणा-यांचे बळी ठरतात. मंदिराला भेट देण्यासाठी आलेल्या म्हैसूर येथील एका महिलेने अशाच एका घटनेबाबत पोलिसांना माहिती दिली.

**दर्शनासाठी पैशाची मागणी-**मंदिर परिसरात श्रावण ड्युटीवर असलेले पोलिस निरीक्षक शिवकांत मिश्रा यांनी सांगितले की म्हैसूर येथील एका महिलेने तक्रार केली होती की, बसंत पांडे नावाच्या व्यक्तीने लवकर दर्शन मिळवून देण्याच्या बहाण्याने चार जणांना ४,००० रुपये घेतले. भाविकांकडून ऑनलाइन ट्रान्सफर करून तो फरार झाला.

**तक्रारीनंतर शोधमोहिम-** निरीक्षकांनी सांगितले की महिलेच्या तक्रारीनंतर शोधमोहीम सुरू करण्यात आली आणि फसवणूक करणा-याला तात्काळ अटक करण्यात आली. महिलेच्या खात्यात ४,००० रुपये तात्काळ परत करण्यात आले. त्यानंतर बसंत पांडेला पुढील कारवाईसाठी चौक पोलिस ठाण्यात नेण्यात आले. पोलिसांनी त्या महिलेला आणि तिच्या सोबत आलेल्यांना मंदिरात विश्वनाथांच्या दर्शनाची व्यवस्था करून दिली. त्या महिलेने आणि तिच्या पतीने पोलिस अधिका-याचे आभार मानले.

## राम मंदिर देणगी

समावेश का केला गेला आहे, असे प्रश्न त्यांनी उपस्थित केले. महापाल सिंह यांनी एसआयटीला (SIT) दिलेल्या विधानामुळे हे प्रकरण अधिक प्रकाशझोतात आले आहे, असे निरीक्षण त्यांनी नोंदवले. त्यांच्या म्हणण्यानुसार, देणगीचा निधी कारसेवकपुरम येथे राहणा-या आणि विश्व हिंदू परिषदेशी संबंधित असलेल्या व्यक्तींकडे वळवण्यात आला होता, तसेच हा निधी परिषदेचे कार्यक्रम आणि घरे बांधण्यासाठी वापरण्यात आला होता.

**डिंपल यादव म्हणाल्या- सरकारविषयी लोकांचा भ्रमनिरास-** समाजवादी पक्षाच्या खासदार डिंपल यादव यांनी म्हटले आहे की, हा केवळ मूळ मुद्द्यांवरून लक्ष विचलित करण्याचा प्रयत्न आहे. सरकारबद्दल लोकांचा पूर्णपणे भ्रमनिरास झाला आहे. राम जन्मभूमीशी संबंधित जमीन घोटाळा आणि देणग्यांच्या अपहाराची संपूर्ण जबाबदारी सरकारची आहे. सनातन धर्माचा अवमान केल्याच्या आरोपावरून राहुल गांधी, पप्पू यादव आणि अवधेश प्रसाद यांच्या विरोधात दाखल करण्यात आलेल्या एफआयआरवर (FIR) प्रतिक्रिया देताना त्यांनी हे भाष्य केले.

## संसद परिसरात प्रतिकात्मक

*खासदार डिंपल यादव यांनी सरकारवर कडाडून टीका केली आहे. त्यांनी म्हटले आहे की, राम मंदिराच्या देणगीतील चोरी आणि जमिनीच्या* घोटाळ्याला सर्वस्वी सरकार जबाबदार असून आजतागायत या प्रकरणी एकावरही एफआयआर का दाखल करण्यात आला नाही, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. जनतेने रामलल्लाच्या चरणी श्रद्धेने अर्पण केलेला पैसा आणि मौल्यवान धातू नेमके गेले कुठे, याचे उत्तर सरकारने दिले पाहिजे. लोकांमध्ये सरकारबद्दल मोठी निराशा असून मूळ मुद्द्यांवरून लक्ष विचलित करण्यासाठी सरकारकडून वेगवेगळे प्रयत्न केले जात असल्याचे त्या म्हणाल्या.

## नितीन नबीन यांच्या जागेवर

३०,६३० मतांच्या मोठ्या फरकाने विजयी झाले. त्यांनी काँग्रेसचे भिकाभाई रबारी यांचा पराभव केला. या तिन्ही जागांसाठी ३० जुलै रोजी मतदान झाले. जनसुराज पक्षाचे प्रशांत किशोर यांनी ६४,१५१ मते (४९.२३%) मिळवून बांकीपूर पोटनिवडणूक जिंकली. भाजपचे नीरज कुमार यांना ४४,८२७ मते (३४.४०%) मिळाली. दोघांमधील विजयाचे अंतर १९,३२४ मतांचे होते.

आरजेडीच्या रेखा कुमारी १४,२७३ मते (१०.९५%) मिळवून तिस-या क्रमांकावर राहिल्या. भाजप आणि आरजेडीला मिळून ५९,१०० मते मिळाली, जी एकट्या प्रशांत किशोर यांच्या मतांपेक्षा ५,०५१ ने कमी आहेत. यावरून त्यांची मोठी आघाडी दिसून येते. या निवडणुकीत एकूण १,३०,३१३ मते पडली, ज्यात जवळपास प्रत्येक दुसरे मत प्रशांत किशोर यांच्या बाजूने गेले. नोटा पक्षाला ६४६ मते (०.५०%) मिळाली. पहिल्या तीन उमेदवारांनंतर, इतर कोणत्याही उमेदवाराला १,००० मते मिळाली नाहीत. चौथ्या क्रमांकावर राहिलेल्या मनोरंजन कुमार श्रीवास्तव यांना ९७३ मते (०.७५%) मिळाली.

**दतियामध्ये एएसपीने काँग्रेसची मते विभागली, तरीही विजय मिळवला.-** काँग्रेसचे घनश्याम सिंह यांनी ६६,७५७ मते (४२.३९%) मिळवून दतिया पोटनिवडणूक जिंकली. भाजपचे आशुतोष तिवारी यांना ६०,७४१ मते (३८.५७%) मिळाली. विजयाचे अंतर ६,०१६ मतांचे होते. आझाद समाज पक्षाचे (कांशीराम) दामोदर यादव 'मंडाळ' २२,५२७ मते (१४.३०%) मिळवून तिस-या क्रमांकावर आले. काँग्रेस आणि भाजप यांच्यातील लढत अटीतटीची होती, परंतु आझाद समाज पक्षानेही लक्षणीय वाटा मिळवून निवडणुकीला तिरंगी लढतीत रूपांतरित केले. या निवडणुकीत एकूण १,५७,४९९ मतदान झाले. यापैकी काँग्रेस आणि भाजपला मिळून १,२७,४९८ मते मिळाली, म्हणजेच अंदाजे ८१% तिस-या क्रमांकावर राहिलेल्या दामोदर यादव यांना एकट्याला १४.३०ऽ मते मिळाली.

**दतियामध्ये विजयानंतर काँग्रेसचा जल्लोष-** दतिया पोटनिवडणुकीत काँग्रेसचे उमेदवार घनश्याम सिंह यांच्या विजयानंतर टिकमगडमध्येही जल्लोष साजरा करण्यात आला. काँग्रेस कार्यकर्ते सायंकाळी ६ वाजता गांधी चौकात जमले, त्यांनी ढोल वाजवले आणि फटाके फोडले.

## भय्याजी जोशींनी अयोध्येतील

जाणारे भय्याजी जोशी यांनी राम मंदिर ट्रस्टच्या पालक पदाचा राजीनामा दिला आहे. ट्रस्टने त्यांना या जबाबदारीतून मुक्त केले आहे. भय्याजी जोशी यांनी प्रकृतीच्या कारणास्तव राजीनामा दिल्याचे अधिकृतपणे म्हटले जात आहे. भय्याजी जोशी यांचा निर्णय महत्त्वपूर्ण मानला जात आहे. कारण एकेकाळी आरएसएस आणि भाजपा यांच्यातील सर्वांत मजबूत दुवा मानले जात होते. जोशी यांची संघटनेवर दीर्घकाळ मजबूत पकड होती. महत्त्वाच्या निर्णयांमध्ये जोशी यांचा सहभाग असे. राम मंदिर ट्रस्टच्या पदाचा राजीनामा देणे हा केवळ एक औपचारिक बदल नसून, संघटनात्मक दृष्टिकोनातूनही तो महत्त्वाचा मानला जात आहे.

पालक हे प्रशासकीय पद

श्रीराम जन्मभूमि तीर्थक्षेत्र ट्रस्टमधील पालक हे पद प्रशासकीय आणि संघटनात्मक समन्वयाशी संबंधित मानले जाते. या जबाबदारीमध्ये ट्रस्टच्या कार्यावर देखरेख ठेवणे, वेळोवेळी मार्गदर्शन करणे यांचा समावेश होतो. हे पद दैनंदिन प्रशासकीय कामापेक्षा वेगळे मानले जाते. संघटनात्मक स्तरावर ट्रस्टचे कामकाज अधिक बळकट करण्याच्या पार्श्वभूमीवर जोशी यांच्याकडे संरक्षक (पालक) म्हणून जबाबदारी देण्यात आली होती. परंतु आता या पदाचा राजीनामा दिला आहे.

## आधी पंतप्रधानांनी डिग्री दाखवावी

उपस्थित राहतील. सीजेपीची चळवळ पुढे कशी घेउन जायची आणि पक्षाचे संघटन कसे मजबूत करायचे, यावर या बैठकीत सविस्तर चर्चा केली जाईल. अभिजित दिपके यांच्या शिक्षणाचा खर्च त्यांच्या कुटुंबाने कसा उचलला? यावरून त्यांच्या वडिलांविरोधात एक तक्रार दाखल करण्यात आली आहे. यावर आक्रमक प्रतिक्रिया देताना दिपके म्हणाले, मी माझ्या शिक्षणासाठी मिळालेल्या स्क?लरशिपचे आणि लोनचे कर्जाचे लेटर दाखवायला कधीही तयार आहे. पण माझी एकच अट आहे की, आधी पंतप्रधानांनी त्यांची डिग्री सार्वजनिक करावी. त्यांनी त्यांची डिग्री दाखवली, तर मी माझी सर्व कागदपत्रे सार्वजनिक करेन. सरकारच्या धोरणांवर प्रहार करताना दिपके पुढे म्हणाले की, ज्यांना जी काही चौकशी करायची आहे ती त्यांनी खुशाल करावी. देशात सध्या असे वातावरण आहे की, जेव्हा जेव्हा कोणी या सरकारच्या विरोधात बोलते किंवा त्यांना प्रश्न विचारते, तेव्हा हे लोक त्यांचा आवाज दाबण्यासाठी ईडी आणि सीबीआय सारख्या यंत्रणा मागे लावतात. आताही तेच सुरू आहे.

झारखंडमध्ये नुकत्याच उघडकीस आलेल्या पेपरफुटी प्रकरणावरही त्यांनी भाष्य केले. झारखंडमध्ये पेपर फुटल्यानंतर तेथील विद्यार्थ्यांशी माझे बोलणे झाले आहे. मी त्यांना स्पष्ट सांगितले आहे की, जोपर्यंत तुमच्या मागण्या मान्य होत नाहीत, तोपर्यंत अजिबात मागे हटू नका. काकरोच जनता पार्टी या लढ्यात पूर्णपणे तुमच्या पाठीशी उभी आहे. विद्यार्थ्यांना जी काही मदत लागेल, ती आम्ही नक्की करू , असा विश्वास अभिजित दिपके यांनी यावेळी व्यक्त केला.

## 25 हजार मूळ वेतन

कर्मचारी असलेल्या कपन्यांना लागू होतो.ॅबिनेटनेही वित्त मंत्रालयाचा प्रस्ताव मंजूर केला तर हा प्रस्ताव तातडीने लागू होण्याची शक्यता कमी आहे. कारण कंपन्यांना त्यांच्या पेरोल सिस्टीम्स, कंम्लायन्स प्रोसेस आणि दुस-या आवश्यक कामांमध्ये बदल करण्यासाठी वेळ लागेल. त्यामुळे सरकार नव्या नियमाची अंमलबजावणी करण्यासाठी वेळ देउ शकतो.सरकार नव्या ईपीएफ पगाराच्या मर्यादेची अंमलबजावणी १ एप्रिल २०२७ पासून लागू करु शकते. ईपीएफओकडून सप्टेंबर २०१४ मध्ये ईपीएफ पगाराची मर्यादा ६५०० रुपयांवरून वाढवून १५ हजार रुपये केली होती.

## ४८ कोटींचा दंड प्रलंबित ठेवून '

हायकोर्टाने अपील करण्यासाठी केवळ ४ आठवडे दिले होते. न्यायालयाचे संरक्षण डिसेंबर २०२५ मध्येच संपले. तरीही चांडक यांनी तब्बल ५ महिन्यांनी म्हणजेच २ एप्रिल २०२६ रोजी अपील दाखल केले. खरोखर उच्च न्यायालयाच्या आदेशाचा आदर आणि धाक असता तर एसडीओ यांनी हे अपील त्याच दिवशी कचऱ्याच्या डब्यात फेकायला हवे होते, पण कोणत्या ' अर्थपूर्ण दबावाखाली ' हे अपील स्वीकारले गेले? हेच समजेनासे झाले.

पुढे हायकोर्टाने एसडीओ अकोट यांना अपील याचिका दाखल केल्याच्या दिनांकापासून ८ आठवड्यांच्या आत (२८ मे २०२६ पर्यंत) या प्रकरणाचा अंतिम निकाल लावण्याचे कडक आदेश दिले होते. परंतु, आज ऑगस्ट महिना उजाडला तरी अकोट एसडीओ कोर्टात केवळ 'तारीख पे तारीख' चा वेळकाढूपणा सुरू आहे. हायकोर्टाची मुदत संपून अतिरिक्त २ महिने उलटले तरी एसडीओ निकाल देत नाहीत, हा थेट न्यायालय अवमान कायदा अंतर्गत फौजदारी गुन्हा आहे हे विशेष!

शासनाचा ४८ कोटींचा महसूल प्रलंबित ठेवायचा, आदिवासींच्या जमिनींवर डांबर प्लांट चालवून रोज लाखो रुपये कमवायचे आणि शासकीय कंत्राटातून करोडोंचे बिल उचलायचे' असा हा उघड अघोषित दरोडा अकोट महसूल प्रशासनाच्या मूक संमतीने आणि अर्थपूर्ण समजुतीतून सुरू असल्याचा संशय बळावला आहे. या महाघोटाळ्याप्रकरणी अकोला जिल्हाधिकारी आणि अमरावती विभागीय आयुक्त आता या एसडीओ, तहसीलदार आणि दंडग्रस्त चांडक यांच्यावर होणाऱ्या 'मेहेरबानी'ची चौकशी करणार की भोंगळ कारभाराची ही गंगा अशीच वाहत राहणार? 'जनमाध्यम' यावर सतत लक्ष ठेवून आहे!

**श्थिं कलम ३६-अ चा भंग : आदिवासींच्या जमिनींवर उघड दरोडा**

'जनमाध्यम'च्या हाती आलेल्या अत्यंत गोपनीय ७/१२, भाडेपट्टा, करारनामा आणि शासकीय कागदपत्रांनुसार, दंडग्रस्त संतोष चांडक यांचे गाजीपूर शिवारात दोन-दोन अवाढव्य क्रशर उद्योग आणि एक डांबर हॉट मिक्स प्लांट राजरोसपणे सुरू आहेत. धक्कादायक आणि संतापजनक बाब म्हणजे, हे उद्योग ज्या जमिनींवर सुरू आहेत, त्या जमिनी गरीब आदिवासी समाज बांधवांच्या आहेत. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (श्थिं) १९६६ च्या कलम ३६-अ नुसार, आदिवासींची जमीन गैर-आदिवासी व्यक्तीला हस्तांतरित करणे किंवा व्यावसायिक वापरासाठी देणे हा अजामीनपात्र गुन्हा आहे. यासाठी राज्य शासनाची किंवा जिल्हाधिकाऱ्यांची पूर्वपरवानगी अनिवार्य आहे. मात्र याठिकाणी असे काहीच झाले नाही, ना जिल्हाधिकारी ना राज्य शासन कोणाचीही कोणत्याही प्रकाराची परवानगी न घेता थेट उघडपणे हा सर्व प्रकार याठिकाणी उद्योजक चांडक यांनी केला तर या प्रकाराची इत्यंभूत माहिती असताना सुद्धा एसडीओ आणि तहसीलदार यांच्याकडून मात्र या बेकायदेशीर उद्योगांवर कोणत्याही प्रकाराची कारवाई होत नसल्याने या बेकायदेशीर उद्योगांना एकप्रकारे महसुलच्या अधिकारी वर्गाचीच 'मूकसंमती ' असल्याची चर्चा रंगली आहे.

**'जनमाध्यम'चे थेट, रोखठोक आणि आक्रमक प्रश्नः**

१. उच्च न्यायालयाने दिलेल्या ४ आणि ८ आठवड्यांच्या कालमर्यादेपेक्षा अकोट एसडीओ यांचे अधिकार मोठे आहेत का?

२. न्यायालयाचा कोणताही अधिकृत 'स्टे' (ऍैब) नसताना तहसीलदारांनी चांडक यांचे दोन्ही क्रशर आणि डांबर प्लांट आजपर्यंत जप्त का केले नाहीत? तिथून होणाऱ्या अवैध कमाईत महसूल विभागाचा वाटा किती?

३. आदिवासींच्या जमिनींवर बेकायदेशीरपणे क्रशर चालवून कलम ३६-अ चा भंग करणाऱ्या चांडक याला अकोट महसूल प्रशासन कारवाई न करता लाल गालिचा का अंथरत आहे?

## अर्जुन नगर परिसरात कारमध्ये

केली असावी. नशेत तो कार मध्ये खाली पडला असावा आणि दरवाजे लॉक असल्याने गुदमरून त्याचा मृत्यू झाला असावा, असा प्राथमिक अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे. मात्र मृत्यूचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी जिल्हा रुग्णालयात पाठवला आहे. शवविच्छेदन अहवालानंतरच मृत्यूचे खरे कारण समजू शकेल.घटनास्थळी नागरिकांची मोठी गर्दी झाली होती. गाडगे नगर पोलिसांनी आकस्मिक मृत्यूचा गुन्हा नोंद करून पुढील तपास सुरू केला आहे.

## ८३ माकडे पकडली, प्रदीप वडतकर

टीम मंगळवार रोजी सकाळी सहा वाजल्यापासून पुन्हा गावात दाखल होणार आहे.

आपल्या परिसरात किंवा घरावर माकडांचा वावर दिसून आल्यास ग्रामस्थांनी त्वरित समाधान गिरी यांच्याशी संपर्क साधावा. वन विभागाचे कर्मचारी काम करत असताना नागरिकांनी गर्दी करू नये आणि टीमला पूर्ण सहकार्य करावे. येवदा गाव माकडमुक्त करण्यासाठी व सर्वांच्या सुरक्षिततेसाठी ग्रामस्थांनी सहकार्य करण्याचे आवाहन प्रदीप वडतकर व येवदा ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

## महिनाभरात ८७५५ लाखांचा

मोबाईल वापरणाऱ्या २९, फॅन्सी नंबर प्लेट लावणाऱ्या ४५८, रॉंग साईडने वाहन चालविणाऱ्या ६७७, ट्रिपल सीट प्रवास करणाऱ्या ३९३, नो-पार्किंगमध्ये वाहन उभे करणाऱ्या ४७२, मालवाहू वाहनातून प्रवासी वाहतूक करणाऱ्या २७ आणि क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी वाहतूक करणाऱ्या तब्बल ७,४९७ वाहनचालकांवर कारवाई करण्यात आली.

या मोहिमेत आकारण्यात आलेल्या ८७.५५ लाख रुपयांच्या दंडापैकी १८ लाख १० हजार ८५० रुपयांची वसुली करण्यात आली आहे. तसेच मद्यप्राशन करून वाहन चालविणाऱ्या २०० चालकांवर आणि अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्या ३७ वाहनांवर स्वतंत्र कारवाई करून न्यायालयात प्रस्ताव दाखल करण्यात आले आहेत.दरम्यान, अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी जिल्ह्यातील २७ महत्त्वाच्या ठिकाणी नियमित नाकाबंदी करून वाहनांची तपासणी सुरू असून वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर यापुढेही कठोर कारवाईचा इशारा पोलिसांनी दिला आहे.

यावेळी नागरिकांनी दुचाकी चालविताना हेल्मेट, चारचाकीत सीटबेल्ट वापरणे, मद्यप्राशन करून वाहन न चालविणे, वाहन चालविताना मोबाईलचा वापर टाळणे, रॉंग साईडने वाहन न चालविणे आणि मालवाहू वाहनातून प्रवासी वाहतूक टाळून वाहतूक नियमांचे पालन करण्याचे आवाहन अमरावती ग्रामीण पोलिसांनी केले आहे.

## पोलिस कस्टडीतील युवकाचा ट्रेनमधून

यादरम्यान टिमटाळा- मालखेड रेल्वे ट्रॅकच्या कडेला सौरभचा मृतदेह आढळला. बडनेरा पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा केला. मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला आहे. पोस्टमार्टम रिपोर्ट आल्यानंतरच मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होईल.पोलिसांनी सध्या आकस्मिक मृत्यूची नोंद करून तपास सुरू केला आहे.सौरभ ट्रेनमधून स्वतः पडला का? त्याला कोणी ढकलले का? शौचालया जवळील सीसीटीव्ही आणि प्रत्यक्षदर्शींचे जबाब या वरूनच खरे कारण समोर येईल.पुढील तपास पोलिस करीत आहेत.

## बापट चौक हत्याकांडाचा काही

आणि सिटी कोतवालीचे संयुक्त पथक घटनास्थळी दाखल झाले. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज, प्रत्यक्षदर्शींची माहिती आणि गुप्त बातमीदारांच्या मदतीने आरोपींची ओळख पटविण्यात आली. आरोपी शहराबाहेर पळून जाण्याच्या तयारीत असल्याची माहिती मिळताच पोलिसांनी सापळा रचून तिघांनाही ताब्यात घेतले. ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपींमध्ये शेख रेहान शेख हारुण (वय २७, सुफियान नगर), शेख नुरेन शेख इरफान (वय २१, सबा नगर) आणि इरफान खान उर्फ गोलू जावेद खान (वय २७, अकबर नगर) यांचा समावेश आहे. पुढील तपासासाठी तिन्ही आरोपींना सिटी कोतवाली पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपआयुक्त यशवंत सोळंके, श्याम घुगे, पोलीस उपआयुक्त (मुख्यालय) प्रांजली सोनवणे तसेच सहायक पोलीस आयुक्त संजय खताळे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा आणि सिटी कोतवाली पोलिसांच्या संयुक्त पथकाने केली.

## महिला मुक्ती मोर्चाची जिल्हाधिकारी

करण्यात आली आहे. यावेळी अशोक खरात, संगीता वाघ, शंकर मगर ,श्याम वाघमारे, धनश्याम सैरीसे, दशरथ लोखंडे,रामचंद्र भोंगरे, राम भोंगरे,गजानन बगळे,आकाश सोनोने,सुचिता सैरीसे, जोत्सना लोखंडे,कल्पना भोंगरे, निलेश हटवारसह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मनुष्यबळ कंत्राटावरून नेकॉफला

बाजूंचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने मनपाला 'जैसे थे' स्थितीत ठेवण्याचे निर्देश दिले आहेत.या आदेशामुळे महानगरपालिकेतील विविध विभागांतील कर्मचारी नियुक्तीची प्रक्रिया रखडण्याची शक्यता आहे. कारण मनपाचे कामकाज बहुतांश कंत्राटी कर्मचाऱ्यांवर अवलंबून आहे.दरम्यान, गेल्या आठवड्यात झालेल्या स्थायी समितीच्या बैठकीतच नेकॉफच्या मनुष्यबळ कंत्राटाला मंजुरी देण्यात आली होती. आता सुप्रीम कोर्टाच्या आदेशानंतर पुढे काय होणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## प्रधानमंत्री पिक विमा योजनेला

केले आहे. शेवटच्या दिवसात पीक विमा पोर्टलवर तांत्रिक ताण येऊन अडचणी निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे अंतिम मुदतीची वाट न पाहता शेतकऱ्यांनी लवकरात लवकर जवळच्या सीएससी केंद्राशी संपर्क साधून सहभाग नोंदवावा. तसेच अर्ज करण्यासाठी निर्धारित प्रीमियमपेक्षा अतिरिक्त पैसे मागितल्यास शेतकऱ्यांनी तात्काळ कृषी विभाग किंवा तहसील कार्यालयाकडे तक्रार नोंदवावी, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राहुल सातपुते यांनी केले आहे.

## अवैध खताची वाहतूक करणाऱ्या

घटना स्थळी येऊन खताची तपासणी केली. प्राथमिक तपासात सामग्री संशयास्पद आढळल्याने पोलिसांनी सुमारे १६ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी आरोपीं ज्ञानेश रघुनाथ तळेकार (वय ३९) व अनंत रघुनाथ तळेकार (वय ४५, दोघे रा. उत्तम नगर) विरुद्ध आवश्यक वस्तू कायदा आणि खत नियंत्रण आदेशानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शेतकऱ्यांना बनावट किंवा निकृष्ट दर्जाचे खत विकले जाण्याची शक्यता असल्याने कृषी विभागाने केलेली ही कारवाई महत्त्वाची मानली जात आहे. पोलिसांचा पुढील तपास सुरू आहे.

महाराष्ट्र शासन
कार्यालय
कार्यकारी अभियंता
सार्वजनिक बांधकाम (अदिवासी) विभाग,
तपोवन गेट जवळ, पोस्टल कॉलनीच्या मागे, अमरावती- ४४४ ६०२

Email:- eetribal.amt@gmail.com
जावक क्र. साबां आ वि/निविदा २३५५

दुरध्वनी क्र.(०७२१) २६६८०७९
दि.२७/०७/२०२६

ई-निविदा सुचना क्र. १९/२०२६-२७.

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (अदिवासी) विभाग, अमरावती हे स्थापत्य कामाकरिता ब-१ नमुन्यात ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. सार्वजनिक बांधकाम (अदिवासी) विभागातील स्वतंत्र नोंदणीकृत पात्र वर्गातील कंत्राटदाराच निविदा प्रक्रियेत भाग घेवू शकतील. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेत स्थळ https://mahatenders.gov.in येथुन डाउनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (अदिवासी) विभाग, अमरावती यांनी राखून ठेवला आहे, अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

निविदा प्रक्रियेत भाग घेणा-या सर्व कंत्राटदारांनी ई-निविदेसोबत सादर केलेल्या सर्व कागदपत्रांची व निविदेची (Technical) "Hard Copy" सीलबंद लिफाफा क्र.१ मध्ये,Bid Closing वेळेनंतर ७२ तासांच्या आंत सादर करणे आवश्यक आहे. सदर लिफाफा सीलबंद करुन त्यावर कामाचे नांव व कंत्राटदाराचे नांव नोंदवणे आवश्यक आहे.

| कामाचे स्वरुप |
| --- |
| कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (अदिवासी) विभाग, अमरावती हे स्थापत्य कामाकरिता ब-१ नमुन्यात एकुण २६ कामांची ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. सदर कामाकरिता सार्वजनिक बांधकाम (अदिवासी) विभागातील स्थापत्य नोंदणीकृत पात्र वर्गातील कंत्राटदारच निविदा प्रक्रियेत भाग घेवू शकतील. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ https://mahatenders.gov.in येथुन खालील दिनांकास डाऊनलोड/अपलोड करण्यात यावी. निविदा विषयक कामाचे नावे, अंदाजपत्रकीय किंमती संपुर्ण माहिती व अटी शर्ती mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. |

| | | |
| --- | --- | --- |
| ई-निविदा उपलब्ध कालावधी | दिनांक ०४/०८/२०२६,<br>दिनांक ११/०८/२०२६, | ११.०० वाजे पासुन<br>१८.०० वाजे पर्यत |
| ई-निविदा तांत्रिक लिफाफा क्र.१ उघडण्याचा दिनांक | दिनांक १३/०८/२०२६, | रोजी ११.०० वाजता |
| ई-निविदा करीता पात्र कंत्राटदार | :- काम क्र.०१-०३ फक्त सार्वजनिक बांधकाम (अदिवासी) विभागातील नोंदणीकृत, पात्र खुला वर्गा करीता,<br>:- काम क्र.०४-१६ फक्त सार्वजनिक बांधकाम (अदिवासी) विभागातील फक्त नोंदणीकृत, सुशिक्षित बेरोजगार अभियंता अमरावती जिल्हा या वर्गाकरिता.<br>:- काम क्र.१७-२६ फक्त सार्वजनिक बांधकाम (अदिवासी) विभागातील फक्त नोंदणीकृत, मजुर सहकारी संस्था अमरावती जिल्हा या वर्गाकरिता | |

खालील संकेतस्थळावर ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.
१) https://mahatenders.gov.in
(सदर निविदे सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती व विभागीय सुचना फलकावर कळविण्यात येईल)
२) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (अदिवासी) विभाग, अमरावती कार्यालयातील सूचना फलक

सही/-
कार्यकारी अभियंता
सार्वजनिक बांधकाम (अदिवासी) विभाग,
अमरावती

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय
अकोला । वाशिम । बुलडाणा
■ मंगळवार, ४ ऑगस्ट २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४
paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

# वाशिम राजकीय भूकंप : शिंदे सेना व अजित पवार गटाला भगदाड!

## आ. शाम खोडे व आ. सई डहाके यांच्या नेतृत्वात २३ प्रमुख नेत्यांसह ३०० हून अधिक कार्यकर्त्यांचा भाजपात प्रवेश

■ प्रतिनिधी | वाशिम ■

आगामी जिल्हा परिषद निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर वाशिम-मंगरूळपीर, कारंजा मानोरा विधानसभा मतदारसंघात राजकीय वर्तुळातून एक अत्यंत मोठी घडामोड घडून शिवसेना शिंदे गट व राष्ट्रवादी काँग्रेसच्या दिग्गजांनी आपल्या समर्थकांसह मुंबई येथे भाजपा प्रदेश कार्यालयात तीन आगस्ट रोजी प्रवेश करून राजकीय वर्तुळात खळबळ उडून गेली आहे. वाशिम मंगरूळपीर विधानसभा मतदारसंघ आमदार शाम खोडे व कारंजा मानोरा विधानसभा मतदारसंघ आमदार सई डहाके यांच्या नेतृत्वात व भाजपा जिल्हाध्यक्ष पुरुषोत्तम चिंतेलांगे यांच्या प्रमुख उपस्थितीत भाजपा प्रदेश अध्यक्ष रवींद्र चव्हाण व प्रदेश प्रवक्ता नवनाथ बन यांच्या प्रमुख उपस्थितीत पक्ष प्रवेश केला आहे.



महायुतीमधील मित्रपक्षांनाच मोठा सुरुंग लावत, शिंदे सेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार गट) दिग्गज नेत्यांनी भारतीय जनता पक्षात (ॅव्ञ) प्रवेश करण्याचा निर्णय घेतला . वाशिम कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती महादेवराव काकडे, शिवसेना शिंदे गट माजी जिल्हाप्रमुख तथा माजी अर्थ बांधकाम सभापती विजय खानजोडे, माजी पंचायत समिती सभापती भास्कर पाटील शेगीकर, जिल्हा परिषद सदस्य पांडुरंग कोठाळे, जि प सदस्य हरिदास गोदमले, जि प सदस्य सचिन डोपेकर, आनंद राऊत, कृषी उत्पन्न बाजार समिती मंगरूळपीर सचिव रामकृष्ण बाळू पाटील, कृषी उत्पन्न बाजार समिती वाशिम उपसभापती गोवर्धन चव्हाण समवेत दिग्गज नेत्यांसह दीडशे हून अधिक कार्यकर्त्यांनी पक्षात प्रवेश केला आहे तर कारंजा मतदारसंघातही दीडशे हून अधिक पदाधिकाऱ्यांनी भाजपात प्रवेश केला आहे.

एकाच वेळी माजी जिल्हा परिषद सदस्य, माजी पंचायत समिती सभापती, बाजार समितीचे सभापती-उपसभापती आणि विविध सामाजिक व युवक संघटनांच्या प्रमुखांनी एकत्र येऊन भाजपची वाट धरल्यामुळे वाशिम-मंगरूळपीर तालुक्यातील राजकीय खळबळ उडाली आहे. या महाप्रवेशामुळे महायुतीतील शिंदे सेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसला मोठे भगदाड पडले असून भाजपची ताकद वाढणार असल्याचे दिसत आहे. यावेळी भाजपा आमदार शाम खोडे यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विकासात्मक नेतृत्वामुळे व संघटन कौशल्य प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या सक्षम नेतृत्वात भाजपाची राज्यातील भरारी व वाशिम मंगरूळपीर मतदार संघात विकासात्मक कार्यामुळे शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी विश्वास व्यक्त करून आपल्या नेतृत्वात प्रवेश केला आहे आगामी जिल्हा परिषद मध्ये भाजपाचा झेंडा फडकवल्याशिवाय स्वस्त बसणार नाही असा संकल्प त्यांनी यावेळी बोलून दाखविला. जिल्हाध्यक्ष पुरुषोत्तम चितलांगे यांनी सर्व पदाधिकाऱ्यांचे भाजपा स्वागत करू आगामी जिल्हा परिषद व पंचायत समितीमध्ये भाजपाचा झेंडा फडकवावा असे आव्हान केले. यापूर्वी सुद्धा उभाटा जिल्हाप्रमुख सुरेश मापारी यांनी हजारो समर्थकांसह भाजपामध्ये प्रवेश केला होता त्यानंतर पुन्हा सत्ताधारी शिवसेना शिंदे गट व राष्ट्रवादी काँग्रेसच्या दिग्गज नेत्यांनी आपल्या समर्थकांसह भाजपा मध्ये प्रवेश केल्याने भाजपाची ताकद जिल्ह्यात वाढली आहे. मुंबई येथे पार पडलेल्या पक्षप्रवेश कार्यक्रमाला आमदार श्याम खोडे, आमदार सई ताई डहाके, भाजपा जिल्हाध्यक्ष पुरुषोत्तम चितलांगे, नगराध्यक्ष अनिल केंदळे, भाजपा नेते सुरेश मापारी माजी नगराध्यक्ष अशोक हेडा, जिल्हा सरचिटणीस डॉक्टर राजीव काळे, माजी जि प सदस्य नथुजी कापसे, गोलू डहाके समवेत पदाधिकारी उपस्थित होते. भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी वाशिम जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात विकासाची कामे होत असून विविध पक्षाचे पदाधिकारी भाजपामध्ये प्रवेश करीत आहे निश्चितच त्यांच्या विश्वासाला सार्थकी करत विकासाच्या अनेक योजना व निधी उपलब्ध करून देऊ असे स्पष्ट करून आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीमध्ये शतप्रतिशत भाजपा विजयी करा असे आव्हान केले.

# कृषी विज्ञान केंद्र वाशिम यांच्या पुढाकाराने जामखेड येथे 'स्वच्छता ही सेवा' जनजागृती अभियान संपन्न

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

कृषी विज्ञान केंद्र वाशिम यांच्या वतीने 'स्वच्छता ही सेवा' अभियानांतर्गत मौजे जामखेड येथे शनिवार, दि. १ ऑगस्ट रोजी जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संदीप पोफळे हे होते.

यावेळी कृषी विज्ञान केंद्राचे कृषी अर्थशास्त्र विषय विशेषज्ञ डॉ. दिगंबर इंगोले यांनी ग्रामस्थांना वैयक्तिक, घरगुती व सार्वजनिक स्वच्छतेचे महत्त्व, घन व द्रव कचरा व्यवस्थापन, स्वच्छ परिसरामुळे होणारे आरोग्यविषयक, पर्यावरणीय व सामाजिक लाभ याविषयी वैज्ञानिक दृष्टिकोनातून मार्गदर्शन केले. स्वच्छता ही केवळ सामाजिक जबाबदारी नसून निरोगी व शाश्वत ग्रामविकासाचा पाया असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले. तसेच उपस्थित शेतकऱ्यांना खरीप हंगामातील सोयाबीन, तूर व हळद पिकांच्या शास्त्रोक्त व्यवस्थापनाबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. यामध्ये संतुलित अन्नद्रव्य व्यवस्थापन, मृदा परीक्षणावर आधारित खतांचा वापर, तण नियंत्रण, एकात्मिक कीड व रोग व्यवस्थापन, पाण्याचा कार्यक्षम वापर तसेच हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर शाश्वत व हवामान-स्मार्ट शेती तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याचे आवाहन करण्यात आले. कार्यक्रमास गावातील शेतकरी, महिला व ग्रामस्थांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत स्वच्छ, निरोगी व पर्यावरणपूरक गाव निर्मितीसाठी सक्रिय सहभाग नोंदविण्याचा संकल्प व्यक्त केला.



# झोपेत मण्यारचा दंश; ११ वर्षीय चिमुकल्याचा दुर्दैवी मृत्यू

**पातूर तालुक्यातील सस्ती येथील घटना; परिसरात हळहळ**

■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातूर तालुक्यातील सस्ती येथे मण्यार जातीच्या विषारी सापाने दंश केल्याने ११ वर्षीय मुलाचा मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना शनिवारी (२ ऑगस्ट) पहाटे घडली. या घटनेमुळे सस्तीसह परिसरात शोककळा पसरली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सस्ती येथील सुनील वाघ यांचा मुलगा सुजल सुनील वाघ (वय ११) हा शुक्रवारी रात्री घरात झोपला होता. पहाटे सुमारे ४ वाजताच्या सुमारास त्याच्या उशीखाली मण्यार जातीचा साप असल्याचे त्याला जाणवले. त्याने तत्काळ आईला आवाज देत हाताला काहीतरी चावल्याचे सांगितले. कुटुंबीयांनी धाव घेऊन पाहिले असता मण्यार जातीचा साप त्याच्या हाताच्या बोटाला चावल्याचे निदर्शनास आले.

कुटुंबीयांनी तत्काळ कपड्याच्या सहाय्याने साप दूर करून सुजलला जवळील खासगी रुग्णालयात नेले. तेथील डॉक्टरांनी प्राथमिक उपचार करून पुढील उपचारासाठी अकोला येथे हलविण्याचा सल्ला दिला. मात्र, उपचार सुरू असतानाच काही तासांत सुजलची प्राणज्योत मालवली. सुजल हा इयत्ता पाचवीत शिक्षण घेत होता. त्याच्या अकाली निधनाने गावात हळहळ व्यक्त होत आहे.



**चतारी ग्रामीण रुग्णालयात तज्ज्ञ डॉक्टरांची गरज**

पातूर तालुक्यातील चतारी ग्रामीण रुग्णालयावर परिसरातील सुमारे ३५ ते ४० गावांतील नागरिक उपचारासाठी अवलंबून आहेत. परिसरात शेतीचे प्रमाण अधिक असल्याने सर्पदंशाच्या घटना वारंवार घडतात. अशा आपत्कालीन परिस्थितीत त्वरित व तज्ज्ञ उपचार मिळणे आवश्यक असल्याने चतारी ग्रामीण रुग्णालयात तज्ज्ञ डॉक्टरांची कायमस्वरूपी नियुक्ती करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

# ओबीसी जातनिहाय जनगणना जनजागृतीसाठी मंडल यात्रा उद्या वाशिममध्ये स्वागतासाठी जय्यत तयारी

**वाशिम :** ओबीसी समाजाच्या जातनिहाय जनगणनेच्या मागणीबाबत जनजागृती करण्यासाठी भंडारा येथून प्रारंभ झालेली आणि राज्यातील ११ जिल्ह्यांतून प्रवास करणारी 'मंडल यात्रा' मंगळवार, दि. ४ ऑगस्ट रोजी सायंकाळी ६ वाजता वाशिम शहरात दाखल होणार आहे. या यात्रेच्या स्वागतासाठी ओबीसी कृती समिती, वाशिम यांच्या वतीने व्यापक तयारी करण्यात आली असून, समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

यात्रेचे शहरात आगमन झाल्यानंतर ओबीसी कृती समितीच्या वतीने भव्य स्वागत करण्यात येईल. त्यानंतर मन्नासिंग चौक येथील स्वागत लॉन येथे सायंकाळी ७ वाजता जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले आहे. या सभेत सकल ओबीसी महामोर्चाचे विद्यार्थी नेते उमेश कोराम आणि विलास काळे हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहून ओबीसी समाजाच्या जातनिहाय जनगणनेची आवश्यकता, तिचे सामाजिक व आर्थिक महत्त्व आणि भविष्यातील परिणाम यावर मार्गदर्शन करणार आहेत.

# प्रेमाच्या नावाखाली अल्पवयीनीचे आयुष्य उद्ध्वस्त

## फरार पोलीस शिपाई अखेर पोलिसांच्या जाळ्यात

■ प्रतिनिधी | अकोला ■

बाळापूर येथील पोक्सो आणि आत्महत्येस प्रवृत्त केल्याच्या अत्यंत संवेदनशील प्रकरणातील फरार आरोपी पोलीस शिपाई पवन उध्वराव वडगावे याला अकोला पोलिसांनी तब्बल २० दिवसांच्या राज्यांतर शोधमोहीमेनंतर नांदेड जिल्ह्यातून अटक केली. आरोपी स्वतः पोलीस दलातील कर्मचारी असल्याने तपासाची दिशा चुकविण्याचा प्रयत्न करीत सतत ठिकाणे बदलत होता. मात्र तांत्रिक विश्लेषण, गोपनीय माहिती आणि पाच विशेष पथकांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे अखेर पोलिसांना त्याला बेड्या ठोकण्यात यश आले.



१२ जुलै २०२६ रोजी बाळापूर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम ६९, ६४, १०८ तसेच पोक्सो कायद्याच्या कलम ४ व ६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. आरोपी पवन वडगावे हा बाळापूर पोलीस ठाण्यात पोलीस शिपाई म्हणून कार्यरत असताना तो पीडित अल्पवयीन मुलीच्या घरात भाड्याने राहत होता. या काळात त्याने पीडितेशी प्रेमसंबंध प्रस्थापित करून तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप आहे. त्यानंतर लग्नास नकार दिल्याने संबंधित मुलीने गळफास घेऊन आत्महत्येचा प्रयत्न केला. गंभीर अवस्थेत उपचार सुरू असताना तिचा मृत्यू झाला. त्यानंतर पीडितेच्या नातेवाईकांच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविण्यात आला.गुन्हा दाखल होताच आरोपी मूळगावी नांदेड येथे सुट्टीवर असल्याने फरार झाला. पोलीस खात्यातील कर्मचारी असल्यामुळे तपासातील बारकावे माहिती असल्याने तो पोलिसांना सतत गुंगारा देत होता. त्यामुळे आरोपीला अटक करणे पोलिसांसाठी मोठे आव्हान ठरले. या गंभीर प्रकरणाची दखल घेत जिल्हा पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी उपविभागीय पोलीस अधिकारी गजानन पडघन, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक नितीन लेव्हरकर आणि बाळापूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रकाश झोडगे यांना आरोपीचा तातडीने शोध घेऊन अटक करण्याचे आदेश दिले. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेची तीन आणि बाळापूर पोलीस ठाण्याची दोन अशा एकूण पाच विशेष पथकांची स्थापना करण्यात आली. सहा अधिकारी आणि २५ पोलीस कर्मचाऱ्यांनी या मोहिमेत सहभाग घेतला.या पथकांनी हैदराबाद (तेलंगणा), कोईम्बतूर (तामिळनाडू), बेंगळुरू (कर्नाटक), मुंबई, नांदेड आणि हिंगोली येथे आरोपीचा शोध घेतला. त्याचे नातेवाईक, मित्रपरिवार तसेच संभाव्य संपर्कांवर बारकाईने लक्ष ठेवण्यात आले. मागील दहा दिवसांपासून दोन पथके नांदेडमध्ये आणि दोन पथके मुंबईत तळ ठोकून होती. अखेर तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय माहितीच्या आधारे आरोपी पवन उध्वराव वडगावे (रा. नरसी, जि. नांदेड) याला नायगाव तालुक्यातील मारताडा येथून ताब्यात घेण्यात आले.

**२० दिवसांची राज्यांतर शोधमोहीम फळाला; हैदराबाद ते बेंगळुरूपर्यंत शोध, अखेर नांदेडमध्ये अटक**

ही संपूर्ण कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी गजानन पडघन यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.


कारवाईत स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक नितीन लेव्हरकर, बाळापूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रकाश झोडगे, सहाय्यक पोलीस निरीक्षक गोपाल जाधव, पोलीस उपनिरीक्षक अनिल चव्हाण, पोलीस उपनिरीक्षक शरद सैंदाणे यांनी प्रमुख भूमिका बजावली. तसेच पोलीस कर्मचारी प्रशांत बोदडे, आकाश राठोड, शुभम गवई, संदीप पेड, भारत गिरी, अकुंश मोरे, राम देवपुजे, सिद्धार्थ कोयचाडे, सौरभ सातव, अब्दुल माजीद, रविंद्र खंडारे, महेंद्र मलिये, किशोर सोनोने, मंगेश इंगळे, वसिमोद्दीन, राज चंदेल, देवानंद खरात, मनीष ठाकरे आणि प्रकाश लोखंडे यांनी अथक परिश्रम घेत आरोपीला अटक करण्यात मोलाचे योगदान दिले.

# भारत माध्यमिक कन्या शाळेत अण्णाभाऊ साठे जयंती व लोकमान्य टिळक पुण्यतिथी साजरी

■ प्रतिनिधी | रिसोड ■

तालुक्यातील एकमेव मुलींची भारत माध्यमिक कन्या शाळा व कनिष्ठ महाविद्यालयात लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची १०६ वी जयंती आणि लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी विविध उपक्रमांनी साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेच्या प्राचार्या मंजुषा सु. देशमुख होत्या, तर प्रमुख अतिथी म्हणून पर्यवेक्षक सुनील डहाळके उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते अण्णाभाऊ साठे व लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या प्रतिमांचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी विचारमंचावरील मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.



कार्यक्रमात विद्यार्थिनींनी अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकणारी भाषणे केली. तसेच पोवाडे व गीतांच्या माध्यमातून त्यांच्या साहित्यिक आणि सामाजिक कार्याचा जागर करण्यात आला. लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त विद्यार्थिनींनी त्यांच्या राष्ट्रकार्यावर विचार व्यक्त केले.

यावेळी प्रमुख अतिथी सुनील डहाळके यांनी लोकमान्य टिळक यांच्या व्यक्तिमत्त्वावर भाष्य केले. आदर्श नेता धैर्यवान, बुद्धिमान आणि स्वार्थत्यागी असावा लागतो. बुद्धिमत्ता, गतिमानता, धैर्य आणि त्याग या गुणांचा संगम लोकमान्य टिळक यांच्या व्यक्तिमत्त्वात दिसून येतो. इतिहासाला अभिमानाने स्मरण करता यावे यासाठी नियतीने काही असामान्य व्यक्तींना जन्म दिला असावा आणि लोकमान्य टिळक हे त्यापैकीच एक होते, असे त्यांनी सांगितले.

अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्या मंजुषा सु. देशमुख यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. अण्णाभाऊंचे जीवन संघर्षाची गाथा असून त्यांनी मराठी साहित्याला मोठे योगदान दिले. त्यांच्या साहित्यामध्ये ३५ कादंबऱ्या, १५ कथासंग्रह, १५ नाटके, वगनाट्य आणि प्रवासवर्णनाचा समावेश आहे. त्यांचे साहित्य जगातील विविध २७ भाषांमध्ये अनुवादित झाले आहे. ब्रिटिश राजवटीने गुन्हेगार ठरविलेल्या जमातीत जन्मलेल्या अण्णाभाऊंनी त्या समाजाच्या व्यथा-वेदना आपल्या साहित्यातून मांडून त्यांना वाचा फोडली, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन साधना बोरकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन राठोड यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थिनींनी सहकार्य केले.

# कुलगुरू डॉ. शरद गडाख यांना मानद 'कर्नल कमांडंट' पदवी

## एनसीसी क्षेत्रातील योगदानाची भारत सरकारकडून दखल ; विद्यापीठात पिपिंग समारंभ उत्साहात

■ प्रतिनिधी | अकोला ■

डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद रामराव गडाख यांना राष्ट्रीय छात्र सेना (एनसीसी) क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल भारत सरकारच्या संरक्षण मंत्रालयातर्फे मानद 'कर्नल कमांडंट' पदवी बहाल करण्यात आली आहे. भारत सरकारच्या २ मे २०२६ रोजीच्या राजपत्र अधिसूचनेनुसार हा सन्मान मंजूर करण्यात आला असून, कुलगुरू म्हणून त्यांच्या कार्यकाळासाठी ही मानद पदवी प्रदान करण्यात आली आहे.

या मानद पदवीचा पिपिंग समारंभ विद्यापीठ परिसरात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. अमरावती ग्रुपचे ग्रुप कमांडर ब्रिगेडियर सचिन सुहास गवळी यांच्या हस्ते डॉ. गडाख यांना मानद पदवी प्रदान करण्यात आली. यावेळी ११ महाराष्ट्र एनसीसी बटालियन, अकोलाचे कमांडिंग ऑफिसर कर्नल व्ही. एन. शुक्ला (VSM) प्रमुख उपस्थित होते.



समारंभास कुलगुरूंच्या पत्नी सौ. मंदाकिनी गडाख, अधिष्ठाता डॉ. देवानंद पंचभाई, विद्यापीठातील सर्व संचालक, विभागप्रमुख, प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी, एनसीसी अधिकारी, माजी अधिकारी, एनसीसी कॅडेट्स तसेच विविध महाविद्यालयांचे प्राचार्य आणि मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन लेफ्टनंट उज्वला सिरसाट (एएनओ) यांनी केले, तर आभार विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. संदीप हाडोळे यांनी मानले.

समारंभादरम्यान विद्यापीठाच्या एनसीसी तुकडीने ग्रुप कमांडर ब्रिगेडियर सचिन गवळी आणि मानद कर्नल कमांडंट डॉ. शरद गडाख यांना गार्ड ऑफ ऑनर देत मानवंदना दिली. मार्गदर्शनपर भाषणात ब्रिगेडियर सचिन गवळी यांनी एनसीसीची उद्दिष्टे, विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासातील भूमिका, शिस्त, नेतृत्वगुण आणि राष्ट्रसेवेचे महत्त्व अधोरेखित केले. तर डॉ. शरद गडाख यांनी हा सन्मान विद्यापीठ, एनसीसी अधिकारी, कर्मचारी आणि कॅडेट्स यांच्या सामूहिक प्रयत्नांचे फलित असल्याचे सांगत सर्वांचे आभार मानले. महाविद्यालयीन जीवनात स्वतः एनसीसी कॅडेट असल्याचा अभिमानही त्यांनी व्यक्त केला.

यावेळी कर्नल व्ही. एन. शुक्ला यांनी पीडीकेव्हीच्या एनसीसी युनिटने राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर केलेल्या उल्लेखनीय कामगिरीचा आढावा घेतला. अमरावती ग्रुपमध्ये सातत्याने विजेतेपद, महाराष्ट्रात प्रथम क्रमांक, दिल्ली सायकल रॅलीतील सहभाग तसेच विविध राष्ट्रीय शिबिरांतील उत्कृष्ट यशामुळे विद्यापीठाच्या एनसीसी युनिटची देशपातळीवर वेगळी ओळख निर्माण झाल्याचे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाची सांगता एनसीसी गीत, राष्ट्रगीत तसेच विद्यापीठात नव्याने उभारण्यात आलेल्या अडथळा प्रशिक्षण सुविधा केंद्राच्या उद्घाटनाने झाली.

## जाहीर नोटीस

**वि.०२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १०७९/२०२६ — प्रोसेस नं.८६५१/२०२६

चौ.ता. ०६/०८/२०२६ — दिनांक : १०/०७/२०२६

**अर्जदार :** . विवेक बाबुराव महाकुलकर २. मिना बाबुराव महाकुलकर दोघेही रा. घर नं. १०९९/१४४, बालाजी प्रोव्हीजन जवळ, खडकी बु, संतोष नगर, अकोला. ता. जि. अकोला. ३. वैशाली अमन टेमुर्डे रा. स्पलेंडर २/३०२, प्रोझोन पाम, वर्धा रस्तासमोर, चिंचभवन, नागपूर, एअरपोर्ट नागपूर, ता. जि. नागपूर.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.

**मयताचा पत्ता :-** मयत : बाबुराव विठ्ठलराव महाकुलकर

**पत्ता :-** रा. गौरक्षण रोड, अकोला, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत बाबुराव विठ्ठलराव महाकुलकर यांचे दि. २७/०५/२०२६ रोजी गौरक्षण रोड, अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०६/०८/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १०/०७/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक २४८ ■ मंगळवार ४ ऑगस्ट २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.००रु


# भरधाव कारची स्कूल व्हॅनला धडक

## १५ विद्यार्थी जखमी, ६ गंभीर

### करंजी-काजी परिसरातील भीषण दुर्घटना; सेवाग्राम रुग्णालयात उपचार सुरू, अपघातानंतर कारचालक फरार

**वर्धा जनमाध्यम** : वर्धा-मदनी मार्गावरील करंजी-काजी परिसरात सोमवारी सकाळी भरधाव कारने शाळकरी विद्यार्थ्यांना घेऊन जाणाऱ्या स्कूल व्हॅनला जोरदार धडक दिल्याने भीषण अपघात झाला. या दुर्घटनेत व्हॅनमधील १५ विद्यार्थी जखमी झाले असून त्यापैकी ६ विद्यार्थ्यांची प्रकृती गंभीर आहे. सर्व जखमी विद्यार्थ्यांवर सेवाग्राम येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत. सुदैवाने या भीषण अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नाही. करंजी-काजी येथील चालक साठोणे हे नेहमीप्रमाणे मदनी, दिंदोडा आणि करंजी-काजी येथून विद्यार्थ्यांना घेऊन वर्ध्यातील सुशील हिम्मतसिंगका विद्यालय व महिला आश्रम बुनियादी प्राथमिक विद्यालयाकडे जात होते. एमएच-३४ एबी-८११४ क्रमांकाच्या स्कूल व्हॅनमध्ये सुमारे १६ विद्यार्थी प्रवास करत होते. सकाळी साडेआठच्या सुमारास व्हॅन करंजी-काजी परिसरात पोहोचताच वर्ध्याकडून मदनीच्या दिशेने भरधाव येणाऱ्या एमएच-३२ एएस-४९४० क्रमांकाच्या कारने व्हॅनला जोरदार धडक दिली. धडकेची तीव्रता इतकी होती की स्कूल व्हॅन रस्त्यावर उलटली. अपघातानंतर घटनास्थळी एकच गोंधळ उडाला. अपघाताची माहिती मिळताच परिसरातील ग्रामस्थांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत जखमी विद्यार्थ्यांना व्हॅनमधून बाहेर काढले आणि उपचारासाठी सेवाग्राम रुग्णालयात रवाना केले. दरम्यान, अपघातानंतर कारचालक वाहन घटनास्थळी सोडून फरार झाल्याची माहिती मिळाली. घटनेची माहिती मिळताच सेवाग्राम



पोलीस ठाण्याचे ठाणेदार देवेंद्र ठाकूर यांच्या नेतृत्वाखालील पथक घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी पंचनामा करून कार ताब्यात घेतली असून फरार चालकाचा शोध सुरू आहे. या प्रकरणी सेवाग्राम पोलिसांनी गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे.

**मदतीसाठी ग्रामस्थांचा तत्पर प्रतिसाद** - अपघात होताच करंजी-काजी परिसरातील नागरिकांनी क्षणाचाही विलंब न करता घटनास्थळी धाव घेतली. व्हॅनमध्ये अडकलेल्या विद्यार्थ्यांना सुरक्षित बाहेर काढून तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात ग्रामस्थांनी मोलाची भूमिका बजावली. या अपघातात भूमिका नखाते, ओम नागतोडे, हार्दिक नैताम, जान्हवी तिखे, अथर्व चरडे, धनश्री चौधरी, पवन तिखे, चिराग कुबडे, अंशू नागतोडे, विधी सोनटक्के, जान्हवी सडमाके, युग तिमांडे, गुंजन उगेमुगे, आर्या बागडे आणि मीनाक्षी तिमांडे हे विद्यार्थी जखमी झाले आहेत. हे सर्व विद्यार्थी पहिली ते दहावीपर्यंत शिक्षण घेत असून सर्वांवर सेवाग्राम रुग्णालयात उपचार सुरू आहेत. डॉक्टरांच्या माहितीनुसार सहा विद्यार्थ्यांची प्रकृती गंभीर असून उर्वरित विद्यार्थ्यांची प्रकृती स्थिर आहे.

# वाहनाच्या धडकेत तरुण ठार, दोघे गंभीर

### समृद्धी महामार्गाच्या विरुळ इंटरचेंज परिसरातील घटना

**विरुळ (आकाजी) जनमाध्यम** : समृद्धी महामार्गावरील विरुळ इंटरचेंज परिसरात सोमवारी (दि. ३) सायंकाळी साडेपाचच्या सुमारास झालेल्या भीषण अपघातात विरुळ येथील तरुण अक्षय उपासे (वय ३०) यांचा जागीच मृत्यू झाला, तर त्यांच्यासोबत असलेले अभय आगलावे व आशिष नरांजे हे दोघे गंभीर जखमी झाले. भरधाव वेगाने आलेल्या अज्ञात वाहनाने दुचाकीला दिलेल्या जोरदार धडकेमुळे हा भीषण अपघात घडला.

या घटनेने विरुळ परिसरात शोककळा पसरली असून समृद्धी इंटरचेंजवरील वाढत्या अपघातांमुळे नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अक्षय उपासे हे एमएच-३२ एआर-०८५६ क्रमांकाच्या दुचाकीने पुलगाववरून विरुळकडे परत येत होते. त्यांच्यासोबत अभय आगलावे व आशिष नरांजे हे दोघेही प्रवास करत होते. समृद्धी इंटरचेंजच्या पुलाखाली आल्यानंतर



आर्वीकडून भरधाव वेगाने आलेल्या अज्ञात वाहनाने त्यांच्या दुचाकीला समोरून जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की अक्षय उपासे यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला, तर दोन्ही साथीदार गंभीर जखमी झाले.

घटनेची माहिती मिळताच पुलगाव पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. जखमींना तत्काळ पुलगाव येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले असून अज्ञात वाहनाचा शोध सुरू आहे. या प्रकरणी पुढील तपास पुलगाव पोलीस करीत आहेत.

**अपघातांची मालिका सुरूच... नागरिकांमध्ये संताप**

समृद्धी इंटरचेंज परिसर अपघातांचा 'ब्लॅक स्पॉट' ठरत असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली आहे. गेल्या महिन्यात याच परिसरात झालेल्या भीषण अपघातात सहा जणांचा मृत्यू झाला होता. त्याआधी मे महिन्यात चार जणांचा, तर दोन महिन्यांपूर्वी तीन तरुणांचा याच ठिकाणी अपघातात बळी गेला होता. तरीही या ठिकाणी प्रभावी सुरक्षा उपाययोजना न झाल्याने अपघातांची मालिका कायम आहे. वेगमर्यादेची कठोर अंमलबजावणी, सीसीटीव्ही, इशारा फलक आणि कायमस्वरूपी सुरक्षा व्यवस्था तातडीने उभारण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

समृद्धी महामार्गाच्या विरुळ इंटरचेंज परिसरात सोमवारी सायंकाळी सुमारे ५.३० वाजण्याच्या सुमारास भीषण अपघात घडून एका तरुणाचा जागीच मृत्यू झाला, तर त्याच्यासोबत असलेले दोन जण गंभीर जखमी झाले. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून समृद्धी इंटरचेंज परिसरातील वाढत्या अपघातांबाबत नागरिकांनी तीव्र चिंता व्यक्त केली आहे.

## एलसीबीचा दणका!

# नागपूरहून येणारा १४.२० लाखांचा विदेशी दारूसाठा जप्त

### सेलूजवळ नाकाबंदीत कारवाई; एर्टिगासह दोन आरोपींवर गुन्हा, अवैध मद्यतस्करीचा पर्दाफाश

**वर्धा जनमाध्यम** : जिल्ह्यात अवैध मद्यतस्करीविरोधात स्थानिक गुन्हे शाखेने मोठी कारवाई करत नागपूरहून वर्ध्याकडे आणला जात असलेला विदेशी दारू व बिअरचा साठा जप्त केला. सेलूजवळील नागपूर-वर्धा महामार्गावर लावलेल्या नाकाबंदीत ही कारवाई करण्यात आली. या कारवाईत १४ लाख २० हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल, त्यात चारचाकी वाहनासह विदेशी दारू व बिअर कॅन जप्त करण्यात आले. २ ऑगस्ट रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक सेलू पोलीस ठाण्याच्या हद्दीत गस्त घालत असताना गोपनीय माहिती मिळाली. त्यानुसार इशान अनिलराव आदमने (२९, रा. कुटकी तळोदी, ता. सेलू, सध्या केळकरवाडी, वर्धा) हा एमएच-३२-एएक्स-३३९७ क्रमांकाच्या मारुती सुझुकी एर्टिगा वाहनातून नागपूर जिल्ह्यातून विदेशी दारू व बिअरचा साठा वर्ध्यात विक्रीसाठी आणत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. पोलीस निरीक्षक विनोद चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली भारत पेट्रोलियम पेट्रोल पंपासमोर महामार्गावर सापळा रचण्यात आला. संशयित वाहन थांबवून तपासणी केली असता त्यात विविध कंपन्यांच्या विदेशी दारूच्या सिलबंद बाटल्या तसेच बडवायझर मॅग्नम, कार्ल्सबर्ग आणि ट्युबोर्ग कंपनीच्या बिअर कॅन आढळून आल्या. दारूचा साठा २ लाख २० हजार ८०० रुपये, तर वाहनाची किंमत १२ लाख रुपये असल्याचे निष्पन्न झाले. प्राथमिक चौकशीत हा मद्यसाठा वर्ध्यातील शाहरूख बेग



याचा असल्याची माहिती समोर आली. या प्रकरणी दोन्ही आरोपींविरुद्ध सेलू पोलीस ठाण्यात महाराष्ट्र दारुबंदी कायद्याच्या कलम ६५(अ)(ई), ७७(अ), ८३ तसेच मोटार वाहन कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून अवैध मद्यतस्करीच्या साखळीचा शोध घेण्यासाठी पुढील तपास सुरू आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल व अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विनोद चौधरी, पोउपनि. राहुल इटेकार तसेच भुषण निघोट, धर्मेंद्र अकाली, अमोल नगराळे आणि मंगेश चावरे यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

# सीसीटीव्हीत कैद एटीएम फोडणारी चौकडी

## तोंडाला कापड बांधून गॅस कटरने १२.२२ लाखांवर डल्ला;

### पोलिसांचे सात पथक राज्याबाहेर रवाना, सुरक्षा यंत्रणाही संशयाच्या भोवऱ्यात

**वर्धा जनमाध्यम** : वर्धा जिल्ह्यातील मोरांगणा येथे बँक ऑफ इंडियाच्या एटीएमवर गॅस कटरने धाडसी दरोडा टाकणाऱ्या चोरट्यांचा महत्त्वाचा सुगावा पोलिसांच्या हाती लागला आहे. एटीएम परिसरातील सीसीटीव्ही फुटेजमध्ये तोंडाला कापड बांधून चार जण एटीएम फोडताना स्पष्टपणे दिसून आले आहेत. त्यामुळे ही चोरी अत्यंत नियोजनबद्ध असून या टोळीत चारपेक्षा अधिक सदस्य असण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे. या घटनेने जिल्ह्यात खळबळ उडाली असून पोलिसांनी आरोपींच्या शोधासाठी सात विशेष पथके तयार करून राज्याबाहेरही तपासाचे जाळे पसरविले आहे.

शनिवारी मध्यरात्रीच्या सुमारास खरांगणा (मो.) पोलिस ठाण्याच्या हद्दीतील मोरांगणा गावातील आर्वी-वर्धा मार्गावरील बँक ऑफ इंडियाच्या एटीएमवर चोरट्यांनी हल्ला चढविला. गॅस कटरच्या सहाय्याने एटीएम मशीन फोडून त्यामधील तब्बल १२ लाख २२ हजार रुपयांची रोकड लंपास करण्यात आली. चोरीनंतर घटनास्थळावरील कचऱ्याने पेट घेतल्याने काही नागरिकांनी आग विझविली मात्र त्यावेळी एटीएम फोडून रोकड चोरीला गेल्याचे कुणाच्याही लक्षात आले नाही. रविवारी सकाळी एटीएम उघडून पाहिल्यानंतर चोरीचा प्रकार उघडकीस येताच परिसरात एकच खळबळ उडाली.

घटनेची माहिती मिळताच पोलिस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल, अपर पोलिस अधीक्षक सदाशिव वाघमारे, उपविभागीय पोलिस अधिकारी वंदना कारखेले तसेच खरांगणा पोलिस ठाण्याचे निरीक्षक चंद्रकांत पाटील यांनी घटनास्थळी धाव घेत बारकाईने पाहणी केली. श्वान पथक, ठसे तज्ज्ञ आणि तांत्रिक तपास पथकाच्या मदतीने पुरावे गोळा



करण्यात आले. त्यानंतर गुन्हा दाखल होताच आरोपींच्या शोधासाठी सात स्वतंत्र पथके रवाना करण्यात आली.

दरम्यान, सोमवारी तपासात मोठी प्रगती झाली. एटीएम परिसरातील सीसीटीव्ही फुटेज पोलिसांनी ताब्यात घेऊन त्याचे सूक्ष्म विश्लेषण सुरू केले आहे. या फुटेजमध्ये चार जण तोंडाला कापड बांधून एटीएम फोडताना दिसत आहेत. चेहरा लपविण्याचा प्रयत्न आणि नियोजनबद्ध हालचाली पाहता ही व्यावसायिक गुन्हेगारांची टोळी असल्याचा प्राथमिक अंदाज तपास यंत्रणांनी व्यक्त केला आहे. या टोळीने यापूर्वीही अशाच प्रकारच्या गुन्ह्यांची मालिका केली असण्याची शक्यताही नाकारता येत नसल्याने पोलिस त्या दृष्टीने तपास करत आहेत.

तांत्रिक पुरावे, सीसीटीव्ही फुटेज आणि गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांची काही पथके राज्याबाहेर रवाना झाली असून आरोपी लवकरच जेरबंद होतील, असा विश्वास वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे.

**पोलिस ठाण्याच्या हाकेच्या अंतरावर चोरी; सायरन मात्र शांतच**

ज्या एटीएमवर दरोडा टाकण्यात आला ते एटीएम खरांगणा (मो.) पोलिस ठाण्यापासून हाकेच्या अंतरावर आहे. एटीएम मशीनशी छेडछाड झाल्यास तत्काळ सायरन वाजणे आणि सुरक्षा कंपनीच्या नियंत्रण कक्षाला अलर्ट जाणे अपेक्षित असते. मात्र या प्रकरणात ना सायरन वाजला, ना संबंधित कंपनीला वेळेवर माहिती मिळाली. त्यामुळे एटीएमच्या सुरक्षा व्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, या निष्काळजीपणाचीही चौकशी होण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

# आज पाणी जिरवा..उद्या जीवन वाचवा

### जलसंधारणासाठी लोकचळवळीची हाक ; डॉ. सचिन पावडे यांचे आवाहन

**वर्धा जनमाध्यम** : आज पावसाच्या प्रत्येक थेंबाचे संवर्धन केले नाही, तर उद्या पिण्याच्या पाण्यासाठी वणवण भटकण्याची वेळ येईल, असा इशारा देत जलसंधारण ही केवळ सरकारी योजना नसून जनतेची लोकचळवळ बनली पाहिजे, असे आवाहन जनजागृती मंचाचे अध्यक्ष डॉ. सचिन पावडे यांनी केले. नगराध्यक्षांच्या दालनात आयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी जलसंकटाचे भीषण वास्तव मांडत प्रत्येक नागरिकाने पाणी अडवा, पाणी जिरवा ही संकल्पना अंगीकारण्याचे आवाहन केले.

यावेळी नगराध्यक्ष सुधीर पांगुळ, श्याम भेंडे आदी उपस्थित होते. डॉ. पावडे म्हणाले की, भूजल पातळी सातत्याने खालावत असून भविष्यात शुद्ध पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई निर्माण होण्याचा धोका आहे. दूषित पाण्यामुळे आरोग्यावरही गंभीर परिणाम होऊ शकतात. त्यामुळे प्रत्येक घर, संस्था आणि शासकीय कार्यालयाने पावसाच्या पाण्याचे संकलन व भूजल पुनर्भरणाची जबाबदारी स्वीकारली पाहिजे.

एल निनोच्या परिणामांबाबत माहिती देताना त्यांनी सांगितले की, प्रशांत महासागरातील तापमानवाढीचा परिणाम भारतीय मान्सूनवर होत असून पावसाचे प्रमाण घटते. त्याचा फटका शेती, धरणे, विहिरी आणि पिण्याच्या पाण्याच्या उपलब्धतेवर बसतो. त्यामुळे जलसंधारणाला पर्याय नाही.

इस्रायलचे उदाहरण देत त्यांनी सांगितले की, कमी पाऊस असूनही तेथे अत्याधुनिक जलव्यवस्थापनामुळे पाण्याचा पुनर्वापर आणि शुद्धीकरण प्रभावीपणे केले जाते. आपल्या भागात मात्र वाढते काँक्रीटीकरण आणि अपुऱ्या जलसंधारणामुळे पावसाचे पाणी थेट नाले-नद्यांमध्ये



वाहून जाते. पाणीटंचाई ही केवळ पावसाअभावी नसून नियोजनाच्या अभावामुळे निर्माण होते, असे त्यांनी स्पष्ट केले.

शहरांना 'स्पंज सिटी' संकल्पनेनुसार विकसित करण्याची गरज व्यक्त करत त्यांनी पावडे चौक ते धुनिवाले मठ मार्गावर रस्त्यालगत सहा फूट खोल खड्डे खोदून त्यामध्ये गिट्टी व वाळू भरून पाणी जमिनीत मुरविण्याचा प्रायोगिक उपक्रम राबविण्यात येणार असल्याची माहिती दिली. या मोहिमेत प्रशासनाबरोबरच नागरिकांनीही पुढाकार घेऊन जलसंधारणाची व्यापक लोकचळवळ उभी करावी, असे आवाहन त्यांनी केले.

## निधन वार्ता

### प्रशांत कलोडे



**वर्धा** : गांधीनगर येथील रहिवासी बाबा कॉम्प्युटर्सचे संचालक प्रशांत कलोडे (वय ५०) यांचे आज सकाळी १० वाजता अपघाती निधन झाले. कलोडे यांनी अनेक वर्षे प्रादेशिक दैनिकात संगणक चालक म्हणूनही काम केले होते. त्यांच्या पार्थिवावर बोरगाव मेघे येथील मोक्षधामात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात आई, पत्नी आणि २ मुले असा परिवार आहे.

## जाहीर नोटीस

माझे अशील श्री. निरज सुरेशराव घोडे हे मौजा गिरोली (इंगळे), ता. देवळी, जि. वर्धा येथील ग्रामपंचायत गिरोली (इंगळे) हद्दीतील वॉर्ड क्र. ०२ मधील मालमत्ता क्र. ६२, मालमत्ता क्र. ९६ व मालमत्ता क्र.९९ (बक्षीसपत्रानुसार) या मिळकतीचे क्षेत्रफळ ९९.९० चौ.मी. (१०७५.००चौ.फुट) असून त्यावर बांधकाम केलेले घर आहे. सदर मालमत्तेच्या सीमा पुढीलप्रमाणे आहेत

**:-पूर्वेस – सौ. पपिता ठुल यांचे घर,**
**पश्चिमेस – श्री. वासुदेव घोडे यांचे घर,उत्तरेस – गल्ली,**
**दक्षिणेस – श्री. मारोतराव घोडे यांचे घर व रस्ता,**

श्री. सुरेशराव दादाजी घोडे यांचेकडे सदर मालमत्ता ग्रामपंचायतीने दिलेल्या प्रमाणपत्रानुसार व बक्षीसपत्रातील पृष्ठ क्र. १९/२२ वर जोडलेल्या दाखल्याप्रमाणे वडिलोपार्जित मालमत्ता म्हणून होती. श्री. सुरेशराव दादाजी घोडे यांनी मालमत्ता क्र. ९६ (बक्षीसपत्रानुसार) व मालमत्ता क्र. ६२ (असेसमेंटनुसार), क्षेत्रफळ ९९.९०चौ.मी. (१०७५.००चौ.फुट) व त्यावरील बांधकामासह असलेली मालमत्ता दिनांक २०/०२/२०२४ रोजी दस्त नोंदणी क्र. ४४२/२०२४ अन्वये श्री. निरज सुरेशराव घोडे यांच्या नावे बक्षीसपत्र करून दिली आहे. सदर बक्षीसपत्रामध्ये नमूद केलेल्या मोबदल्याप्रमाणे विचार करण्यात आलेला असून त्यानुसार मुद्रांक शुल्क भरलेले आहे. त्यामुळे सदर मालमत्तेवरील सर्व हक्क, मालकी व स्वारस्य श्री. निरज सुरेशराव घोडे यांचेकडे हस्तांतरित झालेले आहे.

श्री. निरज सुरेशराव घोडे यांनी जना स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड येथे कर्जासाठी अर्ज केलेला आहे.त्यामुळे सर्व संबंधितांना व सर्वसामान्य जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, वरील व्यवहाराबाबत कोणास काही हरकत, आक्षेप किंवा दावा असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत खालील पत्त्यावर संपर्क साधावा. अन्यथा कोणतीही हरकत नसल्याचे गृहित धरून पुढील कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

**ॲड. आर. आर. तिवारी**
**रामनगर, वर्धामोबा. क्र. ९९२२४२६१६८**

## जाहीर नोटीस

माझे अशील श्री. मनोज दीपक भायानी हे मौजा सावंगी मेघे, मौजा क्र. १३८ प.ह. क्र. १९, , सर्वे क्र. ३६५/२, ३६७/२ मधील प्लॉट क्र. ९३, ता. व जि. वर्धा, ग्रामपंचायत सावंगी मेघे येथील क्षेत्रफळ १२८ चौ.मी. (१३७७.२८ चौ.फुट) असलेल्या मालमत्तेचे मालक आहेत. सदर मालमत्तेच्या सीमा पुढीलप्रमाणे आहेत :-

**पूर्वेस – ६ मी. लेआऊट रस्ता,**
**पश्चिमेस – प्लॉट क्र. ६६,**
**उत्तरेस – प्लॉट क्र. ९२,**
**दक्षिणेस – लेआऊट**

सौ. उषा प्रकाश पांडे यांनी प्लॉट क्र. ९३ क्षेत्रफळ १२८.०० चौ.मी. ही मालमत्ता दिनांक १९/०५/२०२५ रोजी दस्त नोंदणी क्र. १९७२/२०२५ अन्वये दुय्यम निबंधक, वर्धा यांच्या कार्यालयात श्री. मनोज दीपक भायानी यांना विक्री केली आहे. सदर व्यवहाराचा फेरफार संबंधित तलाठी यांनी विक्रीखताच्या इंडेक्स-२ व इतर संबंधित कागदपत्रांची पडताळणी करून, ती कायदेशीर व अस्सल असल्याची खात्री करून महसूल अभिलेखात नोंदविला आहे.

त्यानंतर श्री. मनोज दीपक भायानी यांनी प्लॉट क्र. ९३ क्षेत्रफळ १२८.०० चौ.मी. बाबत कर्जदार श्री. सूरज पंढरी राजूरकर यांचेसोबत दिनांक २९/०७/२०२६ रोजी विक्री करारनामा केला आहे.

माझ्या अशिलांचे मूळ लिंक विक्रीखत दिनांक १५/०५/२०२३, दस्त क्र. १४२३ हरवले असून त्याबाबत त्यांनी पोलीस ठाण्यात एफ.आय.आर. दाखल केली आहे. श्री. सूरज पंढरी राजूरकर यांनी इंडसइंड बँक येथे कर्जासाठी अर्ज केलेला आहे.त्यामुळे सर्व संबंधितांना व सर्वसामान्य जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, वरील व्यवहारांबाबत कोणास काही हरकत, आक्षेप किंवा दावा असल्यास अथवा हरवलेले विक्रीखत कोणास मिळाल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत खालील पत्त्यावर संपर्क साधावा. अन्यथा कोणतीही हरकत नसल्याचे गृहित धरून पुढील कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

**ॲड. आर. आर. तिवारी**
**रामनगर, वर्धामोबा. क्र. ९९२२४२६१६८**

## जाहीर नोटीस

माझे अशील श्री. जितेन सुरेश बालवे हे मौजा सावंगी मेघे, मौजा क्र. १३८, तलाठी साजा क्र. १९, ग्रामपंचायत सावंगी मेघे हद्दीतील, ता. व जि. वर्धा – ४४२००१येथील खसरा क्र. १४९/१ख (जुना) / १९७(नवीन) मधील प्लॉट क्र. ७, क्षेत्रफळ २७८.८६ चौ.मी. असलेल्या मालमत्तेचे मालक आहेत. सदर मालमत्तेच्या सीमा पुढीलप्रमाणे आहेत **:-पूर्वेस – रस्ता**

**पश्चिमेस – प्लॉट क्र. १,**
**उत्तरेस – पांदण,**
**दक्षिणेस – प्लॉट क्र. ८,**

श्री. हिरामण मोतीराम क्षीरसागर यांनी त्यांच्या मुखत्यारपत्रधारक मोहम्मद मुर्तुजा मोहम्मद यासीन मन्सुरी यांच्यामार्फत वरील प्लॉट क्र. ७, क्षेत्रफळ २७८.८६ चौ.मी., खसरा क्र. १४९/१ख (जुना) / १९७ (नवीन), मौजा सावंगी मेघे ही मालमत्ता दिनांक ०५/०२/२०२१ रोजी विक्रीखताद्वारे श्री. जितेन सुरेश बालवे यांना विक्री केली असून सदर विक्रीखत दुय्यम निबंधक, वर्धा यांच्याकडे अनुक्रमांक ६३६ ने विधिवत नोंदणीकृत आहे.

माझ्या अशिलांचे मूळ लिंक विक्रीखत दिनांक १५/०५/२००१, अनुक्रमांक १५७७ तसेच मूळ मुखत्यारपत्र दिनांक ०८/०१/२०२१, दस्त क्र. ९३/२०२१ हरवले असून ते सापडत नाहीत.

श्री. जितेन सुरेश बालवे यांनी एसएमएफजी इंडिया क्रेडिट कंपनी लिमिटेड येथे कर्जासाठी अर्ज केलेला आहे.

त्यामुळे सर्व संबंधितांना व सर्वसामान्य जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, वरील व्यवहाराबाबत कोणास काही हरकत, आक्षेप किंवा दावा असल्यास अथवा हरवलेले मूळ विक्रीखत व मुखत्यारपत्र कोणास मिळाल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत खालील पत्त्यावर संपर्क साधावा. अन्यथा कोणतीही हरकत नसल्याचे गृहित धरून पुढील कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

**ॲड. आर. आर. तिवारी**
**रामनगर, वर्धामोबा. क्र. ९९२२४२६१६८**

## जाहीर नोटीस

माझे अशील श्री. प्रमोद अशोकराव उके हे मौजा एकलासपूर, ता. देवळी, जि. वर्धा येथील ग्रामपंचायत एकलासपूर हद्दीतील विभाग क्र. ०४, प.ह. क्र. ०१वॉर्ड क्र. ०४, फिल्ड सर्व्हे क्र. २६ मधील प्लॉट क्र. १० व मालमत्ता क्र. ३८०३ या मिळकतीचे क्षेत्रफळ १५०.०० चौ.मी. म्हणजेच १६१४.०० चौ.फुट असलेल्या मालमत्तेचे मालक आहेत. सदर मालमत्तेच्या सीमा पुढीलप्रमाणे आहेत :-

**पूर्वेस – ६ मी. लेआऊट रस्ता,**
**पश्चिमेस – शेती क्षेत्र**
**उत्तरेस – प्लॉट क्र. ०९,**
**दक्षिणेस – प्लॉट क्र. ११,**

सौ. शकुंतला पंजाबराव दाफळे यांनी प्लॉट क्र. १० व मालमत्ता क्र. ३८०३ क्षेत्रफळ १५०.०० चौ.मी. (१६१४.००चौ.फुट) ही मालमत्ता दिनांक १०/०२/२०२५ रोजी दस्त नोंदणी क्र. ४७१/२०२५ अन्वये श्री. प्रमोद अशोकराव उके यांच्या नावे विक्री केली आहे.

माझ्या अशिलांचे मूळ लिंक विक्रीखत दिनांक ०५/०१/२००४ दस्त क्र. ३४/२००४ हरवले असून त्याबाबत श्री. प्रमोद अशोकराव उके यांनी पोलीस ठाण्यात एफ.आय.आर. दाखल केली आहे.श्री. प्रमोद अशोकराव उके यांनी मुथूट हाउसिंग फायनान्स कंपनी लि. येथे कर्जासाठी अर्ज केलेला आहे.त्यामुळे सर्व संबंधितांना व सर्वसामान्य जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, वरील व्यवहाराबाबत कोणास काही हरकत, आक्षेप किंवा दावा असल्यास अथवा हरवलेले विक्रीखत कोणास मिळाल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७(सात) दिवसांच्या आत खालील पत्त्यावर संपर्क साधावा. अन्यथा कोणतीही हरकत नसल्याचे गृहित धरून पुढील कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

**ॲड. आर. आर. तिवारी**
**रामनगर, वर्धा**
**मोबा. क्र. ९९२२४२६१६८**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# उत्तराखंडमध्ये भूस्खलन, हायवे बंद; छत्तीसगडमध्ये पूल कोसळला

## UPच्या रस्त्यांवर बोटी, बिहार-झारखंडमध्ये वीज कोसळून 10 ठार

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** उत्तराखंडमधील उत्तरकाशी येथे अनेक ठिकाणी दरडी कोसळल्यामुळे यमुनोत्री राष्ट्रीय महामार्ग बंद झाला आहे. यामुळे प्रवाशांची मोठी गैरसोय होत आहे. रु द्रप्रयागमध्येही सततच्या पावसामुळे अनेक भागांत दरडी कोसळण्याचा धोका वाढला आहे. छत्तीसगडमध्ये मुसळधार पावसामुळे बिलासपूर-रतनपूर-पेंड्री मार्गावरील एक पूल मधूनच तुटला; यावेळी पुलावरू न जाणारी एक प्रवासी बस मधल्या भागातच अडकून पडली.डोंगराळ भागांत झालेल्या मुसळधार पावसामुळे उत्तर प्रदेशातील गंगा, घाघरा आणि शारदा यांसह दहा नद्यांच्या पाणी पातळीत वाढ झाली आहे. बिजनौरमध्ये गंगेचे पाणी सहा गावांमध्ये शिरल्याने रस्त्यांवरू न बोटी चालवण्याची वेळ आली आहे.दुसरीकडे, रविवारी बिहारचा बांका जिल्हा आणि झारखंडमधील विविध ठिकाणी वीज पडून दहा जणांचा मृत्यू झाला.










**कोलकात्यासाठी ६ ऑगस्टपर्यंत 'येलो अलर्ट' जारी-**आज कोलकात्याच्या विविध भागांत पाउस पडत आहे. हवामान विभागाने शहरासाठी ६ ऑगस्टपर्यंत 'येलो अलर्ट' जारी केला आहे. विभागाच्या माहितीनुसार, उद्यापर्यंत विजांच्या कडकडाटासह पावसाच्या सरी कोसळण्याची शक्यता आहे. छत्तीसगडमध्ये दोन दिवस पाउस आणि विजांच्या कडकडाटाचा इशारा

छत्तीसगडमधील अनेक भागांत आज हलका ते मध्यम स्वरूपाचा पाउस पडण्याची शक्यता आहे. हवामान विभागाने वादळी वारे आणि विजांच्या कडकडाटासह काही ठिकाणी मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. सोमवारी पहाटे राजस्थानमधील जयपूरमध्ये हलका पाउस झाला. आजपासून पुढील आठवडाभर मान्सून कमकुवत राहण्याची शक्यता आहे.

**मध्य प्रदेशात १५.४ इंच पाउस; सरासरीच्या निम्म्याहूनही कमी-**मध्य प्रदेशात आतापर्यंत सरासरी १५.४ इंच पाउस झाला आहे, जो एकूण अपेक्षित पावसाच्या निम्म्याहूनही कमी आहे. हवामान विभागाच्या माहितीनुसार, पुढील दोन दिवस राज्यात कोठेही मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आलेला नाही.

**उत्तराखंडच्या डोंगराळ जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसाची शक्यता-**आज उत्तराखंडमधील सर्व जिल्ह्यांमध्ये अधूनमधून हलका ते मध्यम स्वरू पाचा पाउस पडत आहे. हवामान विभागाने डेहराडून, रु द्रप्रयाग, चमोली, नैनीताल, चंपावत, पिथोरागढ आणि बागेश्वर या जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसाचा 'येलो अलर्ट' जारी केला आहे.

**हरियाणातील ९ जिल्ह्यांसाठी मुसळधार पावसाचा इशारा-**हरियाणात मान्सून पुन्हा सक्रिय होण्याची शक्यता आहे. हवामान खात्यानुसार, ३ आणि ४ ऑगस्ट रोजी राज्यातील अनेक भागांत हलका ते मध्यम स्वरू पाचा पाउस पडण्याची शक्यता आहे.

**बिहारमध्ये मुसळधार पाउस; २५ जिल्ह्यांसाठी इशारा जारी-**बिहारमधील अनेक जिल्ह्यांमध्ये हवामानात बदल झाला आहे. सोमवारी सकाळी पाटण्यात मुसळधार पाउस पडत आहे. हवामान विभागाने आज राज्यातील २५ जिल्ह्यांमध्ये वादळी वारा आणि पावसाचा इशारा दिला आहे.

**उत्तर प्रदेशातील सर्व ७५ जिल्ह्यांसाठी पावसाचा इशारा-**उत्तर प्रदेशात मान्सून पुन्हा सक्रिय झाला आहे. हवामान विभागाने आज राज्यातील सर्व ७५ जिल्ह्यांसाठी पावसाचा इशारा दिला आहे. गोरखपूर आणि सीतापूरसह १८ जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसाची शक्यता आहे. ढगफुटी म्हणजे ढग प्रत्यक्षपणे फुटणे नव्हे. ही एक हवामानविषयक घटना आहे, ज्यामध्ये अत्यंत कमी कालावधीत आणि खूप लहान क्षेत्रावर अतिशय मुसळधार पाउस पडतो.भारतीय हवामान विभागाच्या (क्ष्क़) मते, २० ते ३० चौरस किलोमीटर क्षेत्रावर एका तासाच्या किंवा त्यापेक्षा कमी कालावधीत १०० मिमी किंवा त्याहून अधिक पाउस पडणे म्हणजे ढगफुटी होय. जेव्हा हवेतील आर्द्रता एकाच ठिकाणी साचते, तेव्हा ही घटना घडते. विशेषत? डोंगराळ भागात, आर्द्रतायुक्तवा-यांच्या प्रवाहात पर्वत अडथळा निर्माण करतात. यामुळे तिथे आर्द्रता साचत राहते आणि अचानक मुसळधार पावसाच्या स्वरू पात ती मुक्त होते.

# तर 20 हजार कोटी खर्च करून नवीन संसद का बांधली?

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** जर संघातून दुसरा आवाज निघत असेल तर याचा अर्थ मोदी शहांनी माणसे पेरलेली आहेत, अशी टीका शिवसेना नेते, खासदार संजय राउत यांनी केली. तसेच इन्स्टाग्राम आणि एक्सवरच संसद चालवायची होती मग मोदींनी २० हजार कोटी रु पये खर्च करू न नवीन संसद कशासाठी उभी केली? असा सवालही संजय राउत यांनी उपस्थित केला.



दिल्लीत पत्रकारांशी बोलताना संजय राउत म्हणाले की, सगळ्यांनी ठरवून आता एक जाहिरात द्यायची. गुमशुदा की तलाश. देशाचे पंतप्रधान आणि गृहमंत्री हरवले आहेत. दोन आठवडे झाले, संसदेत देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांचे खासदारांना दर्शन झालेले नाही. मग संसद कशाकरता चालवत आहात? इन्स्टाग्रामवर, एक्सवरच संसद चालवा मग. नरेंद्र मोदींनी २० हजार कोटी रु पये खर्च करून नवीन संसद कशासाठी उभी केली? याचे उत्तर त्यांना द्यावे लागेल. जर तुम्ही संसदेत यायला घाबरत असाल मग नवीन संसद बांधलीच कशाला? मोदींच्या हस्ते उद्घाटन झाले अशी पाटी लावायची होती म्हणून नवीन संसद बांधली का? जे पंतप्रधान देशाच्या संसदेत यायला घाबरतात त्यांना देशाच्या पंतप्रधानपदी राहण्याचा नैतिक अधिकार आहे का? जे गृहमंत्री मोठ्या मोठ्या मोठ्या बाता मारतात, ईडी, सीबीआयच्या धमक्या देतात. ते संसदेच्या सभागृहात यायला घाबरतात. त्यांना देशाच्या गृहमंत्रीपदी राहण्याचा अधिकार खरोखर आहे का? याचे आत्मचिंतन हे भाजपच्या खासदारांनी आणि पुढा-यांनी करायला हवे. आज आम्ही पुन्हा त्यांना बोलावण्याचा प्रयत्न करू आणि त्यांचा राजीनामा मागण्याचा उपक्रम सुरु च ठेवू. हे महाशय परवा पुण्यात होते. रात्रीच्या काळोख्यात ते पुण्यात आले तिथे त्यांच्याविरोधात निदर्शने झाली. आज दिल्लीतही त्यांच्याविरोधात निदर्शने सुरू आहेत. अमित शहांनी जनतेला सामोरे गेले पाहिजे. तुम्हाला जर खरोखर जनतेने निवडून दिले असेल तर तुम्ही लोकांसमोर जायला पाहिजे. आणि जर तुम्ही चो-या मा-या करू न, मत चोरी करू न, दहशतीच्या मार्गाने निवडून आले असाल तर ती दहशत तुम्हाला छळत आहे असे संजय राउत म्हणाले. कोणतेही आंदोलन हे घटनाविरोधी असू शकत नाहीत.

**मानसिकता समजा-** मुळात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा जो इतिहास आहे, त्यांची जी विचारधारा आहे, ते भारतीय संविधानाला मानत नाहीत, ते भारतीय तिरंग्याला मानत नाहीत. ते भारताच्या स्वातंर्त्याला मानत नाहीत. ५२ वर्ष त्यांनी आपल्या कार्यालयात तिरंगा फडकावला नव्हता. संघाला स्वतंत्र संविधान निर्माण करायचे आहे, हे सगळ्यांना माहित आहे. म्हणून त्यांना ८५० खासदारांचे बळ निर्माण करू न भारताचे संविधानच संपवायचे आहे. म्हणून हे आंदोलन संविधान विरोधी आहे असे म्हणणे हे बाबासाहेबांच्या संविधानाचा अपमान आहे.

मग भाजपने केलेली आंदोलने संविधानाच्या कुठल्या चौकटीत होती? १९७५ चे जयप्रकाश नारायण यांचे आंदोलन हे संविधानाच्या कोणत्या चौकटीत होते? हे संघाचे महनीय पुढारी आहेत, त्यांनी हे देशाला सांगायला पाहिजे. भाजपचे सर्व लोक देश चालवताना संविधानाचा आदरच करायला तयार नाहीत. या देशातला तरु ण जंतरमंतरवर जमला आणि एका भ्रष्ट शिक्षणमंर्त्यांचा राजीनामा मागितला. ज्यांच्यामुळे २० विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या, त्याचा राजीनामा मागणे जर कुणाला घटनाबा वाटत असेल तर त्या माणसाची मानसिकता तपासावी लागेल असे संजय राउत म्हणाले.

# राष्ट्रीय स्तरावर शालेय शिक्षणात महाराष्ट्राचे महत्त्वपूर्ण स्थान -मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई/प्रतिनिधी :** शिक्षणाची गुणवत्ता, मातृभाषेचे संवर्धन, इतिहासाची समृद्ध परंपरा आणि आधुनिक शैक्षणिक सुविधा यांचा समतोल साधत राज्य शासन विद्यार्थीकेंद्रित शिक्षणव्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील असून राष्ट्रीय स्तरावरही महाराष्ट्राचे शालेय शिक्षण महत्त्वपूर्ण स्थान राखून आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. यावेळी शालेय अभ्यासक्रमात नशामुक्ती च्या अनुषंगाने पाठ्यक्रमाचा समावेश करण्यासाठी कार्यवाही करावी अशा सूचना त्यांनी दिल्या.



मुख्यमंत्री फडणवीस यांनी शिक्षण विभागाचा आढावा घेतला यावेळी शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, राज्यमंत्री ड?. पंकज भोयर, शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजीतसिंग देओल, शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्रा, प्रधान सचिव श्रीकर परदेशी व शिक्षण विभागातील प्रमुख अधिकारी उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, महाराष्ट्र पीजीआय २.० मध्ये देशात दुस-या स्थानावर कायम आहे. राज्यात पीएम श्री शाळांसह सर्व शाळांमधून चांगले शिक्षण दिले जात आहे. शिक्षण क्षेत्रात अभिनव उपक्रमांची अंमलबजावणी करावी, असे त्यांनी सांगितले. राज्यातील विद्यार्थ्यांचे शालेय आधार प्रमाणीकरण, आरटीइद्वारे ३५ लाख विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधेचा लाभ, पवित्र पोर्टल, राष्ट्रीय शिक्षण धोरणाची अंमलबजावणी, यासह विविध शैक्षणिक उपक्रमांची त्यांनी यावेळी माहिती घेतली.राज्य शासनाने शाळांमध्ये नशाविरोधी मार्गदर्शक व समुपदेशन समित्या स्थापन करण्याचा आणि 'ड्रग-फ्री स्कूल' अभियान राबवण्याचा मोठा निर्णय घेतला आहे. शाळांमधील सुरक्षा, सायबर फसवणूक आणि अंमली पदार्थ प्रतिबंधासाठी प्रभावी व कठोर उपाययोजना राबविण्याचे निर्देश दिले आहेत.

**राज्यातील विद्यार्थी-शिक्षक प्रमाण २८ : १-**देशातील एकूण शाळांपैकी ९.३४ टक्के, शिक्षकांपैकी ८.८४ टक्के आणि विद्यार्थ्यांपैकी ७.६९ टक्के वाटा महाराष्ट्राचा आहे. राज्यातील १,०८,०६५ एकूण शाळा मध्ये २,२०,४८,४४३ विद्यार्थी शिक्षण घेत असून विद्यार्थी-शिक्षक प्रमाण २८ : १ आहे राज्यातील शाळांमध्ये ६४,३४१ शासकीय, २९,४८६ खासगी अनुदानित आणि उर्वरित स्वयंअर्थसहाय्यित तसेच केंद्रीय शाळा आहेत. शालेय शिक्षण व्यवस्थेचा विस्तार आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी राज्य शासन विविध स्तरांवर सुधारणा राबवत आहे. निपुण महाराष्ट्र अभियान, राष्ट्र प्रथम अभियान, मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा सारखे उपक्रम विद्यार्थ्यांना शाळेमध्ये आणण्यासाठी शाळा प्रवेशोत्सव सारखे कार्यक्रम याबद्दल यावेळी माहिती देण्यात आली.यावेळी मंत्री दादाजी भुसे यांनी सादरीकरणाद्वारे विभागाच्या वतीने करण्यात येणा-या कार्यवाहीची माहिती दिली. शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ. भोयर यांनी शाळांमध्ये नशामुक्ती आणि विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या संदर्भात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे, असे सांगितले.शिक्षकांसाठी एआयसाथीच्या माध्यमातून ऑनलाइन प्रशिक्षण देखील राबविण्यात आले आहे. शिक्षकांचे अभ्यास दौरे, चांगले काम करणा-या शिक्षण समित्या व शिक्षकांच्या सहभागाने उपक्रमांना चालना, दत्तक शाळा, सीएसआर-सामंजस्य कराराच्या माध्यमातून शिक्षण क्षेत्रात नवीन विचार देखील सुरू झाला आहे. यातूनच शासकीय शाळांमध्ये सुपर १०० योजना राबविण्यात येत आहे. यामध्ये प्रत्येक जिल्ह्यातील ग्रामीण भागातील गुणवान शंभर विद्यार्थ्यांना नीट, जेईई परीक्षांचे स्पर्धात्मक चांगल्या दर्जाचे प्रशिक्षण देण्यासाठी निवड केली जाईल. राज्य शासनाच्या प्रयत्नामुळे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या गौरवशाली इतिहासाला केंद्र सरकारच्या वतीने एनसीईआरटीच्या पाठ्यपुस्तकात विस्तृत स्थान देण्यात आले आहे. अभ्यासक्रमात याचा अधिक व्यापक समावेश करावा, अशा सूचना यावेळी देण्यात आल्या. यासोबतच राज्यातील सर्व शिक्षण मंडळांच्या (एसएससी, सीबीएसई, आयसीएसई, आयबी) शाळांमध्ये मराठी भाषा शिकविणे व मराठी विषयाची परीक्षा घेणे सक्तीचे केले आहे,

# 2029 मध्ये मोदीच पंतप्रधान होतील-रामदास आठवले

## राजस्थानमध्ये म्हणाले- UCC मुस्लिमांची गरिबी दूर करेल

**जयपूर/नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**केंद्रीय सामाजिक न्यायमंत्री रामदास आठवले यांनी राजस्थान सरकारकडे भूमिहीन गरीब कुटुंबांना प्रत्येकी ५-५ एकर जमीन देण्याची मागणी केली. याचबरोबर, त्यांनी समान नागरी संहिता (UCC) बद्दल सांगितले की, यामुळे मुस्लिमांचे दारिद्र्य कमी होण्यास मदत होईल आणि बांगलादेश व पाकिस्तानसारख्या देशांनीही या दिशेने पाउल उचलले पाहिजे. यासोबतच, त्यांनी २०२९ च्या लोकसभा निवडणुकीबाबत दावा केला की, पंतप्रधान नरेंद्र मोदी पुन्हा देशाचे नेतृत्व करतील, मोदीच पुन्हा पंतप्रधान बनतील. केंद्रीय सामाजिक न्यायमंत्री रामदास आठवले सोमवारी जयपूर दौ-यादरम्यान माध्यमांशी बोलत होते, जिथे आठवले यांनी राजस्थान सरकारला गावातील भूमिहीन गरिबांना पाच एकर जमीन मोफत देण्याचा सल्ला दिला आहे.



आठवले म्हणाले- सरकारने प्रत्येक जाती, वर्गातील भूमिहीन ग्रामस्थांना पाच एकर जमीन मोफत देण्याचा कार्यक्रम हाती घ्यावा. प्रथम एक तज्ज्ञ समिती स्थापन करू न भूमिहीन पात्र कुटुंबांचे सर्वेक्षण करावे. सरकारकडे जमीन नसल्यास, ती खरेदी करून त्यांना द्यावी. ज्या लोकांकडे गावांमध्ये जास्त जमीन आहे, ते देखील जमीन दान करू शकतात.पूर्वी ज्याप्रमाणे भू-दान आंदोलनात जास्त जमीन असलेल्यांनी जमिनी दान केल्या, त्याचप्रमाणे आताही गरिबांना जमीन देउ शकतात. मी गरिबांना जमीन देण्यासाठी राजस्थानचे मुख्यमंत्री भजनलाल शर्मा यांना लवकरच पत्र लिहित आहे.समान नागरी संहिता (UCC) वर आठवले म्हणाले- UCC मुस्लिमांच्या विरोधात नाही. लोकसंख्या नियंत्रणात आणण्यासाठी छक्क खूप आवश्यक आहे. यामुळे मुस्लिमांचा खूप विकास होउ शकतो. मुस्लिमांची गरिबी दूर होउ शकते. माझे मत आहे की, पाकिस्तान, बांगलादेशनेही UCC लागू करावे. पाकिस्तान, बांगलादेशनेही छक्क लागू केल्यास त्यांची गरिबी दूर होईल. बांगलादेश आणि पाकिस्तानच्या पंतप्रधानांना UCC लागू करण्यासाठी पत्र लिहावे.

आठवले म्हणाले- २०२९ मध्ये मोदीच पंतप्रधान बनतील. मोदी शारीरिकदृष्ट्या तंदुरु स्त आणि मजबूत आहेत. मोदींनी देशाच्या विकासासाठी मोठे काम केले आहे. २०२९ ची निवडणूक आम्ही जिंकू, चौथ्यांदा एनडीए सरकार बनेल. राहुल गांधी, ममता बॅनर्जी, अखिलेश यादव यांच्यात एनडीएला हरवण्याची ताकद नाही.आठवले यांची रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (RPI) राजस्थानमध्ये पंचायत आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लढवेल. आठवले म्हणाले - RPI पंचायत आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये उमेदवार उभे करेल. आम्ही भाजप प्रदेशाध्यक्ष आणि मुख्यमंर्त्यांशीही बोलू. आम्ही एनडीएचे घटक पक्ष आहोत, त्यामुळे काही ठिकाणी उमेदवार उभे करू आणि उर्वरित ठिकाणी भाजपला सहकार्य करू .

**विरोधकांनी विद्यार्थी आंदोलन बिघडवण्याचे काम केले**

आठवले म्हणाले - अभिजीत दीपके यांनी देशभरातील विद्यार्थ्यांना एकत्र आणण्याचे खूप मोठे काम केले आहे. त्यांनी याचा उपयोग विधायक कामांसाठी करावा, हिंसेने काहीही साध्य होत नाही. असे केल्याने आंदोलने जास्त काळ टिकत नाहीत. खालिस्तानची चळवळही थांबली आहे. हा भारत आहे, श्रीलंका, नेपाळ किंवा बांगलादेश नाही. संविधानानुसार संपूर्ण देश चालतो. कॉकरोच जनता पक्षाचे आंदोलन खूप मजबूत होते.

### कॉकरोच जनता पक्षाचे आंदोलन खूप मजबूत होते

सरकारने त्यांच्या मागण्या मान्य केल्या आहेत. पेपरफुटी करणा-यांना तुरु ंगात टाकले आहे. विरोधकांनी विद्यार्थी आंदोलन बिघडवण्याचे काम केले. राहुल गांधी एकदाही त्यांच्या व्यासपीठावर गेले नाहीत, जेव्हा त्यांना वाटले की, विद्यार्थी विरोधात जातील, तेव्हा ते पंतप्रधान निवासस्थानासमोर धरणे धरू न बसले. राहुल गांधींच्या मूर्ख शब्दाच्या विधानावर आठवले म्हणाले- संसदेत तुम्ही मूर्ख शब्द वापरू शकत नाही. यानंतर ते अमित शाह यांच्यावर गोळीबाराचे आदेश दिल्याचा आरोप करत होते. अमित शाह यांच्यावर आरोप करू न त्यांना बदनाम करण्याचा प्रयत्न केला.

# लोकशाही दिनाला जिल्हाधिकारी, मनपा आयुक्तांची प्रत्यक्ष उपस्थिती अनिवार्य करा

**मुंबई/प्रतिनिधी :**सर्वसामान्य नागरिकांच्या तक्रारी व समस्या जलदगतीने व न्याय्य पद्धतीने सोडविण्यासाठी शासनाने सुरू केलेला लोकशाही दिन हा महत्त्वाचा उपक्रम अधिक प्रभावी करण्यासाठी जिल्हाधिकारी व महानगरपालिका आयुक्त यांनी स्वतः उपस्थित राहावे, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते सुनिल मंदाडे यांनी केली आहे. नागरिक विविध शासकीय कार्यालयांमध्ये वारंवार पाठपुरावा करूनही कामे मार्गी लागत नसल्याने अखेर लोकशाही दिनामध्ये अर्ज सादर करतात. मात्र, अनेकदा जिल्हाधिकारी व महानगरपालिका आयुक्त स्वतः उपस्थित राहत नसून त्यांच्या प्रतिनिधींमार्फत सुनावणी घेतली जाते.



त्यामुळे नागरिकांच्या तक्रारींवर अपेक्षित निर्णय होत नसल्याची भावना व्यक्त होत आहे. तसेच, संबंधित विभागप्रमुखही अनेकदा अनुपस्थित राहत असल्याने तक्रारींचे तातडीने निराकरण होत नाही. परिणामी, लोकशाही दिनाच्या मूळ उद्देशालाच बाधा पोहोचत असून हा उपक्रम केवळ औपचारिकता ठरत असल्याची खंत नागरिकांनी व्यक्त केली आहे.याशिवाय, लोकशाही दिनात अर्ज स्वीकारल्यानंतर अनेकदा अर्जदारांना टोकन क्रमांक किंवा पोहोच पावती दिली जात नसल्याने अर्जाच्या पुढील कार्यवाहीबाबत संभ्रम निर्माण होतो. त्यामुळे प्रत्येक अर्जाला टोकन क्रमांक व पोहोच पावती देणे बंधनकारक करावे, अशीही मागणी करण्यात आली आहे. सामाजिक कार्यकर्ते सुनिल मंदाडे यांनी जिल्हाधिकारी व महानगरपालिका आयुक्त यांनी लोकशाही दिनाच्या दिवशी स्वतः उपस्थित राहून नागरिकांच्या तक्रारी ऐकाव्यात, संबंधित विभागप्रमुखांची उपस्थिती अनिवार्य करावी तसेच अर्ज स्वीकारताना टोकन व पोहोच पावती देण्याची सक्ती करावी, अशी मागणी केली आहे.

# सरकार आपल्या वचनावर ठाम

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयाला सांगितले आहे की, पेपरफुटीविरोधात आंदोलन करणा-या विद्यार्थ्यांविरोधात कायदेशीर कारवाई न करण्याच्या आपल्या वचनावर अजूनही गंभीर आहे. स?लिसिटर जनरल तुषार मेहता म्हणाले, आंदोलकांविरोधात दाखल केलेल्या एफआयआरबाबत काही गैरसमज होता. मला हे सांगण्याचे निर्देश आहेत की, सरकार विद्यार्थ्यांवरील आपल्या वचनाबाबत गंभीर आहे. कॉकरोच जनता पार्टी (सीजेपी) ने गेल्या महिन्यात या वचनावर आपले आंदोलन संपवले होते की, पेपरफुटीविरोधात आंदोलन करणा-या हजारो आंदोलकांविरोधात कोणतीही कारवाई केली जाणार नाही.वकील वृंदा ग्रोवर यांनी विचारले की, आंदोलकांविरोधात दाखल केलेले एफआयआर मागे घेतले जातील की रद्द केले जातील. मेहता म्हणाले की, कायदेशीदृष्ट्या जो काही मार्ग योग्य असेल, सरकार आपल्या वचनावर ठाम आहे. सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी त्या याचिकांवर सुनावणी केली, ज्यात २० जुलैच्या संसद मार्चदरम्यान पोलिसांवर क्रू रतेचा आरोप करण्यात आला आहे. विशेष म्हणजे,



परीक्षांमधील गैरव्यवहार आणि ठएएळ पेपरफुटीविरोधात काकरोच जनता पक्षाचे आंदोलन ३६ दिवस चालले होते. २५ जुलै रोजी धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर हे आंदोलन संपवण्यात आले होते.

**न्यायालयाचे लक्ष कोणत्या मुद्यांवर?**

बेंच आंदोलक आणि पॅलेट गनने जखमी झालेल्यांच्या आरोपांची चौकशी करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या माजी न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली एक एसआयटी स्थापन करू शकते. न्यायालय हे देखील शोधण्याचा प्रयत्न करू शकते की पोलिसांवर हल्ले विद्यार्थ्यांनी केले होते की विद्यार्थ्यांच्या गर्दीत घुसलेल्या समाजकंटकांनी. २८ जुलै रोजी झालेल्या सुनावणीत सर्वोच्च न्यायालयाने राज्यांना आंदोलकांविरोधात कोणतीही कठोर कारवाई करण्यापासून रोखले होते. न्यायालयाने असेही म्हटले होते की, १८ वर्षांपेक्षा कमी वयाच्या लोकांचा कोणताही गुन्हेगारी रेकार्ड नसल्यास त्यांना सोडून देण्यात यावे. न्यायालयाने महाराष्ट्र, बिहार, आसाम, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, पश्चिम बंगाल आणि केरळ सरकारला नोटिसा बजावल्या होत्या आणि त्यांच्या ॲडव्होकेट जनरलना पुढील सुनावणीच्या तारखेला ऑनलाइन हजर राहण्यास सांगितले होते. ज्या राज्यांमध्ये निदर्शने झाली होती, त्या राज्यांमध्ये सीसीटीव्ही फुटेज, ड्रोन रेकार्डिंग, बाडी-कॅमेरा फुटेज, वायरलेस कम्युनिकेशन रेकार्ड, पीसीआर लाग आणि निदर्शनांशी संबंधित इतर डिजिटल पुरावे सुरक्षित ठेवण्याचे निर्देश न्यायालयाने दिले होते.

# जगातील तिस-या सर्वात लहान देशाने आपले नाव बदलले

**यारेन :** प्रशांत महासागरात वसलेल्या जगातील तिस-या सर्वात लहान देश नौरूने असाच एक ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. आता हा देश अधिकृतपणे रिपब्लिक ऑफ नाओएरो म्हणून ओळखला जाईल. संयुक्त राष्ट्र (यूएन) ने देखील आपल्या नोंदींमध्ये नवीन नाव लागू केले आहे. सुमारे १२ हजार लोकसंख्या असलेल्या या द्वीपसमूहातील देशाचे म्हणणे आहे की नाओएरो हे त्याचे खरे नाव आहे, तर नौरू हे परदेशी लोकांच्या सोयीसाठी प्रचारात आले होते. आता सरकारचे मत आहे की, देशाने जगासमोर आपली मूळ ओळख घेउन जाण्याची वेळ आली आहे. नाव बदलण्याचा हा निर्णय केवळ औपचारिकता नाही. सरकार याला आपली भाषा, संस्कृती आणि इतिहासाचा सन्मान करण्याची एक पहल मानत आहे.



याच विचाराने देशाने दशकांपूर्वीचे नाव सोडून आपली पारंपरिक ओळख अधिकृतपणे पुन्हा स्वीकारली आहे. नाओएरोचे म्हणणे आहे की नौरू हे त्यांची निवड नसून, परदेशी लोकांच्या सोयीसाठी दिलेले नाव होते. खरे नाव नेहमी नाओएरो हेच राहिले, पण त्याचा उच्चार सोपा नसल्यामुळे जगाने हळूहळू त्याला नौरू म्हणायला सुरु वात केली. कालांतराने हेच नाव अधिकृत ओळख बनले. जानेवारीमध्ये संसदेत प्रस्ताव मांडताना अध्यक्ष डेव्हिड एडियांग म्हणाले की, आता वेळ आली आहे की देशाला जगासमोर त्याच नावाने ओळखले जावे, ज्या नावाने त्याचे लोक पिढ्यानपिढ्या बोलत आले आहेत. त्यांच्या मते, हा केवळ नाव बदलण्याचा निर्णय नाही, तर आपली भाषा, संस्कृती आणि इतिहासाला त्याची खरी ओळख परत मिळवून देण्याचा प्रयत्न आहे.

# अनुदानित खतांसोबत इतर कृषी निविष्ठांचे लिंकिंग करणा-यांवर कठोर कारवाई होणार-कृषीमंत्री दत्तात्रय भरणे

**मुंबई/प्रतिनिधी :** शेतक-यांना त्यांच्या गरजेनुसार केवळ आवश्यक असलेली कृषी निविष्ठा खरेदी करण्याचा पूर्ण अधिकार आहे. अनुदानित खतांसोबत इतर उत्पादने सक्तीने विकणे हा अन्यायकारक प्रकार असून, अशा लिंकिंगला राज्य शासनाने आधीच बंदी घातली आहे. नियमांचे उल्लंघन करणा-यांवर कठोर कारवाई केली जाईल, असे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी स्पष्ट केले. आमदार रोहित पवार यांनी सोशल मीडियाद्वारे कृषी सेवा केंद्र चालक यूरियासोबत दुय्यम अथवा महागड्या खतांची सक्तीने विक्री करत असल्याने शेतक-यांवर आर्थिक भार पडत असल्याचा मुद्दा उपस्थित करत संबंधितांवर कारवाईची मागणी केली. मात्र, या संदर्भात महाराष्ट्र शासनाने यापूर्वीच अशा प्रकारच्या लिंकिंगला बंदी घालून कायदेशीर कारवाईचे स्पष्ट निर्देश जारी केले असल्याचे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितले. ते म्हणाले, राज्यात अनुदानित खतांच्या विक्रीसोबत विना अनुदानित खते, सूक्ष्म अन्नद्रव्ये, जैवखते, जैवउत्तेजके व इतर कृषी निविष्ठांची सक्तीने विक्री (टॅगिंग/लिंकिंग) होत असल्याच्या तक्रारी लक्षात घेउन राज्य शासनाने २० मे २०२६ रोजीच शासन परिपत्रक काढून अशा प्रकाराला तात्काळ बंदी घातली आहे. तसेच नियमांचे उल्लंघन करणा-या उत्पादक, पुरवठादार कंपन्या आणि संबंधितांवर कठोर कारवाई करण्याचे आदेश दिले असून, या निर्णयाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी संबंधित यंत्रणांना आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत.

# इयत्ता अकरावी प्रवेशासाठी 4 ऑगस्टपासून विशेष फेरी

**मुंबई/प्रतिनिधी :** शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठीच्या इयत्ता अकरावी केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेत आतापर्यंत १५ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांनी नोंदणी केली असून सुमारे १२.९८ लाख विद्यार्थ्यांनी आपले प्रवेश निश्चित केले आहेत. अद्याप काही विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित न केल्याने त्यांच्यासाठी ४ ऑगस्ट २०२६ पासून विशेष फेरीचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालक डॉ महेश पालकर यांनी दिली आहे. विशेष फेरीअंतर्गत विद्यार्थ्यांना ऑनलाईन पद्धतीने किमान १० कनिष्ठ महाविद्यालयांचे पसंतीक्रम भरून अर्ज ल?क करणे आवश्यक राहणार आहे. विद्यार्थ्यांना त्यांच्या पसंतीक्रम आणि गुणवत्तेनुसार कनिष्ठ महाविद्यालयांचे वाटप करण्यात येणार आहे. या विशेष फेरीसाठी नवीन विद्यार्थ्यांची नोंदणी तसेच भाग-१ मधील आवश्यक दुरु स्ती करण्याची सुविधा ४ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजल्यापासून ६ ऑगस्ट रोजी सायंकाळी ६ वाजेपर्यंत उपलब्ध राहील. याच कालावधीत विद्यार्थ्यांना पसंतीक्रम भरू न अर्ज अंतिम स्वरू पात लॉक करता येणार आहे. विशेष फेरीतील प्रवेश वाटप प्रक्रिया ७ ऑगस्ट रोजी पार पडणार असून ८ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता प्रवेश वाटपाची यादी पोर्टलवर प्रसिद्ध करण्यात येईल. संबंधित विद्यार्थ्यांना एसएमएसद्वारेही माहिती पाठविण्यात येणार आहे. प्रवेश वाटप झालेल्या विद्यार्थ्यांना ८ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजल्यापासून १० ऑगस्ट रोजी सायंकाळी ६ वाजेपर्यंत संबंधित कनिष्ठ महाविद्यालयात आवश्यक कागदपत्र पडताळणी करू न प्रवेश निश्चित करता येईल. त्यानंतर ११ ऑगस्ट रोजी दुपारी १ वाजता रिक्त जागांची माहिती प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## ‘फर्स्ट व्हिलेज’ला प्राधान्य

भारताच्या सीमा या पोरस म्हणजे सच्छिद्र समजल्या जातात. म्हणजे त्यातून घुसखोर भारतात सहज येऊ-जाऊ शकतात आणि या घुसखोरांनी संपूर्ण देश पोखरलेला आहे. ते येथे येऊन शिधापत्रिका मिळवतात, घरे बळकावतात आणि नोकऱ्याही पटकावतात. इंग्लंडला ब्रेक्झिटने सतावले होते तोच प्रश्न भारतासमोरही तितकाच ‘आ’ वासून उभा आहे. पण पूर्वीची सरकारे या प्रश्नाकडे सरळ दुर्लक्ष करत. कारण की, सीमावर्ती गावांचा विकास झाला तर परदेशी लष्करे सरळ भारतात घुसतील. पण तसे नव्हते. आज मोदी यांनी सीमावर्ती गावांचा विकास करण्याचे ठरवले आणि त्यांनी ही जबाबदारी माजी सैनिक, अग्नीवीर आणि युवकांवर सोपवली आहे. हे निश्चितच स्वागतार्ह पाऊल आहे.सीमांत किंवा सीमावर्ती गावांचे प्रश्न इतर गावांसारखे नसतात. त्यांना वीज, रस्ते,शाळा आणि वैद्यकीय सुविधा हे प्रश्न गरजेचे असतात. या सुविधांच्या अभावी नागरिकांची अवस्था दयनीय होते. मोदी यांनी याकडे लक्ष देऊन अशा गावांच्या विकासाकडे लक्ष दिले आहे. भारताचे सीमावर्ती भाग नेहमीच अविकसित राहिले आहेत. आणि त्यामुळे अर्थातच या भागांतून लोक अन्यत्र जात आहेत ज्यास विस्थापन असे म्हटले जाते. उत्तराखंड, सिक्कीम आणि लडाख यांना या विस्थापनाचा धोका मोठा आहे. ही गावे नंतर भुताटकीची म्हणजे ‘घोस्ट व्हिलेजे’स म्हणून ओळखली जातात, कारण त्यात कुणीच रहात नाही.विस्थापन ही उत्तराखंड राज्याची सर्वात भळभळणारी जखम आहे आणि त्यात माना, निती, गुंजी अशी अनेक गावे समाविष्ट आहेत, ज्यात शाळा, रस्ते आणि वीज वगैरे कसल्याही सुविधा नाहीत. अशा गावांचा विकास करण्याची मोदी सरकारची योजना आहे आणि या गावांमध्ये रस्ते, सौर उर्जा, मोबाईल जोडणी वगैरे सुविधा देण्यात येत आहेत. तसेच या गावांत इको टुरिझम,वनौषधी अशा सुविधांची सोय करण्यात येत आहे. पण मुख्यतः या गावांच्या लोकसंख्येचा भारताला असा फायदा होतो की, त्यांची परदेशी म्हणजे शत्रू राष्ट्रांच्या सैनिकांच्या घुसखोरीवर नजर रहाते. अशी घुसखोरीही भारताला सर्वात धोकादायक असते. तिच्यावर भारतीय सीमाप्रांतातील लोकांमुळे आपोआप नजर राहते आणि त्यामुळे तो धोका आपोआप दूर होतो. अशी सीमावर्ती गावे डिपॉप्युलेटेड म्हणजे लोकसंख्येपासून वंचित होतात किंवा कमी लोक असतात. त्यामुळे स्थानिक इंटलिजन्स म्हणजे गुप्तचर ही संस्थाच कमजोर होते. अशी काहीही व्यवस्था नसल्याने ब्रिटनला ब्रेक्झिटचा धोका सहन करावा लागला होता. तो भारतात तरी होऊ नये म्हणून मोदी यांनी दक्षता घेत सीमावर्ती गावांचा विकास करण्याची योजना हाती घेतली आहे. त्यामुळे भारताच्या शत्रूची नजर भारतावर पडणार नाही. या योजनेंतर्गत मोदी यांनी पूर्वीच्या योजनेत काही सुधारणा केल्या आहेत. पूर्वी उत्तराखंडमधील अखेरच्या गावास ‘लास्ट व्हिलेज’ असे म्हटले जात होते. ते बदलून मोदी यांच्या नव्या योजनेत आता त्यांना ‘फर्स्ट व्हिलेज’ असे म्हटले जाईल. नुसते नाव बदलून चालणार नाही, तर या गावांमध्ये उत्तम रस्ते, चोवीस तास विजेची सुविधा, टेलिकॉम, आरोग्य सुविधाही पुरवल्या जातील. म्हणजे ही गावे खऱ्या अर्थाने फर्स्ट व्हिलेजेस होतील. अगदी थोडक्या शब्दांत सांगायचे, तर या गावांचा सर्वसमावेशक विकास केला जाईल. आणि शेवटी सर्वात महत्वाचे म्हणजे या गावांमध्ये दळणवळण, रोजगार आणि पर्यटन यासाठी आधुनिक सुविधा तयार केल्या जात आहेत. त्यामुळे ही गावे विकसित भारताच्या मूळ मंत्राशी जोडली जातील आणि तीही विकासाच्या प्रवाहात सामील होतील. लडाख, सिक्कीम, उत्तराखंड आणि अशाच सीमावर्ती भागातील गावांत दूरसंवाद आणि दुर्गम भागातील दरी मिटवण्याचा प्रयत्न केला जाईल. सीमावर्ती गावांना पुन्हा एकदा मजबूत करण्याबरोबरच सरकारने या गावांना पुन्हा एकदा श्रीमंत करण्यासाठी ग्रामीण अर्थव्यवस्थेतील महत्वाचे अंग करण्याचे ठरवले आहे. त्यासाठी ही गावे लोकांच्या वर्दळीने गजबजली पाहिजेत आणि त्यासाठी सुविधा हव्यात. हे ओळखून मोदी सरकारने या गावांमध्ये उपजीविकेची पुरेशी साधने उपलब्ध करतानाच ही गावे आत्मनिर्भर करण्याचा निर्धार केला आहे.हे सर्व करतानाच चीनच्या विरूद्ध भारताला आघाडी उघडावी लागेल. कारण चीनने भारताविरोधात अरूणाचल प्रदेशातील किमान वीस गावांची तरी नावे बदलली आहेत. अर्थात चीनने नावे बदलली, तरीही त्यांच्यावर काही परिणाम होणार नाही. पण चीन त्यावर कालांतराने हक्क सांगू शकतो. तसा त्याने हक्क सांगू नये म्हणून भारताने वेळीच कठोर पावले उचलली आहेत. पण चीनच्या या धिटाईची वेळ अत्यंत अचूक आहे, कारण २०१७ मध्येच चीनचे दलाई लामा यांनी तवांग दौरा केला होता आणि त्यानंतर चीनने ही धिटाई केली होती. तेव्हा चीनपासून भारताने दक्ष रहायला हवे आणि वारंवार त्याच्या आगळीकीकडे लक्ष ठेवले पाहिजे.कोणत्याही राष्ट्राची सुरक्षा ही सैनिकांमुळे असते, पण एवढेच नव्हे, तर नागरिकांची उपस्थिती, त्यांची जागरूकता आणि समृद्धी यामुळेही देशाची सार्वभौमता राहते हे नवीनच तत्व सध्या समोर आले आहे. तेव्हा अशा गावांना अविकसित किंवा दुर्लक्षित ठेवून चालणार नाही. तर त्यांना संपूर्णपणे सतत दक्ष राहिले पाहिजे. हेच मोदी यांच्या या योजनेने समोर आणले आहे. अगदी नेमक्या शब्दांत सांगायचे,तर व्हायब्रेट व्हिलेजेस या योजनेतून सरकारला भारत आपले संरक्षण मॉडेल सीमावर्ती गावांकडे वळवण्याचा प्रयत्न करत आहे हे दिसते. आणि यात दोन गोष्टी अंतर्भूत आहेत. एक म्हणजे स्थानिक विकास आणि दुसरे म्हणजे राष्ट्रीय सुरक्षा. आणि यातून आणखी एक वाव साध्य होते ती म्हणजे अतिक्रमणापासून संरक्षण होते. जसे मणिपूरमध्ये झाले. सीमावर्ती गावातील लोकांना देशाचे डोळे आणि कान समजले जातात आणि त्यामुळे त्यांचे अत्यंत महत्व आहे. असे जागरूक लोक बेकायदेशीर जमिनी बळकावण्याचे प्रकार रोखू शकतात आणि परदेशी शक्तींकडून संवेदनक्षम भागांत आपली लोकसंख्या वाढवून डेमोग्राफिक म्हणजे लोकसंख्याविषयक बदलांना रोखू शकतात. यामुळे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. अशी स्थिती कुठेही उद्भवू नये म्हणून स्थानिकांनी दक्ष राहिले पाहिजे आणि म्हणूनच मोदी यांची ही योजना प्रभावी आहे.

# राष्ट्रे अस्थिर करणारे घातक अल्गोरिदम

**पाश्चात्य देश किंवा परकीय शक्तींकडून भारताच्या सामाजिक आणि राजकीय स्थैर्याला बाधा पोहोचवण्यासाठी सोशल मीडिया आणि डिजिटल मंचांच्या अल्गोरिदमचा वापर विविध मार्गांनी केला जातो. आधुनिक काळात शस्त्रास्त्रांच्या युद्धापेक्षा ‘माहिती युद्ध’ (इन्फॉर्मेशन वॉरफेअर) आणि नॅरेटिव्ह राजकारणाद्वारे देशांतर्गत अस्थिरता निर्माण करण्याचे प्रयत्न वाढले आहेत.**



दक्षिण आशियात गेल्या चार-पाच वर्षांमध्ये घडलेल्या घडामोडी सूक्ष्मपणाने पाहिल्या असता त्यामध्ये एक पॅटर्न किंवा सामायिकता दिसून येते. हा पॅटर्न चिंताजनक आणि विचार करायला लावणारा आहे. श्रीलंकेपासून बांगलादेशपर्यंत आणि पाकिस्तानपासून नेपाळपर्यंत घडलेल्या घटनांचा ओघ पाहिल्यानंतर असे लक्षात येते की, या वेगवेगळ्या भूप्रदेशांमधील सरकारे भिन्न होती; पण तिथल्या अस्थिरतेचे स्वरूप आणि पद्धती मात्र आश्चर्यकारक रित्या एकसारख्याच होत्या. विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे या संपूर्ण प्रक्रियेच्या केंद्रबिंदूवर देशातील तरुण पिढी असते, जिच्या भावनांना आणि असंतोषाला पद्धतशीरपणे हाताशी धरून एका विशिष्ट यंत्रणेच्या विरोधात उभे केले जाते.

श्रीलंकेमध्ये या प्रादेशिक अस्थिरतेची सुरुवात एका भीषण आर्थिक संकटातून झाली. राजपक्षे कुटुंबाच्या राजवटीत देशाचा परकीय चलन साठा पूर्णपणे रिकामा झाला, इंधन, अन्नधान्य आणि औषधांच्या तीव्र टंचाईने उच्चांक गाठला. याविरुद्ध त्रस्त झालेली जनता रस्त्यावर उतरली आणि ऐतिहासिक ‘अरगालया’ आंदोलनाद्वारे सामान्यांनी थेट राष्ट्रपती भवनावर ताबा मिळवला. सरकारविरोधी जनक्षोभाचे हे लोण एका लोकशाही देशात किती उग्र रूप धारण करू शकते, याचे हे जगातील पहिले मोठे उदाहरण ठरले, ज्याने संपूर्ण दक्षिण आशियातील राजकारणाला कलाटणी दिली.

बांगलादेशमध्ये श्रीलंकेची पुनरावृत्ती पाहायला मिळाली. शेख हसीना यांच्या प्रदीर्घ शासनकाळामध्ये बांगला देशाने आर्थिक विकासाचा नवसूर्योदय पाहिला. गारमेंट इंडस्ट्रीसह अन्य उद्योगधंद्यांच्या विकासाला चालना देऊन त्यांनी बांगला देशला निर्यातप्रधान बनवण्याच्या दिशेने धोरणात्मक पावले टाकली. त्यामुळे एक वेळ अशी आली होती की दक्षिण आशियात बांगला देशचा आर्थिक विकास दर सर्वाधिक होता. असे असताना सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या एका निकालाचे निमित्त करत त्यांच्या सत्तेविरुद्ध तिथल्या विद्यार्थ्यांनी आणि तरुण पिढीने मोठा एल्गार पुकारला.

अल्पावधीताचा जनआंदोलनाने उग्र स्वरूप धारण केले आणि अखेरीस पंतप्रधान हसीना यांना देश सोडून पलायन करावे लागले. या सर्व प्रकारामागे अमेरिकेचा हात असल्याचा थेट आरोप हसीना यांनी केला. स्टेट ऑफ मलाक्का या सामुद्रधुनीतून होणाऱ्या व्यापारावर नजर ठेवण्यासाठी महत्त्वाचे असणारे सेंट मार्टिन अमेरिकेला हवे होते. तेथे अमेरिकेला विमानतळ बनवण्याची परवानगी हवी होती. ती नाकारल्यामुळे सीआयए या अमेरिकन गुप्तचर यंत्रणेने हसीनांची सत्ता उलथवून टाकल्याची टीका करण्यात आली. पुढे मोहम्मद युनुस यांना प्रमुख स्थानी बसवल्यामुळे या टीकेला पुष्टी मिळाली.

पाकिस्तानमधील अस्थिरतेचे स्वरूप वेगळे असले तरी पॅटर्न तोच होता. पाकिस्तानमध्ये राजकीय सत्ता कुणाचीही असली तरी तिथे सर्व निर्णय लष्कराच्या इशाऱ्यावरच घेतले जातात. त्यामुळे आंतरराष्ट्रीय प्रश्नांचे अभ्यासक पाकिस्तानच्या सरकारला ‘पपेट गव्हर्नमेंट’ असेही संबोधतात. तेथे पंतप्रधान कोण असावा हेही लष्करच ठरवत असते. पीटीआयचे प्रमुख इम्रान खान पंतप्रधान बनल्यानंतर त्यांनी लष्कराच्या काही मागण्या मान्य करण्यास नकार दिला तेव्हा लष्कराने त्यांची जुनी फाईल ओपन करून थेट तुरुंगात रवानगी केली आणि आपल्या मर्जीतील शरीफांना खुर्चीवर बसवले.

या सर्वांमध्ये बाहेरच्या शक्तींचा हस्तक्षेप असतो, हे उघडगुपित आहे. नेपाळमध्येही हीच शृंखला पुढे जाताना दिसली. भ्रष्ट कारभार, ढासळलेली कायदा व सुव्यवस्था आणि देशात रोजगाराच्या संधी नसल्यामुळे तरुणांचे होणारे पलायन याविरोधात नेपाळची तरुण पिढी आक्रमक झाली. जुन्याच मुद्द्यांवर राजकारण करणाऱ्या पारंपारिक राजकीय नेत्यांविरुद्धचा हा रोष केवळ राजकीय उलथापालथ करून थांबला नाही, तर संपूर्ण शासन प्रणालीत आमूलाग्र बदलाची मागणी करणारा ठरला.

वरवर पाहता या सर्व प्रकारांमधील गर्दी पूर्णपणे नैसर्गिक आणि स्वयंस्फूर्त भासते, परंतु तिच्यामागील रचना बरीच गुंतागुंतीची असते. डिजिटल माध्यमांवर काही ठराविक विचारसरणीच्या किंवा आशय निर्माण करणाऱ्या व्यक्तींचे अनुयायी वेगाने वाढू लागतात, तेव्हा त्यांच्याभोवती एक संपूर्ण व्यवस्थेविरोधी चक्र तयार होऊ लागते. यामध्ये राजकीय प्रभाव पाडणारे लोक, उपरोधिक किंवा विचार प्रवृत्त करणारी पाने, विशिष्ट पत्रकारांचे गट आणि सतत आक्रमक भूमिका घेणारे निर्माते एकत्र येऊन एकाच प्रकारच्या कथानकाला प्रचंड मोठी प्रसिद्धी देतात.

परिणामी, सर्वसामान्य जनतेच्या मनात व्यवस्थेबद्दल कमालीची निराशा पसरवली जाते आणि देशात भविष्याविषयी कोणतेही सकारात्मक चित्र उरलेले नाही, सारे काही कुचकामी झाले आहे असा संदेश वारंवार दिला जातो. पण त्यामध्ये रचनात्मक उपाययोजना कोणत्या याबाबत फारसे काही दिसत नाही. भारतातही अशाच प्रकारचे प्रयत्न करण्यात आले. बेरोजगारीच्या प्रश्नावर अत्यंत भावनिक चित्रीकरण आणि प्रेक्षकांच्या संवेदनांशी खेळणारे व्हिडिओ मोठ्या प्रमाणावर प्रसारित केले जातात. महागाई, आरोग्यव्यवस्था, शिक्षण व्यवस्थेतील त्रुटींवर तीव्र शब्दांत संताप व्यक्त केला जातो आणि सर्व काही नासले आहे अशा आशयाची मांडणी केली जाते. अशा प्रत्येक समस्येचा शेवट एकाच ठराविक निष्कर्षावर येऊन थांबलेला दिसतो आणि तो म्हणजे सत्तेवर असलेल्या सरकारला हटवणे. अनेक देशांमध्ये सत्तांतरासाठी हा प्रयोग यशस्वीही झाला आहे. भारतात हेच अल्गोरिदम अधिक जोरकसपणाने वापरण्याचे प्रयत्न सुरू झाले आहेत.

अलीकडेच पार पडलेल्या कॉकरोच पार्टीच्या आंदोलनादरम्यान याची ठळकपणाने प्रचिती आली. सरकारने सोशल मीडियावर पसरवल्या गेलेल्या पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि इतर मंत्र्यांच्या बनावट आणि छेडछाड केलेल्या डीपफेक व्हिडिओंविरोधात कडक पावले उचलल्यामुळे त्याची फारशी चर्चा झाली नाही; पण या व्हायरल झालेल्या व्हिडिओंमध्ये पंतप्रधानांनी दिल्लीतील जंतरमंतर येथे सुरू असलेल्या विद्यार्थी आंदोलनाबाबत धमकीसदृश विधाने केल्याचे चुकीच्या पद्धतीने दाखवले गेले होते.

पीआयबी फॅक्ट चेक युनिटने हे व्हिडिओ कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून तयार केलेले बनावट डीपफेक असल्याचे सांगत या विधानांशी पंतप्रधानांचा कोणताही संबंध नाही हे स्पष्ट केले. फॅक्ट चेक युनिटने सोशल मीडियावर केलेल्या पोस्टनुसार काही पाकिस्तानी हँडल्स आणि खात्यांद्वारे हा बनावट व्हिडिओ . पण दिल्ली पोलिसांनी कोणतीही जीवितहानी झाल्याचे वृत्त नसल्याचे स्पष्ट केल्याने क्षोभ टळला. भारताच्या सशस्त्र दलांवरील आणि सरकारी संस्थांवरील लोकांचा विश्वास कमी करण्याचा प्रयत्न या माध्यमातून केला जात होता. यामागे कटकारस्थान रचणाऱ्या शक्तींचा उद्देश दक्षिण आशियामध्ये भारताचे स्थान कमजोर करणे हाच होता.

महाराष्ट्र सायबर विभागाने केलेल्या अत्यंत सखोल तांत्रिक तपासात यासंदर्भातील एका मोठ्या आंतरराष्ट्रीय कटाचा पर्दाफाश झाला आहे. कॉक्रोच जनता पार्टीच्या संदर्भातील आंदोलनाबाबत नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण करणे, चुकीची माहिती पसरवणे आणि समाजात फूट पाडणे हा यामागचा मुख्य उद्देश होता. यासाठी ओपन-सोर्स इंटेलिजन्स, मेटाडेटा विश्लेषण, वर्तनात्मक अभ्यास आणि फॉरेन्सिक तपासणीचा वापर करण्यात आला. या तपासामध्ये ५०० हून अधिक सोशल मीडिया प्रोफाईल्सची ओळख पटवण्यात आली असून, त्यामागील काळे जाळे जगभरात पसरल्याचे स्पष्ट झाले आहे.

चुकीची माहिती पसरवण्यासाठी इंस्टाग्राम, एक्स, फेसबुक आणि यूट्यूबवर ४२९ हँडल्स किंवा पोस्टस् तयार करण्यात आल्याचे महाराष्ट्र सायबर सेलच्या निदर्शनास आले आहे. यामध्ये एआयद्वारे तयार केलेल्या १४० मजकुरांचाही समावेश होता. यामध्ये इंस्टाग्रामचा सर्वाधिक वापर केला गेला. देशात तसेच मुंबई आणि महाराष्ट्रात अशांतता पसरवण्यासाठी एआयचा वापर करून तयार केलेले व्हिडिओ आणि मजकूर तसेच चुकीचे दावे (नॅरेटिव्ह) पसरवणाऱ्या ३१२ पोस्टस् इंस्टाग्रामवर होत्या. त्याचबरोबर, गेल्या आठवड्यात ‘एक्स’वर ५५, फेसबुकवर ४० आणि यूट्यूबवर २२ पोस्ट्स अपलोड करण्यात आल्या होत्या.

सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्सवरील ज्या एकूण ४२९ चुकीच्या माहितीच्या पोस्टस् किंवा मजकूर हटवण्यात येत आहेत, त्यापैकी ७६.७ टक्के (३२९) पोस्ट भारतातून चालवल्या जाणाऱ्या हँडल्सवरून अपलोड करण्यात आल्या होत्या. तर २३.३ टक्के (१००) पोस्ट भारताबाहेरील हँडल्सचा वापर करून तयार आणि अपलोड केल्या गेल्या होत्या. तसेच, एकूण हँडल्स किंवा पोस्टपैकी ३२.६ टक्के मजकूर हा एआय-निर्मित किंवा एआयच्या मदतीने तयार केलेला असल्याच अतिरिक्त पोलीस महासंचालक (राज्य-सायबर) यशस्वी यादव यांनी दिलेल्या माहितीतून स्पष्ट झाले आहे.

या हँडल्सचे विश्लेषण करताना सायबर सेलला असे आढळले की, एप्रिल २०२६ मध्ये पाकिस्तानमधील एका अँड्रॉईड अ‍ॅपचा वापर करून पाकिस्तान-स्थित ‘एक्स’खाते तयार करण्यात आले होते. एआयद्वारे फेरफार केलेल्या मजकुरासह चुकीचे दावे पसरवण्यासाठी या खात्याचा वापर करण्यात आला. एआयचाच वापर करून २३ जुलै रोजी एक चुकीचा दावा करणारी पोस्ट करण्यात आली होती; जंतर-मंतर येथील निषेध आंदोलनादरम्यान एका विद्यार्थ्याचा मृत्यू झाला आणि त्याच्या आईला एफआयआर नोंदवण्यापासून रोखण्यात आले, असे या पोस्टमध्ये म्हटले होते. हा दावा खोटा होता, कारण सीपीआर दिल्यानंतर त्या विद्यार्थ्याला वाचवण्यात यश आले होते आणि त्याच्या आईचा व्हिडिओ एआयद्वारे फेरफार करून तयार करण्यात आला होता.

विशेष म्हणजे, यातील सुमारे १०० बनावट खाती भारताबाहेरून, प्रामुख्याने पाकिस्तान आणि काही मध्य-पूर्वेकडील देशांतून चालवली जात होती. मलेशियासह इतर काही ठिकाणांहूनही या आंदोलनाबाबत आक्षेपार्ह आणि दिशाभूल करणाऱ्या पोस्ट टाकण्यात आल्याचे समोर आले आहे. फॉरेन्सिक तपासात कृत्रिमरीत्या वाढवून दाखवलेली गर्दी, सिंथेटिक आवाज, क्लोन केलेले ऑडिओ आणि सार्वजनिक व्यक्तींशी खोटेपणाने जोडण्यात आलेले फेरफार केलेले व्हिडिओ मोठ्या प्रमाणावर आढळले. याचाच अर्थ सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्स आणि डीपफेक सामग्रीचा वापर करून जनतेची दिशाभूल करण्याचे मोठे कारस्थान किंवा षडयंत्र राष्ट्रद्रोही शक्तींनी आखले होते.

याचा अर्थ असा मुळीच नाही की, प्रत्येक आंदोलन चुकीचे असते किंवा प्रत्येक असंतोष हा विदेशी षडयंत्राचा भाग असतो. लोकशाहीमध्ये सरकारला प्रश्न विचारणे, धोरणांवर टीका करणे आणि स्वतःचा रोष व्यक्त करणे हा प्रत्येक नागरिकाचा अधिकार आहे आणि तो अत्यंत आवश्यकही आहे. परंतु, जनतेचा अस्सल आणि न्याय्य संताप अनेकदा काही वैचारिक गट, राजकीय संधीसाधू आणि बाहेरील शक्तींकडून प्रायोजित कथानकांद्वारे हायजॅक केला जातो आणि त्यातून सरकारविरोधी नॅरेटिव्ह प्रस्थापित केला जातो. मजबूत आणि स्थिर राष्ट्राला अस्थिर बनवण्याचे हे विखारी प्रयत्न लोकशाही राष्ट्रांसाठी नवा धोका बनून समोर आले आहेत.

या आधुनिक युद्धपद्धतीमध्ये मिडिया, विनोद, उपरोधिक साचे आणि अल्गोरिदम हे अत्यंत प्रभावी शस्त्र बनले आहेत. त्यांच्या साहाय्याने सामूहिक मानसिकतेचा ताबा घेतला जातो. त्यामुळे डिजिटल माध्यमांवर दिसणारा प्रत्येक व्हायरल ट्रेंड हा नेहमीच सेंद्रिय किंवा मूळ स्वरूपाचा असतो असे नाही, हे सर्वांनी लक्षात घ्यायला हवे. तशाच प्रकारे प्रत्येक जनक्षोभ हा थेट जनतेच्या हिताचाच असेल असेही नाही. अनेकदा यामागचा एकमेव आणि गुप्त अजेंडा लोकांच्या मनातील परस्परविश्वास नष्ट करणे, समाजात तेढ निर्माण करणे आणि देशाच्या अंतर्गत सुरक्षेला आणि स्थैर्याला खिळखिळे करणे हा असू शकतो.

या सर्व विवेचनाचा मथितार्थ इतकाच की, इंटरनेट, सोशल मीडिया आणि अल्गोरिदम यांसह अनेक आयुधांचा वापर करून अमेरिकेसारख्या मोठ्या शक्ती राष्ट्रांच्या सार्वभौमत्वावर कब्जा मिळवतात. आपल्याला अनुकूल असणाऱ्या व्यक्तींना शीर्षस्थ स्थानी विराजमान करतात. भारताचा विचार करता शिक्षण, आर्थिक, वैद्यकीय, रोजगार या क्षेत्रात सुधारणांची गरज निश्चितच आहे; पण यासाठी सरकारचे प्रयत्न अव्याहतपणे आणि नियोजनबद्धपणे सुरू आहेत. देशभरामध्ये उभारलेले पायाभूत सुविधांचे जाळे, नळजोडणी, किसान सन्मान योजना, महिलांना थेट आर्थिक लाभ देणाऱ्या योजना अशी याची अनेक उदाहरणे देता येतील. देशातील ८० कोटी लोकांना दरमहा मोफत अन्नधान्य देणारी अन्नसरक्षा योजना ही जगात कुठेही पहावयास मिळत नाही. अगदी अमेरिकेतही नाही. गेल्या १२ वर्षांमध्ये लक्षावधी लोकांना अतिगरीब लोकांना दारिद्र रेषेतून बाहेर काढण्याची कामगिरी याच सरकारने केली आहे. स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच भारत जगातील ६७ देशांना संरक्षणसाधनसामग्री पुरवत आहे. युपीए सरकारच्या काळात भारत हा जगातील ११ व्या क्रमांकाची अर्थव्यवस्था होता.

आज भारत जगातील पहिल्या पाच राष्ट्रांच्या पंक्तीत विराजमान झाला आहे. २०४७ पर्यंत विकसनशील भारताला विकसित भारत करण्याच्या दिशेने वेगाने पावले टाकण्यास सुरुवात केली. जागतिक महाशक्तींच्या निर्णयांचे निमूटपणाने पालन करणारा भारत आज जागतिक राजकारणाचा अजेंडा ठरवण्यापर्यंत पोहोचला आहे. ही यशस्वी घोडदौड प्रगत राष्ट्रांसह अनेक हितशत्रूंच्या डोळ्यांत खुपते आहे. जगात सर्वाधिक युवकांची संख्या असणारा देश म्हणून भारताची ओळख आहे. ही युवाशक्ती भारताचे वर्तमानातील आणि भविष्यातील सामर्थ्य आहे. त्यामुळे याच तरुणाईला खोटे नॅरेटिव्ह पसरवरून, त्यांची माथी भडकावून भारतात अराजक निर्माण करायचे, सर्व घटनात्मक व्यवस्थांवरचा विश्वास डळमळीत करायचा यासाठी नियोजनबद्ध षड्यंत्रे रचली जात आहेत. देशातील जेन-झीने आणि सर्वच नागरिकांनी अत्यंत सावध आणि सजग राहून अखंडित लोकशाही भग्न करून पाहणाऱ्या या बाह्यशक्तींचा एकजुटीने सामना करणे गरजेचे आहे. ‘राष्ट्र प्रथम’ हा नारा घेऊन प्रत्येकाने वाटचाल करत भारताच्या विकासयात्रेत सहभागी झाले पाहिजे.

**डॉ. योगेश प्र. जाधव**

## ‘अल निनो’चा अंदाज फोल

यंदा मोसमी पावसाने हवामान विभागासह सर्वानाच चकवा देऊन अनेकांना आश्चर्याचा धक्का दिला आहे.त्यामुळे यावर्षी पाऊस कमी होणार या ‘अल निनो’च्या दाव्याला खोटे ठरविले आहे. मुंबईत जून पासून आतापर्यंत सरासरीच्या ८३ टक्के पाऊस बरसला आहे. देशाच्या पश्चिम किनारपट्टीवरील राज्यांमध्ये पावसाने जुलै अखेरीस तडाखा दिला असून अनेक भागांमध्ये पुराची स्थिती असल्याचे समोर आले आहे. केरळमध्ये पावसाने आठ बळी घेतले तर ईशान्येला असाममध्येही पुराने थैमान घातले असून आतापर्यंत ब्याऐंशी जणांचा बळी गेला आहे. गुजरातेत अनेक महामार्ग जलमय झाल्याने काही भागातील रस्ते बंद ठेवावे लागले आहेत.पावसाने काही धरणे शंभर टक्के तर काही भरण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे ‘अल निनो’चा अथवा हवामान विभागाचा अंदाज फोल ठरला आहे.

**राजू जाधव**

## भगव्या रंगाची एवढी ॲलर्जी का?

आगामी हॉकी विश्वचषक स्पर्धेसाठी भारतीय संघाने नवीन रंगाचा गणवेश(जर्सी) केला आहे. पूर्वी गणवेशाचा रंग निळा होता. आंतरराष्ट्रीय हॉकी सामन्यात वापरल्या जाणाऱ्या ‘सिंथेटिक टर्फ’चा रंगही निळा असतो.या निळ्या रंगामुळे खेळाडूंना एकमेकांना ओळखण्यात अडचण येते असे लक्षात आले.त्यामुळे पूर्वीचा निळा रंग पालटण्याचे धोरण खेळाडू, कर्णधार,प्रशिक्षक आणि सहाय्यक यांच्या एकमताने आखले गेले. इतके दिवस वापरण्यात येणारा निळा रंग बदलल्यामुळे काही लोकांना पोटशूळ उठला.खेळाडूंची सोय महत्त्वाची आहे हे लक्षात न घेता हॉकी संघाचे माजी कर्णधार विरेन रसकींन्हा आणि प्रियांका वाड्रा भगव्या रंगाला आक्षेप घेत आहेत. भगवा रंग शौर्य आणि त्यागाचे प्रतीक आहे. सूर्योदय आणि सूर्यास्त यावेळी सूर्याचा रंगही भगवा दिसतो. आपल्या राष्ट्रध्वजातही भगवा रंग आहे.युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराज यांचा जरीपटका हा भगव्या रंगाचाच होता.भगव्या रंगाला एवढी थोर परंपरा आणि महत्त्व असताना केवळ विशिष्ट चष्म्यातून प्रत्येक घडामोडीकडे पाहण्याचा दूषित दृष्टिकोन असल्यामुळे अशी टीका केली जात आहे.असेच दिसून येते.खेळाडूंची सोय लक्षात न घेता केवळ विरोधासाठी विरोध करणे अयोग्य आहे.

**संध्या काटदरे**

## यांना अधिकार नाही!

स्टँड अप कॉमेडीच्या नावाने किंवा समाजात भाषण करताना इतर धर्माची चुकीची माहिती देत असेल तर त्यांच्यावर पोलीस कारवाई होऊन त्यांना कठोर शिक्षा होणे अपेक्षित आहे. जेणेकरून पुढच्या वेळी असे वक्तव्य करताना चार वेळा विचार करतील. यांच्या धर्माविषयी कोणी वक्तव्य केले तर त्याचा शिरच्छेद होऊन सगळीकडे दंगली घडवून आणतील. संपूर्ण भारताला आणि जगाला दंगली करून हादरवून टाकणारे हे लोक, यांना इतरांचा विचार करणे माहीतच नाही. असे लोक राक्षसी प्रवृत्तीचे आहे का? म्हणे ब्रह्माजीने शंकरजींची सुंता केली असताना शिवलिंगाची पूजा कशी करतात तसेच श्रीकृष्णाला पाच वेळा नमाज करणारे म्हणणारे हे निकृष्ट दर्जाचे लोक भारतात तरी राहण्याच्या लायकीचे आहेत काय? ज्या देशात जन्म घेतला आहे, जेथे राहतो आहे तिथल्या सोयी, सुविधा वापरतो आहोत त्या भूमीशी, तेथील बहुसंख्यांक लोकांच्या भावनेशी बांधीलकी ठेवणे महत्त्वाचे नाही का? जिथे खातो तिथेच घाण करणे ही यांची नेहमीची सवय आहे का? याचा सर्व समाजाने विचार करावा आणि सरकारने देखील यांना कडक शिस्तीत ठेवावे असे वाटते.

**डॉ.भारती हेडाऊ,** यवतमाळ

मंगळवार, दि. ४ ऑगस्ट २०२६
E-mail:-ytljanmadhyam@gmail.com

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सत्य

# यवतमाळकरांचा विकास 'थकबाकी'त गाडला!

## महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा कोटींचा डोंगर, नगरपरिषद–समस्या कायम

**✦जनमाध्यम | प्रतिनिधी**




**यवतमाळ, दि. ३ :** यवतमाळ शहरातील विकासकामांना प्रशासनाच्या आर्थिक व समन्वयाच्या अपयशाचा मोठा फटका बसला असून, यवतमाळ नगरपरिषद आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (एमजेपी) यांच्यातील पावणे दोनशे कोटी रुपयांच्या थकबाकीच्या तिढ्यामुळे शहर अक्षरशः वेठीस धरले गेले आहे.

अधिकृत माहितीनुसार नगरपरिषदेकडे एमजेपीची सुमारे अंदाजे १५० ते १७५ कोटी रुपयांची देयके थकीत असून, त्यातून अमृत योजनेचे २५ कोटी, ड्रेनेज योजनेचे ७१ कोटी, पाणीपुरवठ्याची ३३ कोटींची थकबाकी, नगरोत्थान पाणीपुरवठा योजनेचे १२ कोटी आणि भूमिगत गटार योजनेचे १० कोटी रुपये अडकले आहेत. धक्कादायक बाब म्हणजे, दोन्ही शासकीय यंत्रणा एकमेकांकडे बोट दाखवत जबाबदारी झटकत असल्याने विकासकामांचा पूर्णपणे बोजवारा उडाला आहे. आर्थिक अडचणीमुळे अनेक ठेकेदारांची कोट्यवधी रुपयांची देयके रखडली असून, अनेक ठिकाणी कामे अर्धवट सोडण्यात आली आहेत. काही ठिकाणी निकृष्ट दर्जाची कामे उरकली जात असल्याच्या तक्रारीही वाढत आहेत. अमृत व ड्रेनेज योजनांसाठी खोदण्यात आलेले रस्ते महिनोनमहिने तसेच पडून असल्याने शहरातील बहुतांश मार्गांची चाळण झाली आहे. पावसाळ्यात खड्ड्यांमध्ये पाणी साचून अपघातांचा धोका वाढला असून, नागरिकांना वाहतुकीचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. उघड्या मातीमुळे धूळ उडत असल्याने श्वसनाचे आजार, पाठीचे व मणक्याचे विकार वाढत असल्याची नागरिकांची तक्रार आहे. वाहनधारकांनाही दररोज आर्थिक फटका बसत आहे. शहराच्या विकासाचा बळी प्रशासकीय ताणतणावात जात असल्याचा संताप आता उघडपणे व्यक्त होत आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी व वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने हस्तक्षेप करून थकबाकीचा प्रश्न मार्गी लावावा, संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांची चौकशी करावी आणि रखडलेली अमृत, ड्रेनेज व रस्त्यांची कामे निश्चित मुदतीत पूर्ण करण्यासाठी कठोर आदेश द्यावेत, अशी जोरदार मागणी यवतमाळकरांकडून होत आहे.

# सेलू (बुद्रुक) येथे वरळी-मटका राजरोस सुरू..!

## उपविभागीय पोलीस अधिकारी अमर मोहिते लक्ष घालणार का?

**✦जनमाध्यम | प्रतिनिधी**

**पुसद, दि. ३ :** पुसद शहरापासून अवघ्या पाच किलोमीटर अंतरावर असलेल्या उमरखेड रोडलगतच्या सेलू (बुद्रुक) गावात अवैध वरळी-मटका व्यवसाय खुलेआम सुरू असल्याचा गंभीर आरोप ग्रामस्थांनी केला आहे. बसस्थानक परिसरातील हॉटेल व दुकानांमध्ये पाच ते सहा ठिकाणी मटका काउंटर सुरू असून, स्थानिकांकडून दरमहा मोठ्या प्रमाणात हप्ते घेतले जात असल्याची चर्चा परिसरात रंगली आहे.

त्यामुळे संबंधितांवर कोणाचाही धाक उरला नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.सेलू सह वेणी, खडकदरी, कोंढई, दहिवड, कोपरा, कृष्णनगर, पंजवाडी आदी गावांतील शेतकरी, मजूर आणि काही महिला मोठ्या प्रमाणात येथे मटका खेळण्यासाठी येत असल्याचे चित्र आहे. परिणामी सकाळपासूनच राज्य मार्गावर गर्दी होत असून, शाळकरी विद्यार्थी व प्रवाशांना वाहतुकीचा त्रास सहन करावा लागत आहे. ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, अनेक कुटुंबांचा कष्टाचा पैसा या अवैध जुगारात खर्च होत असून त्यामुळे आर्थिक संकट वाढत आहे. शेतकऱ्यांचे बियाणे, शेती औषधे व मजुरीचे पैसेही मटक्यात जात असल्याने अनेक कुटुंबे उद्ध्वस्त होण्याच्या मार्गावर असल्याची खंत व्यक्त केली जात आहे. त्यामुळे परिसरातील कायदा व सुव्यवस्थेचाही प्रश्न निर्माण होण्याची भीती व्यक्त होत आहे. यापूर्वीही या अवैध व्यवसायाबाबत वृत्त प्रसिद्ध झाले होते. मात्र त्यानंतरही कारवाई न झाल्याने पोलीस प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. दरम्यान, पुसद येथे नुकतेच रुजू झालेले उपविभागीय पोलीस अधिकारी अमर मोहिते यांनी शहरातील ऑनलाइन जुगार व मटक्यावर धाड टाकून कारवाई केली होती. त्यामुळे आता सेलू (बुद्रुक) येथील अवैध वरळी-मटका अड्ड्यांवरही कठोर कारवाई करून हा व्यवसाय कायमस्वरूपी बंद करावा, अशी मागणी शेतकरी, मजूर, महिला, पालक आणि नागरिकांकडून होत आहे.

# उमेद च्या महिला शेतकरी कंपनीचा भूमिपूजन सोहळा संपन्न.!

**✦जनमाध्यम | प्रतिनिधी**



**पुसद, दि. ३ :** दिनांक ०२ ऑगस्ट २०२६ रविवार रोजी बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (SMART) प्रकल्प अंतर्गत, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवन्नोती अभियान, पंचायत समिती पुसद यांच्या माध्यमातून नागपुत्री महिला फार्मर प्रोड्युसर कंपनी, काकडदाती व विकसित कृषी महिला फार्मर प्रोड्युसर कंपनी, जांब बाजार या दोन्ही कंपनींच्या इमारतीचे भूमिपूजन काकडदाती येथे संपन्न झाले.

या कार्यक्रमाचे भूमिपूजन ना.इंद्रनील नाईक राज्यमंत्री तथा पालकमंत्री गोंदिया व नगराध्यक्षा मोहिनीताई इंद्रनील नाईक यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी दिलीप पारध माजी जिल्हा परिषद सदस्य,शोभा शेवाळे सरपंच काकडदाती,अश्विन तांबडे ग्रामविकास अधिकारी, काकडदाती,ग्राम पंचायतचे सर्व पदाधिकारी व सदस्य,तसेच गौरव कुमार कांबळे तालुका अभियान व्यवस्थापक उमेद, अर्शद अहमद तालुका व्यवस्थापक उमेद, इम्रान शम्मी कुरेशी प्रभाग समन्वयक काकडदाती, सत्यम साळवे प्रभाग समन्वयक जांबबाजार, विकसित कंपनीच्या अध्यक्षा सविता राठोड व नागपुत्रि कंपनीच्या अध्यक्षा माया आगलावे तसेच दोन्ही फार्मर प्रोड्युसर कंपनींचे सर्व पदाधिकारी संचालक, उमेद अभियानातील सर्व कर्मचारी व ग्रामसखी मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. कार्यक्रमा करिता सर्व प्रभाग समन्वयक,सर्व प्रभाग व्यवस्थापक व सर्व प्रभाग कृषी,पशुधन व्यवस्थापक यांनी परिश्रम घेतले.कार्यक्रमाचे सूत्र संचालन व आभार प्रदर्शन नूतन खिल्लारे प्रभाग समन्वयक श्रीरामपूर यांनी केले.

# एकही शेतकरी मदतीपासून वंचित राहणार नाही..!

## नुकसानीचे पंचनामे तातडीने करा – मंत्री डॉ. अशोक उईके

**✦जनमाध्यम | प्रतिनिधी**



**बाभूळगाव, दि. ३ :** बाभूळगाव तालुक्यात अतिवृष्टीमुळे झालेल्या शेती व सार्वजनिक मालमत्तेच्या नुकसानीची पाहणी करण्यासाठी आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके यांनी नुकसानग्रस्त गावांना भेट देत परिस्थितीचा आढावा घेतला.एकही शेतकरी शासनाच्या मदतीपासून वंचित राहू नये, असे स्पष्ट निर्देश देत त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना पंचनामे तातडीने पूर्ण करून मदत प्रस्ताव सादर करण्याचे आदेश दिले.

नांदुरा (बु.) येथे नागरिकांशी संवाद साधताना अशोक महानूर, डॉ.कृष्णा देवमुंडे, अविनाश जानकर व गुणवंत महानूर यांनी बेंबळा प्रकल्पाचे २० दरवाजे एकाचवेळी उघडल्यामुळे मोठ्या प्रमाणावर शेती खरडून गेली, वीज खांब, गोठे, स्प्रिंकलर संच, पाइप व शेतीची अवजारे वाहून गेल्याची माहिती दिली. या मानवनिर्मित संकटाला प्रकल्प प्रशासन जबाबदार धरून चौकशी व कारवाईची मागणीही करण्यात आली. त्यानंतर मंत्री उईके यांनी विरखेड, वाटखेड, वाटखेड खुर्द, हस्तापूर व सावंगी मांग येथे प्रत्यक्ष शेतात जाऊन नुकसानीची पाहणी केली. पुरामुळे शेतरस्ते व पूल वाहून गेल्याने नागरिकांनी तातडीच्या मदतीची मागणी केली. यावेळी उपविभागीय अधिकारी गोपाल देशपांडे, तहसीलदार मीरा पागोरे, विविध विभागांचे अधिकारी, लोकप्रतिनिधी व कर्मचारी उपस्थित होते. शासनाकडून पात्र प्रत्येक शेतकऱ्याला मदत मिळेल, अशी ग्वाही मंत्री उईके यांनी यावेळी दिली.

# थोडक्यात



## मुकुटबन महावितरण कार्यालयात अधिकाऱ्याची दांडी..!

**युवासेनेचा खुर्चीला हार घालून निषेध**

**झरी-जामणी :** तालुक्यातील मुकुटबन महावितरण कार्यालयात आठवड्याच्या पहिल्याच दिवशी संबंधित अधिकारी अनुपस्थित असल्याचा आरोप करत युवासेनेचे निलेश बेलेकार यांनी अनोख्या पद्धतीने निषेध नोंदविला.

कार्यालयातील अधिकाऱ्याच्या रिकाम्या खुर्चीला हार घालून त्यांनी प्रशासनाविरोधात संताप व्यक्त केला.

यावेळी निलेश बेलेकार यांनी सांगितले की, महावितरण कार्यालयात वीजबिल, नवीन जोडणी, तांत्रिक बिघाड तसेच इतर विविध कामांसाठी नागरिक दूरदूरवरून येतात. मात्र जबाबदार अधिकारी वेळेवर कार्यालयात उपस्थित नसल्याने नागरिकांची कामे खोळंबत असून त्यांना नाहक मनस्ताप सहन करावा लागत आहे.अधिकारीच कार्यालयात नसतील तर नागरिकांच्या समस्या कोण सोडवणार?" असा सवाल उपस्थित करत त्यांनी महावितरण प्रशासनाने याची गंभीर दखल घेऊन संबंधित अधिकाऱ्यांवर योग्य कारवाई करावी, अशी मागणी केली. या प्रकारामुळे कार्यालयात आलेल्या नागरिकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले असून महावितरणच्या कामकाजाबाबत नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.



## शिवरामजी मोघे महाविद्यालयाचा 'नशामुक्त भारत' संकल्पाला युवा प्रतिसाद

**पांढरकवडा :** भारत सरकारच्या युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालय, MY Bharat आणि राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आलेल्या "नशा मुक्त युवा फॉर विकसित भारत" अभियानात शिवरामजी मोघे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाने उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. दि. २ ऑगस्ट रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ऑनलाइन मार्गदर्शन कार्यक्रमाचे महाविद्यालयात थेट प्रक्षेपण करण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांसह मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी कार्यक्रमात सहभाग घेत व्यसनमुक्त भारताची ऑनलाइन शपथ घेतली. शपथ पूर्ण होताच विद्यार्थ्यांना ई-प्रमाणपत्रही प्राप्त झाले.

या अभियानातून युवकांनी व्यसनमुक्त जीवनाचा संकल्प करत समाजात जनजागृती करण्याचा निर्धार व्यक्त केला. कार्यक्रमाचे नियोजन, ऑनलाइन प्रक्षेपण, नोंदणी व शपथ अभियानाची अंमलबजावणी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. अमर वंजारी यांनी केली. प्राचार्य डॉ. अजय सोळंके यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या उपक्रमात प्राध्यापक, स्वयंसेवक व विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घेत "नशामुक्त भारत – विकसित भारत" या राष्ट्रीय अभियानाला प्रभावी पाठबळ दिले.

## वीज समस्यांवर १२ ऑगस्टला काँग्रेसचा जनता दरबार

**यवतमाळ :** महावितरणच्या वाढीव वीजबिलांमुळे, स्मार्ट मीटर संदर्भातील तक्रारी, चुकीची बिले, सोलर रीडिंगमधील गोंधळ, वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा, नवीन वीज जोडणीतील विलंब तसेच इतर वीजविषयक समस्यांनी त्रस्त नागरिकांना न्याय मिळवून देण्यासाठी यवतमाळ जिल्हा काँग्रेस समितीच्या वतीने १२ ऑगस्ट २०२६ रोजी 'जनता दरबार' आयोजित करण्यात आला आहे. ही माहिती जिल्हाध्यक्ष अ‍ॅड. सचिन नाईक यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली. हा जनता दरबार सकाळी ११ ते दुपारी १ वाजेपर्यंत जिल्हा काँग्रेस समिती कार्यालय, साई श्रद्धा हॉस्पिटल शेजारी, सिंधी कॅम्प, यवतमाळ येथे होणार आहे. नागरिकांनी संबंधित कागदपत्रांसह उपस्थित राहून आपल्या तक्रारी नोंदवाव्यात. प्राप्त तक्रारींचा पाठपुरावा करून महावितरण प्रशासनाकडून त्यांचे निराकरण करण्याचा प्रयत्न करण्यात येणार असल्याचे पत्रकात नमूद करण्यात आले आहे.

# अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना तात्काळ मदत द्या..!

**✦जनमाध्यम | प्रतिनिधी**



**महागाव, दि. ३ :** महागाव तालुक्यात २९ व ३० जुलै रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे नुकसानग्रस्त झालेल्या शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत जाहीर करून पंचनामे पूर्ण करावेत, अन्यथा काँग्रेसच्या वतीने तीव्र लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा महागाव तालुका काँग्रेस कमिटीने दिला आहे. या मागणीचे निवेदन तहसीलदार, महागाव यांच्या मार्फत मुख्यमंत्री यांना सोमवारी सादर करण्यात आले.

या शिष्टमंडळाचे नेतृत्व तालुका काँग्रेस अध्यक्ष सुनील बाबूसिंग राठोड व शहर काँग्रेस अध्यक्ष तथा नगरसेवक शैलेश दिलीपराव कोपरकर यांनी केले. निवेदनात म्हटले आहे की, मुसळधार पावसामुळे तालुक्यातील अनेक गावांमधील कापूस, सोयाबीन, तूरसह खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. त्यामुळे महसूल व कृषी विभागाने तातडीने पंचनामे करून शासनाच्या नियमानुसार नुकसानभरपाई, आर्थिक मदत व आवश्यक सवलती जाहीर कराव्यात. यावेळी जिल्हा काँग्रेस उपाध्यक्ष शिवाजीराव देशमुख, महेंद्र कांबळे, इमरान पठाण, नितीन नरवाडे, अतुल शिंदे, सुनिल भवानकर, विठ्ठलराव पवार, तेजस नरवाडे, चंदाताई भांगे, सुनिता चंद्रवंशी, जयश्री नरवाडे यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी, महिला कार्यकर्त्या व मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या खात्यात तातडीने मदत जमा करावी, केवळ पंचनाम्यांची औपचारिकता करू नये, अन्यथा जनआंदोलन उभारले जाईल, असा ठाम इशारा काँग्रेसने शासनाला दिला.

# लो.अण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्साहात साजरी !



**✦जनमाध्यम | प्रतिनिधी**

**उमरखेड, दि. ३ :** साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्त वृक्षारोपण करून उमरखेड उपजिल्हा रुग्णालयात रुग्णांना फळे वाटप करण्यात आली . तसेच अण्णाभाऊ साठे चौकात खिचडीचे वाटप करण्यात आले . दुपारी लो.अण्णाभाऊ साठे यांच्या तैलचित्राची पुजा करून रथातून भव्य मिरवणूक काढण्यात आली . ढोल ताशांच्या गजरात स्त्री - पुरुषांनी सहभाग घेतला होता . झालेल्या विविध कार्यक्रमात नगरसेविका राधा इंगोले , गंगाधर काळे , दत्तात्रेय काळे , राजु गायकवाड , कृष्णा लांबटिळे , शेवंतराव गायकवाड , गोविंद इंगोले , देवानंद इंगोले , डि के धाडे ,जय बनसोड , दिलीप काळे , दामोदर इंगोले , पुरुषोत्तम काळे , नितिन लांबटिळे ,नागेश लांबटिळे , आदींनी सहभाग घेतला होता . समितीचे अध्यक्ष कपिल खंदारे यांचेसह पदाधिकार्यांनी कार्यक्रम यशस्वी केला .

# अण्णाभाऊ साठे जयंती चा ऐतिहासिक जल्लोष..!



**✦जनमाध्यम | प्रतिनिधी**

**वणी, दि. ३ :** साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त मादगी समाज संघटना व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे युवा विचार मंच, वणी यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य अभिवादन सोहळा आणि ऐतिहासिक प्रतिकृती रथ मिरवणूक उत्साहात पार पडली. डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक येथील कल्याण मंडपममध्ये झालेल्या कार्यक्रमास आमदार संजयभाऊ देरकर अध्यक्षस्थानी होते, तर माजी आमदार संजीवरेड्डी बोदकुरवार यांच्या हस्ते उद्घाटन झाले.

विविध मान्यवरांच्या उपस्थितीत अण्णाभाऊंच्या संघर्षमय जीवनकार्याला अभिवादन करण्यात आले तसेच समाजातील गुणवंतांचा सत्कार करण्यात आला. यानंतर प्रथमच अण्णाभाऊ साठे यांच्या भव्य प्रतिकृती रथासह ढोल-ताशांच्या गजरात शहरातून मिरवणूक काढण्यात आली. युवक, महिला, ज्येष्ठ नागरिकांसह हजारो समाजबांधवांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. विविध महापुरुषांच्या पुतळ्यांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. ठिकठिकाणी मिरवणुकीचे जल्लोषात स्वागत झाले. अण्णाभाऊंच्या विचारांचा जागर आणि समाजाच्या ऐक्याचे दर्शन घडविणारा हा सोहळा वणीच्या इतिहासातील संस्मरणीय जयंती उत्सव ठरला.

# गावात दवंडी न देता धरणाचे २० दरवाजे उघडले..!

## हजारो हेक्टर पिके पाण्याखाली, नागरिक, शेतकऱ्यांचा संताप

**✦जनमाध्यम | प्रतिनिधी**



**बाभूळगाव, दि. ३ :** बाभूळगाव तालुक्यातील बेंबळा धरणाचे तब्बल २० दरवाजे अचानक उघडून मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग करण्यात आल्याने नदीकाठच्या गावांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

धरणातून पाणी सोडण्यापूर्वी दवंडी, मोबाईल संदेश अथवा अन्य कोणत्याही माध्यमातून पूर्वसूचना देण्यात आली नसल्याचा आरोप ग्रामस्थ व शेतकऱ्यांनी केला असून, या निष्काळजीपणामुळे हजारो हेक्टरवरील पिकांचे मोठे नुकसान झाल्याची भावना व्यक्त होत आहे. गेल्या २४ तासांतील मुसळधार पावसामुळे धरणाच्या पाणीसाठ्यात मोठी वाढ झाल्याने ३१ जुलै रोजी सकाळी १० वाजता धरणाचे २० दरवाजे १५० सेंमीने उघडण्यात आले. सुमारे २,५०० दलघमी वेगाने पाण्याचा विसर्ग सुरू झाल्याने बेंबळा नदी दुथडी भरून वाहू लागली. नदीकाठच्या सुमारे तीन हजार हेक्टर क्षेत्रातील शेती पाण्याखाली गेल्याचा प्राथमिक अंदाज महसूल विभागाने व्यक्त केला आहे. अचानक वाढलेल्या पाण्यामुळे नदीपात्रालगत शेतीची कामे करणाऱ्या शेतकऱ्यांची, तसेच जनावरे चारण्यासाठी गेलेल्या नागरिकांची धावपळ उडाली. सावंगी मांग गावाचा संपर्क तुटला, तर वाटखेड येथील पुलावरून पाणी वाहू लागल्याने काही काळ वाहतूकही बंद ठेवावी लागली. दरम्यान, उपविभागीय अधिकारी गोपाल देशपांडे यांनी बेंबळा प्रकल्प विश्रामगृहात आढावा बैठक घेऊन नुकसानीचे पंचनामे तातडीने करण्याचे आदेश दिले. तहसीलदार मीरा पागोरे, अधीक्षक अभियंता योगेश सोनोणे, कार्यकारी अभियंता मनोज डोके यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते. मात्र, धरणाचे दरवाजे उघडण्यापूर्वीच प्रशासनाने गावागावांत दवंडी देऊन, मोबाईल संदेशाद्वारे किंवा अन्य प्रभावी माध्यमातून नागरिकांना सतर्क केले असते, तर नुकसानाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात कमी झाले असते, अशी तीव्र प्रतिक्रिया शेतकरी व ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. प्रभावित शेतकऱ्यांना तातडीने पंचनामे करून किमान ५० हजार रुपयांची नुकसानभरपाई द्यावी, तसेच भविष्यात पूर्वसूचना देण्याची सक्तीची यंत्रणा उभारावी, अशी मागणी काँग्रेससह ग्रामस्थांनी केली आहे.

# फुलसावंगीत हेल्थ टॉक शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद..!

**✦जनमाध्यम | प्रतिनिधी**



**फुलसावंगी, दि. ३ :** "आपले आरोग्य, आपली जबाबदारी" या संदेशाला केंद्रस्थानी ठेवत फुलसावंगी पत्रकार संघाच्या वतीने आयोजित हेल्थ टॉक आरोग्य शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. विविध आजारांनी ग्रस्त रुग्णांना तज्ज्ञांचा थेट सल्ला, योग्य उपचारपद्धती आणि आरोग्यदायी जीवनशैलीबाबत मार्गदर्शन देण्याच्या उद्देशाने आयोजित या शिबिरात मोठ्या संख्येने रुग्ण सहभागी झाले.

दैनिक लोकसूत्रचे कार्यकारी संपादक केशव सवळकर, माजी जिल्हा परिषद आरोग्य व शिक्षण सभापती देवानंद पवार, चारुदत्त जावरकर व योगेश धानोरकर यांच्या प्रमुख उपस्थितीत शिबिर पार पडले. तज्ज्ञांनी विविध आजारांबाबत रुग्णांच्या शंकांचे निरसन करत औषधोपचार, आहार, व्यायाम तसेच मानसिक आरोग्य जपण्याचे महत्त्व स्पष्ट केले. या उपक्रमाचे उपस्थितांनी स्वागत करत पत्रकार संघाच्या सामाजिक बांधिलकीचे कौतुक केले. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी पत्रकार संघाचे पदाधिकारी, सदस्य व स्थानिक नागरिकांनी सक्रिय सहभाग नोंदविला.

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना - २०२६

# प्रथम यादीत ७६,९७६ शेतकरी कर्जमुक्तीच्या लाभाकरीता पात्र

**अमरावती/का.प्र.**

महाराष्ट्र शासनाने २ जुन २०२६ रोजी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना, २०२६ जाहिर केली आहे. ही सर्व योजना महाआयटीने विकसीत केलेल्या पोर्टलद्वारे राबविण्यात येत आहे.या योजनेकरिता सहकार विभागामार्फत अमरावती जिल्ह्यातील १२४१४२ शेतक-यांची यादी महाआयटीच्या पोर्टलवर भरण्यात आली आहे व लाभार्थ्यांची पहिली यादी २५जुलै२०२६ रोजी प्रसिद्ध झाली असून या प्रथम यादीनुसार ७६,९७६ शेतकरी कर्जमुक्तीच्या लाभाकरीता पात्र आहेत.

या सर्व शेतक-यांनी आधार प्रमाणीकरण आपले जवळच्या आपले सरकार सेवा (सेतु) केंद्रावर जाऊन करावयचे आहे. सदर कर्जमुक्ती योजनेचा लाभ मिळण्याकरिता शेतक-यांचा ॲग्रीस्टॅक असणे आवश्यक असेल. आधार प्रमाणीकरण केल्या नंतरच कर्ज मुक्तीचा लाभ मिळणार आहे. यादीतील ७६९७६ शेतक-यांपैकी आजपर्यंत ४६४२१ शेतक-यांनी आधार प्रमाणीकरण केलेले असुन अद्याप ३०५५५ आधार प्रमाणीकरण होणे बाकी आहे.



काही ठिकाणी अश्या तक्रारी येत आहेत कि, गाव पातळीवर प्रसिद्ध झालेल्या यादी मधील रक्कम आणि शेतक-यांची वास्तवीक कर्जाची रक्कम यामध्ये तफावत दिसुन येत आहे. यामुळे शेतक-यांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. परंतु शेतक-यांनी गोंधळून न जाता आधार प्रमाणीकरण करतांना जी रक्कम शेतक-यांना दिसते ती रक्कम शासन बँकांना वर्ग करणार असुन उर्वरीत रक्कम ही बँक स्वतः भरणार आहे. म्हणजेच उर्वरीत रक्कम बँकेकडून माफ होणार आहे. त्यामुळे शेतक-यांना ३१मार्च २०२६ पर्यंतच्या थकबाकी मध्ये दोन लाख रुपये पर्यंत संपूर्ण कर्जमुक्तीचा लाभ मिळणार आहे. तरी शेतक-यांनी आपले आधार प्रमाणीकरण करुन घ्यावे.

कुठल्याही प्रकारची शंका असल्यास आपल्या बँक शाखेशी तसेच संबंधीत तालुक्यातील सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था या कार्यालयाशी संपर्क करावा.या व्यतिरीक्त शेतक-यांना काही इतर अडचणी जसे नाव चुकलेले आहे, कर्जाची रक्कम चुकलेली आहे किंवा खाते क्रंमाक चुकलेला आहे. तर त्यांना पोर्टलवर तक्रार नोंदविण्याचा पर्याय उपलब्ध करुन दिलेला आहे किंवा त्यांनी त्यांची तक्रार आपले तालुक्यातील सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था या कार्यालयाकडे करावी. त्यावर जिल्हास्तरीय समितीमार्फत निर्णय घेण्यात येईल.

त्याचप्रमाणे सर्व राष्ट्रीयकृत बँकांना विशेष सुचना आहेत कि, त्यांनी त्यांच्या शाखेत शेतक-यांच्या मदतीकरीता, त्यांना सल्ला व मार्गदर्शन देण्याकरीता शेतकरी सहायता कक्ष सुरु करावे आणि शेतक-यांना योग्य मार्गदर्शन करावे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेचा लाभ प्रत्येक पात्र शेतक-यास मिळावा हाच अमरावती जिल्हा प्रशासनाचा प्रयत्न आहे.सर्व पात्र शेतक-यांना १००टक्के आधार प्रमाणीकरण करुन घेण्याचे आवाहन जिल्हाधिकारी यांनी केले आहे.

## संक्षिप्त

### धामणगावात श्रीमद्भागवत कथा सप्ताह आजपासून

**धामणगाव रेल्वे -** श्रावण महिन्याच्या पावन आणि अध्यात्मिक पर्वानिमित्त माहेश्वरी परिवार व माहेश्वरी महिला मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने ४ ते १० ऑगस्ट दरम्यान दररोज दुपारी २ ते सायंकाळी ६ या वेळेत वृंदावन धाम, माहेश्वरी भवन येथे संगीतमय श्रीमद्भागवत कथा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या कथा सप्ताहात वृंदावन येथील ११ वर्षीय बालव्यास अंशिका आपल्या वाणीने श्रीमद्भागवत महापुराणातील अमृतमय कथा रसिकांना श्रवण करणार आहेत. कथा सप्ताहाचा शुभारंभ मंगळवार, ४ ऑगस्ट रोजी सकाळी ८ वाजता सिनेमा चौक येथील श्री लक्ष्मीनारायण मंदिरापासून वृंदावन धाम, माहेश्वरी भवनपर्यंत निघणाऱ्या कलश व शोभायात्रेने होणार आहे. भजन, कीर्तन आणि जयघोषाच्या वातावरणात भाविक या शोभायात्रेत सहभागी होणार आहेत. त्यानंतर प्रथम दिवशी दुपारी श्रीमद्भागवत महापुराणाच्या प्रथम श्लोकाचे विवेचन तसेच कथेच्या आध्यात्मिक महत्त्वावर प्रकाश टाकण्यात येईल. १० ऑगस्ट रोजी सुदामा चरित्र, परीक्षित मोक्ष, कथा विश्राम, हवन व पूर्णाहुतीसोबत कथा सप्ताहची सांगता होणार आहे. माहेश्वरी परिवार, माहेश्वरी महिला मंडळ, धामणगाव तहसील माहेश्वरी महिला संघटना तसेच बहू-बेटी मंडळ यांनी सर्व भाविकांना सहपरिवार उपस्थित राहून श्रीमद्भागवत कथामृताचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे.

### रहाटगाव येथे गुरुपौर्णिमा साजरी

**अमरावती -** रहाटगाव येथील श्री स्वामी समर्थ सेवा केंद्रात गुरुपौर्णिमा उत्सव भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. पहाटेपासूनच स्वामी भक्तांनी दर्शनासाठी आणि गुरुपूजनासाठी सेवा केंद्रात गर्दी केली होती.पहाटे स्वामी समर्थ महाराजांच्या मूर्तीचा आणि पादुकांचा अभ्यंगस्नान व महाभिषेक करून उत्सवाला सुरुवात झाली. त्यानंतर भूपाळी आरती आणि श्री स्वामी समर्थ जप करण्यात आला.दिवसभरातील धार्मिक व सामाजिक उपक्रमात सामूहिक श्री स्वामी चरित्र सारामृत पारायण: सकाळी ८.०० वाजता शेकडो भक्तांच्या उपस्थितीत श्री स्वामी चरित्र सारामृत ग्रंथाचे सामूहिक पारायण करण्यात आले.महापूजा त्यानंतर स्वामी महाराजांची महाआरती झाली. या वेळी संपूर्ण सेवा केंद्र 'श्री स्वामी समर्थ' च्या जयघोषाने मंदिर परिसर दुमदुमून गेले होते. महाआरतीनंतर उपस्थित सर्व भक्तांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. हजारो भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.या प्रसंगी सेवा केंद्राच्या प्रमुखांनी उपस्थितांना संस्कार व सेवाकार्याचे महत्त्व सांगताना सांगितले की, 'गुरुपौर्णिमा हा केवळ पूजनाचा दिवस नसून गुरूंच्या विचारांचे व संस्कारांचे आचरण करण्याचा संकल्प करण्याचा दिवस आहे. स्वामी महाराजांनी दिलेला 'भिऊ नकोस, मी तुझ्या पाठीशी आहे' हा संदेश मानवी जीवनाला दिशा देणारा आहे.' तसेच या उत्सवा दरम्यान कुंडली मार्गदर्शन देखील करण्यात आले होते.उत्सव शांततेत आणि शिस्तबद्ध रीतीने पार पडण्यासाठी सेवा केंद्राच्या सर्व महिला मंडळाच्या स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी परिसरातील तसेच भाविक भक्तांची मोठ्या संख्येने उपस्थित होती.



## शेतकरी संघटनेच्या ज्येष्ठ नेत्या कोकिळाताई काळमेघ यांचे निधन

**अमरावती/का.प्र.**

शेतकरी संघटनेच्या ज्येष्ठ नेत्या, माजी जिल्हा परिषद सदस्या आणि सामाजिक कार्यकर्त्या कोकिळाताई देविदासराव काळमेघ यांचे सोमवार, ३ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी निधन झाले. त्यांच्या निधनामुळे राजकीय, सामाजिक आणि शेतकरी चळवळीमध्ये शोककळा पसरली असून अनेकांनी त्यांना श्रद्धांजली अर्पण केली आहे.

कोकिळाताई काळमेघ यांनी शेतकरी संघटनेच्या माध्यमातून अनेक वर्षे शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी संघर्ष केला. विविध जनआंदोलनांत सक्रिय सहभाग घेत त्यांनी शेतकरी व सर्वसामान्य नागरिकांना न्याय मिळवून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले. त्यांचा



### राजकीय व सामाजिक क्षेत्रात शोककळा

स्पष्टवक्तेपणा, प्रेमळ स्वभाव आणि सर्वसामान्यांशी असलेला जिव्हाळा ही त्यांची ओळख होती.

शेतकरी संघटनेच्या अध्यक्षपदापासून ते जिल्हा परिषद सदस्य म्हणून त्यांनी सामाजिक आणि सार्वजनिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले. त्यांच्या जनहिताच्या कामांमुळे त्या नागरिकांच्या विश्वासू नेत्या म्हणून ओळखल्या जात होत्या.

त्यांच्या पश्चात दोन मुले, सून आणि दोन नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या अचानक निधनामुळे कुटुंबीयांवर तसेच त्यांच्यासोबत कार्य करणाऱ्या सहकाऱ्यांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

कोकिळाताई काळमेघ यांनी आयुष्यभर जपलेले कार्यकर्त्यांशी असलेले आत्मीय नाते आणि समाजासाठी केलेले कार्य कायम स्मरणात राहील. विविध सामाजिक, राजकीय आणि शेतकरी संघटनांनी त्यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त करत भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे.

## अण्णाभाऊ साठे जयंती व लोकमान्य टिळक पुण्यतिथी साजरी

**अमरावती/का.प्र.**

अस्मिता शिक्षण मंडळ द्वारा संचालित महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, अमरावती येथे साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे जयंती ही लेखन प्रेरणा दिवस म्हणून व लोकमान्य टिळक पुण्यतिथी या कार्यक्रमाचे संयुक्तिक आयोजन करण्यात आले .



या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाच्या प्राचार्य, डॉ. मीनल भोंडे, तर प्रमुख वक्ते म्हणून संगीत विभाग प्रमुख प्रा. डॉ. जगन्नाथ इंगोले हे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात दोन्ही महापुरुषांना पुष्प अर्पण व दीप प्रजनन करून करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते प्रा.डॉ. जगन्नाथ इंगोले यांनी याप्रसंगी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनावर प्रकाश टाकला. यावर्षीपासून महाराष्ट्र शासनाने अण्णाभाऊ साठे जयंती हा दिवस 'वाचन लेखन'प्रेरणा दिवस म्हणून साजरा करावा असे जाहीर केले,हे योग्यच असल्याचे त्यावेळी त्यांनी सांगितले, कारण साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे हे एक थोर साहित्यिक होते.

त्यांनी आपल्या लिखाणातून महाराष्ट्राच्या संस्कृतीला व साहित्याला अधिक बळकटी देण्याचे काम केले. त्यांनी लिहिलेल्या कादंबऱ्या ,पोवाडे ,गीते हे मराठी साहित्यातील अजरामर कलाकृती असल्याचे त्यावेळी त्यांनी सांगितले.अध्यक्ष प्राचार्य, डॉ. मीनल भोंडे यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे व लोकमान्य टिळक ही दोन्ही महापुरुष समाजाला प्रेरणा देणारे होते.

त्यांनी केलेले कार्य समाजाचे हित साधणारे असून दोन्ही महापुरुषांनी समाजाला एकत्र बांधण्याचे काम केले असल्याचे त्या म्हणाल्या.प्रास्ताविक प्रा.डॉ. संजय भगत यांनी केले तर आभार प्रा. डॉ. प्रज्ञा इंगळे यांनी मानले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद व विद्यार्थी उपस्थित होते.

## वनवैभव कॉलनीत श्री ज्ञानेश्वरी सामुदायिक पारायण सप्ताह

**अमरावती/का.प्र.**

वनवैभव फॉरेस्ट कॉलनी गृहनिर्माण संस्थेंतर्गत श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात आषाढी एकादशीनिमित्त १९ ते २६ जुलै या कालावधीत श्री ज्ञानेश्वरी सामुदायिक पारायण सप्ताह भक्तिभावात व उत्साहात पार पडला.सप्ताहभर हभप गणेश गिरी महाराज यांच्या वाणीतून श्री ज्ञानेश्वरी पारायण झाले. सप्ताहाच्या सांगतेनिमित्त पारायण पूर्ण करणाऱ्या भाविकांना त्यांच्या हस्ते श्री ज्ञानेश्वरी ग्रंथाचे वितरण करण्यात आले.

सप्ताहाची सुरुवात हभप भरत रेळे महाराज यांच्या समाज प्रबोधनपर सप्त खंजेरी कीर्तनाने झाली. तसेच श्री गुरुदेव सेवा भजन मंडळ, शेंदोळा (बु.) व विविध भजन मंडळांनी दररोज सायंकाळी भजनसेवा सादर करून परिसर भक्तिमय केला.२५ जुलै रोजी ग्रंथराज श्री ज्ञानेश्वरी माऊलींची पालखी मिरवणूक काढण्यात आली. त्यानिमित्त पालखी मार्ग रांगोळ्या व फुलांनी सजविण्यात आला होता. पालखीच्या ठिकठिकाणी भक्तिभावाने स्वागत करण्यात आले. या सोहळ्यात परिसरातील शेकडो भाविक सहभागी झाले. त्यामुळे वन वैभव परिसरात जणू पंढरपूर अवतरल्याचा भाव निर्माण झाला. रविवार, २६ जुलै रोजी सप्ताहाची सांगता हभप गणेश गिरी महाराज यांच्या काल्याच्या कीर्तनाने झाली. या कीर्तनाला मृदंगाचार्य विक्रम काठोडे व हार्मोनियमवादक मनोज झाडे यांची साथ लाभली. त्यानंतर महाप्रसादा चा कार्यक्रम पार पडला. हजारो भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. या सोहळ्याचे आयोजन वन वैभव फॉरेस्ट कॉलनी गृहनिर्माण संस्थेचे अध्यक्ष ज्ञानेश्वर भारसाकडे, उपाध्यक्ष चंद्रकांत पुसदकर, सचिव रमेश बोके, संजय गुहे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीते साठी सुनील काकडे, गडपल्ली वार, कोल्हे, पातोंड, अमृतकर, बानुबाकोडे, संजय भारसाकळे यांनी सहकार्य केले.

## मेळघाट व्याघ्र प्रकल्पात ८५ वाघांची नोंद

### समृद्ध वन परिसंस्थेमुळे वाघांच्या संख्येत वाढ

**अमरावती/का.प्र.**

मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील वाघांची संख्या सातत्याने वाढत आहे. उपलब्ध नोंदींनुसार, २०२२ मध्ये ५६, २०२३ मध्ये ६७, २०२४ मध्ये ७३ आणि २०२५ मध्ये ८५ वाघांची नोंद झाली आहे. मेळघाटची समृद्ध वन परिसंस्था, भक्ष्याची उपलब्धता आणि वनविभागाचे प्रभावी सुरक्षा उपाय यामुळे ही वाढ शक्य झाली आहे.

'आंतरराष्ट्रीय व्याघ्र दिन' हा वाघांच्या संवर्धनाबाबत जागरूकता निर्माण करण्याचा आणि निसर्ग संवर्धनाप्रती असलेल्या सामूहिक जबाबदारीची जाणीव करून देण्याचा एक प्रसंग ठरतो. प्रभावी संवर्धन धोरणे, वनविभागाचे अथक प्रयत्न आणि स्थानिक नागरिकांचे सहकार्य यामुळे वाघांच्या संख्येत ही वाढ झाली आहे. वाघांची वाढती संख्या अभिमानाची बाब असली, तरी मानव आणि वन्यजीव यांच्यातील सुरक्षित सहअस्तित्व टिकवून ठेवणे तितकेच महत्त्वाचे आहे.

मेळघाट जंगलाच्या परिसरात राहणारे नागरिक, शेतकरी, पशुपालक आणि वनोपज गोळा करणारे तसेच या भागाला भेट देणारे पर्यटक यांनी अधिक खबरदारी घेणे आवश्यक आहे. वनविभागाच्या पूर्वपरवानगी शिवाय कोणत्याही परिस्थितीत प्रतिबंधित वनक्षेत्रात प्रवेश करू नये. शक्य असल्यास एकट्याने जंगलात जाणे टाळावे.



पहाटे, संध्याकाळी किंवा रात्रीच्या वेळी जंगलातील हालचाली मर्यादित ठेवाव्यात; जर एखादे वन्यप्राणी दिसले, तर सुरक्षित अंतर राखावे आणि त्या प्राण्याला त्रास होणार नाही किंवा ते चिडणार नाही याची काळजी घ्यावी.

वनक्षेत्रातील कोणत्याही संशयास्पद हालचालींची किंवा वन्यजीवांशी संबंधित घटनांची त्वरित माहिती वनविभागाला द्यावी, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

## अन्नत्याग उपोषणानंतरही कारवाई नाही

**अमरावती/का.प्र.**

ग्रामपंचायत उत्तमसरा व जिल्हा परिषद माध्यमिक शाळेतील कथित भ्रष्टाचार प्रकरणात निष्पक्ष चौकशी होऊनही अहवालाची प्रत देण्यात आली नसल्याचा आरोप करत उत्तमसरा (ता. भातकुली) येथील अभिषेक सुभाषराव सवाई यांनी १५ ऑगस्ट २०२६ रोजी आत्मदहन करण्याचा इशारा दिला आहे. याबाबत त्यांनी जिल्हा परिषद अमरावतीचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना लेखी निवेदन सादर केले आहे. सवाई यांनी यापूर्वी न्याय मिळावा म्हणून अन्नत्याग उपोषण केले होते. त्यानंतर चौकशी समिती नेमून अहवाल सादर झाल्याचे सांगण्यात आले, मात्र वारंवार मागणी करूनही तसेच माहितीच्या अधिकाराखाली अर्ज करूनही अहवालाची प्रत मिळाली नसल्याचा आरोप त्यांनी केला आहे.न्यायासाठी अनेक महिने विविध कार्यालयांचे उंबरठे झिजवूनही कोणतीही ठोस कार्यवाही झाली नसल्याने मानसिक त्रास वाढल्याचे त्यांनी नमूद केले आहे. त्यामुळे १५ ऑगस्ट रोजी ग्रामपंचायत उत्तमसरा, पंचायत समिती भातकुली किंवा जिल्हा परिषद अमरावती या तीनपैकी एका कार्यालयासमोर आत्मदहन करणार असल्याचा अंतिम इशारा त्यांनी दिला असून, याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित अधिकारी व प्रशासनाची राहील, असेही निवेदनात म्हटले आहे.

### जानकी समुपदेशन सेंटरचे उद्घाटन



**अमरावती -** शहरातील डॉ शिव माया पंजाबराव पुंडकर हे मनोविकार तज्ञ, संमोहन तज्ञ तथा पुस्कार प्राप्त समुपदेशक व प्रशिक्षक म्हणुन सुपरिचित आहेत. त्यांनी विजय कॉलनी येथे जानकी समुपदेशन सेंटर म्हणून नवीन सेंटर सुरु केले आहे. या नवीन प्रकल्पाचा शुभारंभ संपन्न झाला.कार्यालयाचे उद्घाटन बी. के सितादीदी,डॉ. पंजाबराव व डॉ माया पुंडकर,अभिनंदन पेंढारी यांचे शुभहस्ते करण्यात आले.प्रास्ताविकपर भाषणातून डॉ शिवा पुंडकर यांनी जानकी समुपदेशन च्या माध्यमातून केल्या जाणाऱ्या कामकाजा संबधी विस्तृत माहीती दिली. कार्यक्रमास डॉ. भावना पुरोहित,डॉ. प्रवीण चौधरी,डॉ. स्वानंद लुंगे डॉ. डाफ़े,डॉ.नरेंद केचे,डॉ. स्वप्नील गावंडे, चंदु खेडकर,गुड्डू धर्माळे,ऋषिकेश राऊत, धिरज गुल्हाने,लोकेश गुल्हाने,संजय यादव, पंकज संगवई,मोहन भोयर,विनोद चोरे, महेश निंभोरकर,संजय ठाकरे, राजु चौधरी मित्रपरिवार पुंडकर परिवारातील नातलग बहुसखेने उपस्थित होते

### शिक्षक अरविंद वाघमारे यांच्याकडून ग्रंथभेट



**तिवसा -** येथील श्री राजर्षी शाहू महाराज सार्वजनिक वाचनालयात क्रांतीसूर्य लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती आणि भारतीय असंतोषाचे जनक लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त संयुक्त अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून तिवसा नगरपंचायतीचे विरोधी पक्षनेते अनिल थुल उपस्थित होते.अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीचे औचित्य साधून सुरवाडी, तिवसा येथील आदर्श शिक्षक अरविंद वाघमारे यांनी वाचनालयाला अण्णाभाऊ साठे यांच्या निवडक व दर्जेदार पुस्तकांचा संपूर्ण संच भेट दिलेत. वाचनालयातर्फे वाघमारे यांचा शाल व श्रीफळ देऊन अनिल थुल व अंकुश देशमुख यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.या प्रसंगी आयोजित कार्यक्रमाला नितीन गायकवाड,मधुकरराव पिंगळे, सतीश नंदनवार, अंकुश देशमुख, सुरज तंवर, आकाशसिंग बावरी,राजाभाऊ देशमुख, दिपक धानोरकर, प्रफुल बनसोड,कृणाल गौरखेडे, रोशन डगवार, सुरज भगत, यशवर्धन भगत,विशाल गडलिंग,हृषीकेश गंधे, अंकुश केवदे,सौरभ कटारणे,प्रिया अ. डहाके,राहुल धडांगे,यांच्यासह वाचनालयाचे पदाधिकारी, स्थानिक नागरिक आणि मोठ्या संख्येने वाचक वर्ग उपस्थित होता.

## अमरावती शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाबाबत प्रत्यक्ष स्थितीचा अहवाल मागवला

**अमरावती/का.प्र.**

मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने प्रशासनाला विदर्भक्षेत्रातील सर्व ११ शासकीय वैद्यकीय महाविद्यालयां बाबत प्रत्यक्ष स्थितीचे अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. या सर्व शासकीय महाविद्यालयांमधील वस्तुस्थिता बाबतचा तपशील खंडपीठाने पुढील तीन आठवड्यांत मागवला आहे.

यात दोन वर्षांपूर्वी सुरू झालेले अमरावती येथील महाविद्यालय तसेच विभागातील अकोला, यवतमाळ, वाशीम आणि बुलढाणा जिल्ह्यांमधील महाविद्यालयांचा समावेश आहे.अमरावती महाविद्यालयाप्रमाणेच, बुलढाणा आणि वाशीम येथील महाविद्यालयेही दोन वर्षांपूर्वीच सुरू झाली होती. न्यायालयाच्या निर्देशामुळे या वैद्यकीय महाविद्यालयांची प्रत्यक्ष स्थिती लवकरच जनतेसमोर येईल.न्यायमूर्ती अनिल किलोर आणि न्यायमूर्ती राज वाकोडे यांच्या खंडपीठाने आरोग्य आणि वैद्यकीय शिक्षण विभागाला हे निर्देश दिले.

एका जनहित याचिकेवर सुनावणी करताना हे निर्देश देण्यात आले. या याचिकेत असा आरोप करण्यात आला होता की या वैद्यकीय महाविद्यालयांमधील आरोग्य सेवांची स्थिती अत्यंत दयनीय आहे. तिथे पुरेसा कर्मचारी वर्ग नाही आणि उपकरणे चालवण्यासाठी तज्ज्ञांची कमतरता आहे. परिणामी, न्यायालयाने दररोज येणाऱ्या रुग्णांची संख्या, डॉक्टर, वॉर्ड अटेंडंट आणि इतर कर्मचाऱ्यांबाबत तपशील मागवला आहे; तसेच, रुग्णालये आणि महाविद्यालयांमध्ये व्हीलचेअर आणि स्ट्रेचरच्या उपलब्धतेबाबतही माहिती मागवण्यात आली आहे.



### पुढील सुनावणी तीन आठवड्यानंतर

जनहित याचिका सुनावणीसाठी दाखल करून घेताना, न्यायालयाने प्रत्येक वैद्यकीय महाविद्यालयाला ओपीडी रुग्णांच्या संख्येसह विविध तपशील सादर करण्याचे निर्देश दिले. विशेषतः, कर्मचाऱ्यांची कमतरता, दररोज येणारे आपत्कालीन रुग्ण आणि उपलब्ध सुविधा यांबाबत विचारणा करण्यात आली. सुनावणीदरम्यान, अमिकस क्युरी (न्यायालयाचे मित्र) ॲडव्होकेट ईशा ठाकरे यांनी न्यायालयाला सांगितले की त्यांनी विदर्भातील सर्व ११ शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांची प्रत्यक्ष पाहणी केली आहे. ॲडव्होकेट दीपक ठाकरे यांनी राज्य सरकारची बाजू मांडली. तीन आठवड्यांची मुदत देत, खंडपीठाने सर्व जिल्ह्यांमधील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांना त्यांचे अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले. न्यायालय स्वतः या अहवालांचे पुनरावलोकन करेल. त्यानंतर पुढील कारवाईबाबत निर्णय घेतला जाईल. विदर्भ क्षेत्रातील आरोग्य सेवा सुधारण्यासाठी उच्च न्यायालयाने सक्रिय भूमिका घेतल्याचे वृत्त आहे.

# परीक्षेपलीकडचे 'नीट'चे संकट

शिक्षणाकडे आपण आज मुख्यत: नोकरी, करिअर किंवा प्रवेशपरीक्षांच्या दृष्टीने पाहतो. पण महात्मा गांधींच्या मांडणीमध्ये समाजात जबाबदारीने जगणारा, स्वत: विचार करणारा आणि इतरांविषयी संवेदनशील असणारा नागरिक घडवणे हे शिक्षणाचे काम. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या दृष्टीने शिक्षण म्हणजे वंचित समाजाला समान संधी देणारे सर्वात प्रभावी साधन. म्हणूनच त्यांनी 'शिका, संघटित व्हा, संघर्ष करा' हा मंत्र दिला. शिक्षणामुळे माणूस स्वत:चे आयुष्य बदलू शकतो, समाजात आपले स्थान निर्माण करू शकतो, यावर त्यांचा विश्वास होता. या पार्श्वभूमीवर सध्याच्या 'नीट'च्या आंदोलनाकडे बघायला हवे.

'नीट' सुरू करताना सरकारने एक साधा युक्तिवाद मांडला होता. देशभर एकच परीक्षा असेल, तर सगळ्यांना समान संधी मिळेल. अनेक प्रवेशपरीक्षा द्याव्या लागणार नाहीत. प्रक्रिया अधिक पारदर्शक होईल. हे ऐकायला योग्य वाटते. पण महाराष्ट्र, तमिळनाडू, केरळ, बिहार किंवा ईशान्य भारतातील राज्यांमध्ये शालेय शिक्षण एकसारखे नाही. अभ्यासक्रम, शिकवण्याची भाषा, पद्धत, शिक्षकांची उपलब्धता, आर्थिक परिस्थिती वेगवेगळी आहे. अशा परिस्थितीत सगळ्या विद्यार्थ्यांना एकाच प्रश्नपत्रिकेने मोजणे म्हणजे समानता नव्हे. उलट आधीपासून असलेली विषमता यामुळे अधिकच वाढते.

गेल्या काही वर्षांत शाळांपेक्षा कोचिंग क्लास अधिक महत्त्वाचे बनले. डॉक्टर व्हायचे असेल तर चांगल्या कोचिंग क्लासमध्ये प्रवेश मिळणे हे महत्त्वाचे ठरू लागले. लाखो कुटुंबे मुलांच्या तयारीसाठी वर्षानुवर्षे मोठा खर्च करू लागली. विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या म्हणण्यानुसार, देशातील कुटुंबे 'नीट'साठी मिळून जवळपास केंद्र सरकारच्या वार्षिक शिक्षण अर्थसंकल्पाइतकाच खर्च करतात.

याचा सर्वात मोठा फटका अशा विद्यार्थ्यांना बसतो, ज्यांच्याकडे पैसा नाही; पण क्षमता आहे. ज्यांचे पालक कोट्याला किंवा हैदराबादला पाठवू शकत नाहीत. ज्यांना लाखो रुपयांचे कोचिंग परवडत नाही. अशा विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षा ही संधी असते; पण तीच पैशांवर अवलंबून राहू लागली, तर शिक्षणाचे मूळ उद्दिष्टच हरवते. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षणाला सामाजिक न्यायाचे साधन मानले होते. आज तेच शिक्षण हळूहळू आर्थिक ताकदीची स्पर्धा बनत चालले आहे.

आपण संपूर्ण देशाची प्रवेशव्यवस्था एका परीक्षेवर उभी केली आहे. त्यामुळे त्या एका परीक्षेत बिघाड झाला की सगळी व्यवस्था कोलमडते. लाखो विद्यार्थ्यांना पुन्हा परीक्षा द्यावी लागणार का, प्रवेश कधी होणार, निकालावर विश्वास ठेवायचा का, असे प्रश्न निर्माण होतात. एका संस्थेची चूक संपूर्ण देशाला भोवते. याचा अर्थ दोष केवळ अंमलबजावणीत नाही; व्यवस्थेच्या रचनेतही आहे.

या प्रश्नाचा आणखी एक महत्त्वाचा पैलू आहे. आपल्या राज्यघटनेने भारताची रचना संघराज्य म्हणून केली आहे. काही

**नीटच्या परीक्षांच्या मुद्द्यावर अखेर केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांना राजीनामा द्यावा लागला. पण ही घटना केवळ एका मंत्र्याच्या राजीनाम्याची नाही. भारतात शिक्षणाची जी अतिकेंद्रीकृत व्यवस्था उभी राहिली आहे, तिच्या मर्यादा यानिमित्ताने पहिल्यांदाच इतक्या स्पष्टपणे समोर आल्या आहेत.**




विषयांवर केंद्र सरकारची भूमिका महत्त्वाची असली, तरी राज्यांनाही स्वतंत्र अधिकार आणि जबाबदाऱ्या आहेत. शिक्षण हा त्यापैकीच एक विषय आहे. प्रत्येक राज्याची भाषा, समाजरचना, आर्थिक परिस्थिती, शैक्षणिक परंपरा आणि गरजा वेगळ्या आहेत. त्यामुळे शिक्षणाबाबतचे निर्णय घेताना राज्यांचा सहभाग असणे ही केवळ प्रशासकीय गरज नाही; ती राज्यघटनेमधली अपेक्षा आहे. दुर्दैवाने गेल्या काही वर्षांत आपण नेमकी उलटी दिशा घेतलेली दिसते. शिक्षणातील जवळपास प्रत्येक महत्त्वाचा निर्णय हा केंद्राकडून घेतला गेला आहे. परीक्षा केंद्राची, प्रवेशप्रक्रिया केंद्राची, धोरण केंद्राचे आणि अंमलबजावणीची जबाबदारी मात्र राज्यांची. शाळा राज्यांनी चालवायच्या, शिक्षक राज्यांनी भरती करायचे, विद्यार्थ्यांच्या अडचणी राज्यांनी सोडवायच्या; पण त्या विद्यार्थ्यांचे भविष्य ठरवणाऱ्या परीक्षेत राज्यांचा आवाज जवळपास नसावा, ही परिस्थिती कोणत्याही संघराज्य व्यवस्थेला शोभणारी नाही. राज्यांवर जबाबदारी आणि केंद्राकडे अधिकार, असे हे असमतोल चित्र सध्या तयार झाले आहे.

तमिळनाडू आणि केरळसारख्या राज्यांनी सुरुवातीपासून 'नीट'ला विरोध केला. तमिळनाडूमध्ये अनेक दशकांपासून सरकारी शाळांमधून आणि ग्रामीण भागातून डॉक्टर घडावेत यासाठी वेगळी प्रवेशव्यवस्था विकसित झाली होती. 'नीट' लागू झाल्यानंतर ग्रामीण आणि राज्य मंडळाच्या विद्यार्थ्यांचे प्रमाण कमी झाल्याचा मुद्दा त्या राज्याने सातत्याने मांडला. एम. के. स्टॅलिन यांनी 'द हिंदू'मधील आपल्या लेखात भारतात शिक्षण ही फक्त परीक्षा घेण्याची प्रक्रिया नाही. ते समाजाशी, भाषेशी, संस्कृतीशी आणि स्थानिक वास्तवाशी जोडलेले आहे. त्यामुळे संपूर्ण देशासाठी एकच उपाय योग्य ठरेल, असा आग्रह धरणे चुकीचे आहे, असे म्हटले होते. हा मुद्दा तमिळनाडूपुरता मर्यादित नाही; तो भारताच्या संघराज्य व्यवस्थेच्या भवितव्याशी जोडलेला आहे.

कोणतीही सार्वजनिक संस्था कमकुवत झाली की तिची जागा लगेच दुसरी व्यवस्था घेते. आज विद्यार्थ्यांचा विश्वास शाळेपेक्षा कोचिंग क्लासवर अधिक आहे. अभ्यासापेक्षा टेस्ट सीरिज महत्त्वाची झाली आहे. मेहनतीपेक्षा कोणता क्लास, कोणत्या नोट्स, कोणते नेटवर्क याला जास्त किंमत आली आहे. प्रश्नपत्रिका फुटल्याच्या प्रत्येक घटनेनंतर अफवांचे बाजार सुरू होतात, अनधिकृत जाळी सक्रिय होतात आणि विद्यार्थ्यांची असुरक्षितता वाढते. सार्वजनिक संस्थांवरचा विश्वास कमी झाला की अशा समांतर व्यवस्था तयार होतात. त्या अधिक महाग असतात, कमी उत्तरदायी असतात आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे त्या विषमता वाढवतात.

म्हणूनच या संकटावरचा उपाय आणखी केंद्रीकरण असू शकत नाही. आणखी एक संस्था, आणखी एक सुरक्षा यंत्रणा किंवा आणखी एक नियम करून हा प्रश्न सुटणार नाही. भारताला राष्ट्रीय दर्जाचे निकष नक्कीच हवेत. देशात कुठल्याही राज्यात शिकलेल्या विद्यार्थ्याला उच्च शिक्षणाची समान संधी मिळायला हवी. पण त्यासाठी प्रत्येक निर्णय दिल्लीनेच घ्यावा, असे नाही. राज्यांना त्यांच्या सामाजिक वास्तवानुसार प्रवेशप्रक्रियेबाबत अधिक स्वायत्तता देणे, त्यांचे अनुभव ऐकून घेणे आणि केंद्राने समन्वयकाची भूमिका बजावणे, हा अधिक शाश्वत मार्ग ठरू शकतो. संघराज्य व्यवस्था म्हणजे विस्कळीतपणा नव्हे; तर ती जबाबदाऱ्यांची योग्य विभागणी आहे.

या सगळ्या चर्चेचा शेवट पुन्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांकडेच येतो. त्यांनी राज्यघटना लिहिली, पण त्याहून महत्त्वाचे म्हणजे त्यांनी 'घटनात्मक नीती'चा आग्रह धरला. सत्ता एका ठिकाणी जमा करणे, प्रत्येक प्रश्नाचे उत्तर केंद्रीकरणात शोधणे किंवा राज्यांवर अविश्वास दाखवणे, ही घटनात्मक नीती नाही. लोकशाही म्हणजे अधिकारांचे विकेंद्रीकरण, विविधतेचा स्वीकार आणि संस्थांवर विश्वास ठेवण्याची संस्कृती. भारतासारख्या देशात ही मूल्ये जपली, तरच शिक्षण खऱ्या अर्थाने समान संधी देणारे साधन राहील.

धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याने एका अध्यायाचा शेवट झाला असेल. पण खरी परीक्षा आता सुरू होते. आपण या घटनेकडे केवळ एका मंत्र्याच्या अपयशाप्रमाणे पाहणार आहोत, की आपल्या शिक्षणव्यवस्थेचा आणि संघराज्य व्यवस्थेचा गंभीरपणे फेरविचार करणार आहोत, हे आपल्याला ठरवायचे आहे? कारण भारताची ताकद 'एक देश, एक परीक्षा' या कल्पनेत नाही. ती विविध राज्यांना, विविध समाजांना आणि विविध वास्तवांना समान सन्मान देणाऱ्या राज्यघटनेत आहे. शिक्षणाने जर समान संधी द्यायची असेल, तर त्याची सुरुवात प्रश्नपत्रिकेच्या सुरक्षेपासून नव्हे, तर राज्यघटनेतल्या संघराज्याच्या आत्म्याला पुन्हा स्वीकारण्यापासून व्हायला हवी.

**प्रज्ञा शिदोरे**

# किशोर कुमार : हसरा आवाज आणि बेफिकीर स्वभाव

हिंदी चित्रपटसृष्टीला लाभलेले एकमेव 'अव्वल दर्जाचे अष्टपैलू' म्हणजे किशोर कुमार.गायक,अभिनेता,संगीतकार,गीतकार, निर्माता,दिग्दर्शक.चित्रपट निर्मितीतील जवळपास सर्वच क्षेत्रात त्यांनी आपली मोहर उमटवली.४ ऑगस्ट १९२९ रोजी मध्यप्रदेशातील खांडवा येथे आभास कुमार गांगुली म्हणून जन्मलेला हा मुलगा पुढे जाऊन करोडो लोकांच्या हृदयाचा ठोका बनला. स्वभाव बेफिकीर,बंडखोर पण मनाने माणूस किशोरदा म्हणजे शिस्तीच्या चौकटीत न बसणारा कलाकार.सेटवर कधी उशिरा येणे, कधी गाणे मध्येच थांबवून विनोद करणे, कधी दिग्दर्शकालाच सल्ला देणे हे त्यांचे वैशिष्ट्य. पण याच बेफिकीरपणामागे एक संवेदनशील माणूस होता. गरजू लोकांना मदत करणे, नवीन कलाकारांना संधी देणे यात ते पुढे. त्यांचा हा 'बिंधास्त' स्वभावच त्यांच्या गाण्यांमध्ये आणि अभिनयात उतरला.



गाण्याविषयी बोलायचे तर प्रत्येक मूडसाठी एक किशोर. किशोर कुमार म्हणजे एका व्यक्तीत अनेक गायक. उदा. रोमँटिक -'ये शाम मस्तानी', 'पल पल दिल के पास'. उदास- 'मेरे नयना सावन भादो', 'एक दिन बिक जाएगा'. मस्ती भरे- 'एक चतुर नार', 'जानेमन जानेमन'. देशभक्तीपर- 'मेरा देश महान'. त्यांचा आवाज हा वाद्य होता. घसा, शिट्टी, हसणे, रडणे सगळे त्यात होते. म्हणूनच आजही ३० वर्षांनंतरही त्यांची गाणी तरुणांच्या प्लेलिस्टमध्ये आहेत. अभिनयात तर कॉमेडीचा बेताज बादशाह होते किशोरदा. 'चलती का नाम गाडी', 'हाफ टिकिट', 'पडोसन' मधील त्यांचा अभिनय म्हणजे अभिनयाची शाळा. चेहरा, हातवारे आणि टायमिंग यांचा अफलातून मिलाफ. विनोदाबरोबर 'आराधना', 'अमर प्रेम' मधील त्यांचा गंभीर अभिनयही तितकाच गाजला.

भारतरत्नाची मागणी- अशा या अष्टपैलू कलाकारा ला भारतरत्न मिळावा अशी संगीतप्रेमींची मागणी आजही कायम आहे. संगीत आणि चित्रपट क्षेत्रातील लता मंगेशकर, उस्ताद बिस्मिल्ला खान, भीमसेन जोशी, सत्यजित रे यांना देशाच्या सर्वोच्च सन्मानाने गौरविण्यात आले. पण गायन, संगीत, लेखन, दिग्दर्शन आणि अभिनय अशा सर्वच आघाड्यांवर झेंडा फडकवणाऱ्या किशोर कुमारांना मात्र अद्याप हा सन्मान मिळालेला नाही. ४ ऑगस्ट २०२६ रोजी त्यांच्या ९७ व्या जयंतीनिमित्त पुन्हा एकदा देशाला विनंती आहे की, या अष्टपैलू कलावंताला 'भारतरत्न' देऊन सन्मानित करावे. ही फक्त एका व्यक्तीची नव्हे, तर करोडो रसिकांची मागणी आहे.कारण किशोर कुमार म्हणजे फक्त एक नाव नाही. तो एक मूड आहे, एक आनंद आहे, एक युग आहे.

**प्रा. विजय कोष्टी**

# तरुण पिढीचा आदर्श – तुकाराम मुंढे

आजच्या काळात तरुणांसमोर अनेक क्षेत्रांतील व्यक्ती आदर्श म्हणून उभ्या राहतात. मात्र प्रामाणिकपणा, निःस्वार्थीपणा, शिस्त आणि जनहितासाठी कठोर निर्णय घेण्याचे धैर्य या गुणांचा विचार केला तर अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे हे आजच्या तरुण पिढीसाठी प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व आहे.

सामान्य कुटुंबातून आलेल्या तुकाराम मुंढे यांनी कठोर परिश्रम, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण करून भारतीय प्रशासकीय सेवेत स्थान मिळवले. त्यांच्या यशामागे कोणतीही शॉर्टकटची वाट नव्हती; होती ती फक्त अभ्यास, प्रामाणिक मेहनत आणि समाजासाठी काहीतरी करण्याची तीव्र इच्छा. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याने आणि तरुणाने त्यांच्या जीवनप्रवासातून प्रेरणा घेण्यासारखे आहे.

अधिकारी म्हणून काम करताना त्यांनी नियमांचे काटेकोर पालन केले. कोणत्याही प्रकारचा राजकीय किंवा वैयक्तिक दबाव न स्वीकारता त्यांनी जनहिताला सर्वोच्च प्राधान्य दिले. त्यामुळे अनेक वेळा त्यांची बदली झाली, तरीही त्यांनी आपल्या तत्त्वांशी कधीही तडजोड केली नाही. हीच त्यांची खरी ओळख आहे.

कोविड-१९ महामारीच्या काळात त्यांनी केलेले नियोजन, नागरिकांशी साधलेला थेट संवाद आणि संकटाच्या काळात दाखवलेले नेतृत्व विशेष कौतुकास्पद ठरले. संकटातही शांत राहून योग्य निर्णय कसे घ्यावेत, याचे उत्तम उदाहरण त्यांनी समाजासमोर ठेवले.

आजच्या तरुणांनी तुकाराम मुंढे यांच्याकडून प्रामाणिकपणा, वेळेचे नियोजन, शिस्त, जबाबदारीची जाणीव आणि राष्ट्रहिताला प्राधान्य देण्याची वृत्ती शिकली पाहिजे. यश मिळवण्यासाठी शॉर्टकट नव्हे, तर कठोर परिश्रम आणि नैतिक मूल्ये आवश्यक असतात, हा संदेश त्यांचे संपूर्ण जीवन देत राहते.




समाजात सकारात्मक बदल घडवण्यासाठी प्रत्येक तरुणाने आपल्या क्षेत्रात प्रामाणिकपणे काम केले, तर देशाची प्रगती निश्चित आहे. तुकाराम मुंढे यांच्यासारख्या ध्येयवादी आणि निर्भीड अधिकाऱ्यांमुळे प्रशासनाविषयी लोकांचा विश्वास अधिक दृढ होतो. म्हणूनच ते आजच्या तरुण पिढीसाठी केवळ एक यशस्वी अधिकारी नसून, प्रामाणिक नेतृत्व, निस्वार्थ सेवा आणि चारित्र्याचे जिवंत प्रतीक आहेत.

'स्वप्ने मोठी असावीत, मेहनत प्रामाणिक असावी आणि तत्त्वांशी तडजोड कधीही करू नये' हा संदेश तुकाराम मुंढे यांच्या कार्यातून प्रत्येक तरुणाला मिळतो.

**मयूर हिराचंद डांगे**
अमरावती
मो.नं.८०५५९९३७९०

## त-ड-का

### खड्डेग्रस्त मृतकांचा आक्रोश..!

वर्षापुर्वी बांधलेल्या रोडवर
पडतातच कसे गड्डे ?
पुलही जाती वाहून
हा संशोधनाचा विषय
आहे की नाही सांगा गडे!

शास्त्रीय पध्दत डावलून
वापरती कमी दर्जाचे
मटेरियल कमिशन राजचा
बोलबाला हीच आहे फॅक्ट
रियल..!

काम सर्टीफाईड करणा-या
यंत्रणेवर जाते संशयाची सुई
शासन कडक ॲक्शन
घेण्यास का बरे करते
कुचराई..!

ए टू झेड आहेत मिंधे
कोण करेल उठाव ?
जिवघेण्या खड्ड्यापायी
शेकडो प्रवासी जाती
जिवाने तरी दोषींचा करती
बचाव ..!



**- प्रा.अशोक सारडा, मेहकर**
मो.९४२१३९४३३९

# मला देतो का उसने... तुझे थोडेसे हसणे ?

**मला देतो का उसने... तुझे थोडेसे हसणे? हे असे हसणे एकमेकांना देता यायला हवे. आजच्या काळात हसण्याचेही अनंत प्रकार पहायला मिळतात. दुसऱ्याचे आपल्या बद्दलचे हसणेही ओळखता यायला हवे असे म्हणतात कारण त्यामुळे समाजातील हसऱ्या वृत्तीमागील खरा चेहरा समजण्यास मदत होत असते.**

बालपणी शालेय जीवनात मराठी बालभारतीच्या पुस्तकात प्रसिद्ध नाटककार आणि लेखक राम गणेश गडकरी लिखित विसरभोळा गोकुळ आणि गोकुळची साक्ष हे दोन मराठी विषयातील लोकप्रिय आणि विनोदी पाठ आजही माझ्यासारख्या असंख्य लोकांच्या चिरकाल स्मरणात आहेत. त्या पाठात गोकुळ या पात्राचा विसरभोळा स्वभाव आणि त्यामुळे निर्माण होणारी गंमत लेखकाने अतिशय निखळ आणि सहजतेने मांडली होती. वाचकांच्या चेहऱ्यावर हसू उमटवताना त्यासाठी लेखकाने कुठेही द्विअर्थी आणि असभ्य भाषा यांचा आधार घेतल्याचे दिसत नाही कारण त्यावेळी विनोद हा केवळ विनोदाच्या चष्म्यातून व्यक्त केला जात असे. चिं. वि. जोशी, पु. ल. देशपांडे, आचार्य अत्रे आणि राम नगरकर यांच्या सकस विनोदाची परंपरा आपल्या मराठी भाषेला लाभली आहे. तेव्हा विनोद हा केवळ आणि केवळ हसणे आणि हसवण्यासाठी घडवून आणला जात असे. उपहास, उपरोध, टवाळकी, विडंबन, विसंगती, शाब्दिक कोट्या, नक्कल, बोचरे विनोद हे सगळे विनोदाचे प्रकार ऐकत, बघत लोकं खरोखरच खळखळून हसायची. मात्र काळ बदलला, मूल्ये बदलली त्यानुसार विनोदाचे संदर्भही बदलत गेले.

**समाजमाध्यमांवर स्टँडअप कॉमेडी**

मागच्या काही काळापासून समाजमाध्यमांवर स्टँडअप कॉमेडी हा विनोदाचा प्रकार प्रचलित होऊ पहात आहे. विशेषतः तरुण वर्गाला या प्रकाराने अल्पावधीतच भुरळ घातली. याधीही पारंपरिक विनोदाबरोबरच एकपात्री विनोद, विनोदी किस्से सांगणे किंवा फटकेबाजी हे प्रकार होतेच की. आयुष्याची गणिते गंभीरतेने सोडवताना विरंगुळ्याचे क्षण जर या माध्यमातून अनुभवता येत असतील तर त्याला ना किंवा हरकत असण्याचा प्रश्नच नाही. समोरच्याला रडवणे सोप्पं असते मात्र हसवणे तेवढंच अवघड काम. प्रेक्षकांशी थेट संवाद साधताना वेळेचा अचूकपणा, पूर्वनियोजित पण नैसर्गिकपणा जिवंत ठेवत समोरच्याला हसवण्याचा प्रचंड दबाव असतोच कलाकारावर. विनोद जेव्हा आपला दर्जा हरवून बसतो तेव्हा त्या बाबतीत भाष्य करणे अगत्याचे ठरते.

**ताणाचे क्षण हलके होतात**

हास्य.... हसणे इतके संसर्गजन्य असते की प्रसन्नतेचा गुणाकार व्हायला वेळ लागत नाही. हसताना कोणतीही व्यक्ती अधिक सुंदर दिसते. आपण हसतो तेव्हा ताणाचे क्षणही हलके होतात. आपले असे खळखळून हसण्याचे प्रसंग आठवा. अगदी फजिती झालेलेही. त्यावेळी आपल्याला वैताग आलेला असतो पण आज ते आठवताना हसू येते. दुःख, ताण, चिंता हे सारे असतेच भोवताली पण दोन क्षण का असेना, दिलखुलास हसता यायला हवे. आनंद संक्रमित झाला की वातावरण चैतन्यदायी होते.



**हसणे देता यायला हवे**

मला देतो का उसने... तुझे थोडेसे हसणे? हे असे हसणे एकमेकांना देता यायला हवे. पायात काटा रुतलेला असला तरी ओठांवर हसू सहजपणे उमलावे, उसने अवसान आणून नव्हे. आजच्या काळात हसण्याचेही अनंत प्रकार पहायला मिळतात. दुसऱ्याचे आपल्याबद्दलचे हसणेही ओळखता यायला हवे असे म्हणतात कारण त्यामुळे समाजातील हसऱ्या वृत्तीमागील खरा चेहरा समजण्यास मदत होत असते. शेवटी दुःख आहे, दुःखाला कारण आहे पण आनंदाला कारण असलेच पाहिजे, असे काही नाही.

उत्तम विनोद हा नेहमी मर्यादाशील, निरोगी आणि खेळाडू वृत्तीचा असावा लागतो. कारण असा विनोद हा कोणाचाही पाणउतारा न करणारा आणि सर्वांच्या चेहऱ्यावर आनंद आणणारा ठरत असतो. आत्मटीका अर्थात स्वतःच्या चुकांवर किंवा स्वतःवर हसण्याची क्षमता असणे, हे उत्तम विनोदबुद्धीचे लक्षण मानले जाते. हसणे आणि हसवणे हा आपल्या आयुष्याचा एक महत्त्वाचा भाग. मनोरंजनाची विविध माध्यमे समोर असताना विनोद करणारे बरेच जण मात्र खळखळून कसे हसवावे हेच विसरत चालले आहेत. कारण मुळात हसवण्यासाठीही सामाजिक गांभीर्य असावे लागते.

**सहज घडतो तो विनोद**

सध्या विनोदाचा दर्जा घसरण्यामागे बदलते माध्यम, प्रेक्षकांची मानसिकता आणि अल्पकालीन प्रसिद्धीची हाव या बाबी कारणीभूत ठरत आहेत. आशयघन संवादाऐवजी क्लुप्त्यांचा वापर वाढलाय. द्विअर्थी आणि असभ्य भाषा, इतरांची खिल्ली उडवणे, समाजमाध्यमांचा प्रभाव यामुळे नको असलेल्या विनोदाचे स्वरूप आपल्यासमोर स्टँड अप कॉमेडी निर्माण होत जाते. मुळात सहज घडतो तो विनोद. सध्या साहित्यातील नर्मविनोद मागे पडत असून, अतिरंजित आणि कृत्रिम विनोद लोकांच्या माथी मारले जात आहेत. आयुष्य जगताना सगळ्याच गोष्टी रसातळाला नेण्याची आपल्या समाजात आणि आपल्या सगळ्यांमध्ये जणू काय स्पर्धाच लागलीय अस काहीसे सध्याचं सामाजिक, सांस्कृतिक आणि महत्त्वाचे म्हणजे राजकीय वातावरण आहे. आपल्या आसपासच्या सामाजिक, सांस्कृतिक पातळीवर इतक्या वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये रोजच्या रोज ऱ्हासाची परिसीमा गाठली जात असताना आपण मात्र सोयिस्कर मौन धारण करत असतो, कारण प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे आपणही त्यात आपल्याही नकळत कधीकधी सहभागी असतोच.

या पार्श्वभूमीवर अशा कार्यक्रमांवर सरसकट बंदी घातली जावी, अशीही मागणी वारंवार पुढे येऊ पाहते. पण ही बाबही टोकाचीच की,अर्थात अशा विकृत गोष्टींना चाप बसायला हवा, नाही असे नाही, पण तो स्टँड अप कॉमेडी या प्रकाराला नाही, तर प्रसिद्धीसाठी काहीही करू पाहणाऱ्यांना. मुळात कायदा किंवा शिक्षा करून ही समस्या संपणारी नाही. कायदा करून कृतीवर तात्पुरता आळा घालता येईल मात्र त्यामुळे विकृत विचारांवर नियंत्रण मिळवता येणार नाही. बाजारात खपते तेच आम्ही विकतो असे म्हणत दर्जा घालवण्याची जबाबदारी सगळेच मनोरंजनकार समाजावरच टाकत असतात. त्यामुळे त्यांची समाजाप्रती असलेली जबाबदारी जशी संपुष्टात येत नाही अगदी त्याचप्रमाणे प्रेक्षक म्हणून आपणही अशा दर्जाहीन विनोदाला देत असलेली दाद आणि प्रोत्साहन, ही बाबही नाकारून चालणार नाही. मागच्या काळात वादग्रस्त ठरलेले स्टॅन्डअप कॉमेडी कार्यक्रम आणि त्यांच्यातील टिपण्या या विशेषतः लैंगिकतेशी संबंधित आहेत. स्त्री-पुरुष संबंधाकडे आजची पिढी तुलनेने मोकळेपणाने बघते आहे, बोलते आहे खरे तर ही चांगली बाब आहे. पण हे विनोद फक्त हीन नाहीत तर ते सामाजिक आणि सांस्कृतिक मूल्यवस्थेवरही प्रश्नचिन्ह निर्माण करत आहेत.

**स्वातंत्र्य मानवाचा मूलभूत अधिकार**

सरतेशेवटी आज गरज आहे ती स्वातंत्र्य आणि स्वैराचार यांच्यातील मूलभूत फरक समजून घेण्याची. स्वातंत्र्य हे मानवाचा मूलभूत अधिकार आणि जबाबदारी आहे तर स्वैराचार हा नियमांचा व नैतिकतेचा अभाव. आजची पिढी मात्र स्वातंत्र्याचा आपल्या सोयीनुसार अर्थ घेत विनोदाचे विकृतीकरण कसे करता येईल याकडे मार्गक्रमण झालेली दिसते. मोकळेपणा आणि उच्छृंखलपणा यातल्या सीमारेषेचे भान आपल्या प्रत्येकाला बाळगावेच लागेल. त्याशिवाय आपल्या समाजाची रचना आणि बांधणी करणे केवळ अशक्य!

**- विवेकानंद चव्हाण**
मो. ८६९८१८६१३०

# पावसाने भिंती कोसळल्या ; पंचनामा रखडल्याने नुकसानग्रस्त संतप्त

## खेट्रीतील ग्रामस्थांचे तहसीलदारांना निवेदन ; तातडीने कारवाईची मागणी

■ प्रतिनिधी | खेट्री (ता. पातूर) ■

पातूर तालुक्यातील खेट्री येथे झालेल्या मुसळधार पावसामुळे अनेक घरांच्या भिंती कोसळून मोठे नुकसान झाले आहे. मात्र, घटनेला चार ते पाच दिवस उलटूनही महसूल विभागाकडून पंचनामा करण्यात आलेला नसल्याचा आरोप करत नुकसानग्रस्त ग्रामस्थांनी सोमवारी (३ ऑगस्ट) तहसीलदारांकडे निवेदन देऊन तातडीने पंचनामा करून नुकसानभरपाई मंजूर करण्याची मागणी केली.

शिवसेना (शिंदे गट) तालुका सोशल मीडिया प्रमुख शेख साजीद यांच्या नेतृत्वाखाली नुकसानग्रस्त शेख नजीर शेख चांद, सय्यद असगर सय्यद गुलाब आदींनी तहसीलदारांना निवेदन सादर केले. सततच्या पावसामुळे अनेक घरांच्या भिंती कोसळून



कुटुंबांचे मोठे आर्थिक नुकसान झाल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, घटनेची माहिती तातडीने महसूल विभागाला देण्यात आली होती. मात्र, अद्याप घटनास्थळी भेट देऊन पंचनामा करण्यात आलेला नसल्याने शासनाकडून मिळणाऱ्या आर्थिक मदतीपासून वंचित राहण्याची भीती निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर तहसील प्रशासनाने संबंधित महसूल अधिकाऱ्यांना तातडीने घटनास्थळी पाठवून पंचनामा पूर्ण करावा आणि नुकसानग्रस्तांना शासनाच्या नियमानुसार मदत मंजूर करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

दरम्यान, 'पाच दिवसांपूर्वी झालेल्या मुसळधार पावसात घरांच्या भिंती कोसळल्याची माहिती महसूल कर्मचाऱ्यांना दिली होती. मात्र, पंचनामा करण्यास विलंब होत आहे. तातडीने पंचनामा न झाल्यास तहसील कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन करण्यात येईल,' असा इशारा शिवसेना (शिंदे गट) तालुका सोशल मीडिया प्रमुख शेख साजीद यांनी दिला.

## वाशीम अर्बन बँकेच्या वतीने सहकार मंत्री यांचे स्वागत

**अकोला :** राज्याचे सहकार मंत्री ना.बाबासाहेब पाटील यांचा वाशीम अर्बन बँकेच्या वतीने सत्कार करण्यात आला.ना पाटील यांच्या अकोला आगमन प्रसंगी त्यांनी माजी महापौर व बँकेचे जुना कापड बाजार शाखा सल्लागार मदन भरगड यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. यावेळी ना पाटील यांचा बँकेचे ज्येष्ठ संचालक रमेश बजाज,डॉ आर बी हेडा,मदनभाऊ भरगड यांनी शाल,श्रीफळ देऊन सत्कार केला.यावेळी ना पाटील यांना बँकेचा अहवाल प्रदान करण्यात आला.ना.पाटील यांनी बँकेचा नेट एनपीए नील असल्याबद्दल बँकेचे अभिनंदन करीत आपल्या शुभेच्छा प्रदान केल्यात.यावेळी बहुसंख्य अधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.


## जाहीर नोटीस

**वि.०२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ११६६/२०२६ प्रोसेस नं.९५००/२०२६
चौ.ता. ०२/०९/२०२६ दिनांक : २४/०७/२०२६

**अर्जदार :** १ श्रीमती शोभा भास्करराव देशमुख २. श्री. निलेश भास्करराव देशमुख ३. श्री. महेश भास्करराव देशमुख सर्व रा. गायत्री नगर, संध्या कॉलनी, अकोला ता. जि. अकोला, मो. क. ८०८७१०५०६६ ४. श्री. योगेश भास्करराव देशमुख रा. व्दारा, जी. ई. सल्पेकर, १२० बजाज नगर, शंकर नगर, नागपूर, ता. जि. नागपूर

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : भास्कर उर्फ भास्करराव गुलाबराव देशमुख
**पत्ता :-** रा. गायत्री नगर, संध्या कॉलनी, अकोला, ता. जि. अकोला. मो. क ८०८७१०५०६६

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७ कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत भास्कर उर्फ भास्करराव गुलाबराव देशमुख यांचे दि. २५/११/२०२५ रोजी अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०२/०९/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरून सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २४/०७/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि.०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १२५३/२०२६ प्रोसेस नं.९८३३/२०२६
चौ.ता. ०७/०९/२०२६ दिनांक : ३१/०७/२०२६

**अर्जदार :** १. दिपा तोलाराम मेंघानी २. निलम प्रकाश तारवानी रा. सिंधी कॉलनी, गुरूनानक नगर, कारंजा लाड, जि. वाशिम. ३. पायल मनोज विरवाणी रा. बाबा हरदासराम नगर, सिंधी कॅम्प, कच्ची खोली, अकोला. ४. निखिल तोलाराम मेंघानी दोघेही १ व ४ रा. ए-७, खंडेलवाल लॉन्स जवळ, राजेश्वर अपार्टमेंट, आदर्श कॉलनी, अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : तोलाराम मुलचंद मेंघानी
**पत्ता :-** रा. ए–७, खंडेलवाल लॉन्स जवळ, राजेश्वर अपार्टमेंट, आदर्श कॉलनी, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत तोलाराम मुलचंद मेंघानी यांचे दि. १३/०१/२०२६ रोजी अकोला. ता. जि. अकोला येथे मयत तोलाराम मुलचंद माननी निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

अर्जामध्ये सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०७/०९/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ३१/०७/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला


# 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर' उत्साहात संपन्न

- आ.हरीश पिंपळे यांच्या हस्ते उद्घाटन.
- शेकडो नागरिकांना एकाच छताखाली विविध योजनांचा लाभ

■ प्रतिनिधी | मूर्तिजापूर ■

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच स्व. अजित पवार यांच्या जयंतीचे औचित्य साधून मूर्तिजापूर शहरात 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिराचे' भव्य आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला मूर्तिजापूर विधानसभा मतदारसंघाचे आ. हरीश पिंपळे यांची प्रमुख अतिथी म्हणून उपस्थिती. व त्यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून उद्घाटन केले.नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून शासकीय योजनांचा लाभ घेतला. महसूल विभागासह इतर सर्वच प्रशासकीय विभागांच्या माध्यमातून नागरिकांच्या प्रलंबित समस्या व अडचणींचे निराकरण एकाच छताखाली करण्यात आले.

या समाधान शिबिराच्या माध्यमातून मूर्तिजापूर तालुक्यातील आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना आर्थिक मदतीचे वाटप करण्यात आले. तसेच विविध प्रकारचे शासकीय



दाखले आणि शासनाच्या कल्याणकारी योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांना प्रत्यक्ष सुपूर्द करण्यात आला. शासकीय कार्यालयांचे खेटे मारण्यापासून सुटका होऊन अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेली कामे एकाच ठिकाणी मार्गी लागल्याने नागरिकांनी मनापासून समाधान व्यक्त केले. शिबीरस्थळी सर्व शासकीय विभागांच्या प्रशासकीय कामकाजाची माहिती देणारे स्टॉल्स उभारण्यात आले होते. यासोबतच, मूर्तिजापूर विधानसभा मतदारसंघातून आलेल्या विविध महिला बचत गटांचे स्टॉल्स हे या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरले. महिलांनी स्वकष्टाने बनवलेले विविध खाद्यपदार्थ, बेकरी उत्पादने, वूलनच्या रांगोळ्या, कापड व चिक्की यांसारखी अनेक उत्पादने विक्रीसाठी उपलब्ध होती. या स्टॉल्सना नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

मान्यवरांची उपस्थिती अन् स्वागत कार्यक्रमाच्या प्रारंभी आयोजक मूर्तिजापूरच्या तहसीलदार शिल्पाताई बोबडे यांनी उपविभागीय अधिकारी संदीपकुमार अपार व उपस्थित सर्व मान्यवरांचे शाल व रोपटे देऊन स्वागत केले. प्रास्ताविक करताना उपविभागीय अधिकारी संदीपकुमार अपार म्हणाले,महसूल विभाग हा जनतेच्या सेवेसाठी सदैव तत्पर आहे. नागरिकांच्या विविध समस्या आणि अडचणी तातडीने सोडवण्यासाठीच अशा प्रकारच्या समाधान शिबिरांचे आयोजन करण्यात येत आहे. आ. हरीश पिंपळे, नगराध्यक्ष हर्षल साबळे, गटनेते गजानन नाकट, उपाध्यक्ष रोहित अवलवार, 'आत्मा' समितीचे तालुकाध्यक्ष शामल भूषण कोकाटे. प्रशासकीय व पोलीस अधिकारी डॉ. मिलिंद जगदाळे, बार्शिटाकळी तहसीलदार रवींद्र कापसीकर, उपविभागीय पोलीस अधिकारी वैशाली मुळे, ठाणेदार धर्मेंद्र जोशी, ठाणेदार नावकर, कृषी अधिकारी दीपक तायडे, संदीप जळमकर, इब्राहिम घाणीवाला, राहुल पाटील, राम खंडारे यांसह विविध विभागांचे कर्मचारी उपस्थित होते.

सर्व शासकीय विभाग एकाच ठिकाणी उपलब्ध झाल्याने शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या प्रकरणांवर अधिकाऱ्यांनी तातडीने कार्यवाही केली. शिबिराला मिळालेल्या या प्रचंड प्रतिसादामुळे प्रशासन आणि सामान्य नागरिक यांच्यातील समन्वय अधिक दृढ झाल्याचे पाहायला मिळाले. गरजू नागरिकांपर्यंत शासनाच्या योजना थेट पोहोचवण्यासाठी अशा शिबिरांचे नियमित आयोजन व्हावे, अशी अपेक्षा यावेळी नागरिकांनी व्यक्त केली व प्रशासनाचे आभार मानले.


## जाहीर सुचना

सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की आमचे पक्षकार गयाप्रसाद रामकिसन पटेल रा. अकोला यांनी नमन राजकुमार रूंगटा, रा. अकोला यांच्या मालकीचा खालील वर्णाकिंत फ्लॅट मौजे अकोला खुर्द अकोला म.न.पा. चे कक्षेतील शेत सव्हे नं १४/१, १४/२ व १४/३ चे जमीनची एस.डी.ओ. साहेब अकोला यांचे फाईलवरील रे.के. नं. एनएपी-३४/अकोली खुर्द /१०/२००२-२००३ आदेश पारित दि. १३.०३.२००३ नुसार मंजुर झालेल्या लेआउट मधील लेआउट प्लॉट नं. ३९ ( एकोणचाळीस ). या प्लॉट वर बांधलेल्या 'एमराल्ड प्लाझा' अपार्टमेंट विंग ई- मधील पहिल्या मजल्यावरील फ्लॅट क्र. १०१ ज्याचा एकूण सुपर बिल्डअप एरिया ९४० चौ. फुट ८७.३६ चौ.मि. ज्यास चर्तु:सिमा खालील प्रमाणे: पुर्वेस -फ्लॅट नं. १०२, पश्चिमेस लेआउट प्लॉट नं. ३०, उत्तरेस लेआउट प्लॉट नं. ३८, दक्षिणेस - फ्लॅट नं. १०४ विकत घेण्याचा ईसार पावती करारनामा व्दारे सौदा कायम केला असुन या जाहीर नोटीस व्दारे सर्वांना कळविण्यात येते की, कोणीही वरील वर्णनांकित फ्लॅट मिळकती करीता खरेदी, विक्री, हस्तांतरण, गहाणखत अथवा ईतर कोणत्याही दस्तान्वये व्यवहार करू नये, तसेच आमच्या पुर्व लेखी परवानगी संमती शिवाय जर कोणी व्यक्तीनी सदर मिळकती करिता व्यवहार करतील तर ते आमच्या पक्षकारास बंधनकारक राहणार नाही. अशा व्यवहाराची किंवा कार्यवाहीची संपुर्ण जबाबदारी संबधीत व्यक्तीची राहील अथवा उद्भवणा-या सर्व दिवाणी अथवा फौजदारी कार्यवाही संबधित व्यक्ती स्वतः जबाबदार राहतील आणि त्यांच्या विरुध्द योग्य त्या न्यायालयात योग्य ती कायदेशिर कार्यवाही करण्यात येईल. करीता जनहितार्थ जाहिर सुचना आज दिनांक ०३.०८.२०२६ रोजी जि. अकोला मुक्कामी प्रसिध्द केली.

स्थळ : अकोला
दिनांक : ०३.०८.२०२६

**पक्षकाराकरीता अधिवक्ता**
**ॲड. जितेंद्र श्री अकोलकर**

**Civil Judge Sr.Dn. Akola**
**IN THE COURT OF Shri V.R. Assudani**
**9th Jt Civil Judge Sr.Dn. Akola, Akola, Akola.**
SUMMONS FOR SETTLEMENT OF ISSUES
(0.5, R. 1, 5.)

Small Cause Suit/24/2025
Sai Construction And Developers LLP Thr. Its Shanky Rajendrakumar Jaiswal Vs Shri. Nathmal Velji And 2
NEXT DATE: 15-09-2026

To,
**Shri. Nathmal Velji And 2**
**R/o. 1734, Kalal Ki Chawl, Akola, Tq. Dist. Akola, AKOLA, MAHARASHTRA**

Whereas **Sai Construction And Developers LLP Thr. Its Shanky Rajendrakumar Jaiswal** has instituted a suit against you for you are hereby summoned to appear in this Court in person, or by a pleader duly instructed, and able to answer all material questions relating to the suit, or who shall be accompanied by some persons able to answer all such questions, on the **15-09-2026 at 11:00 o'clock in the forenoon,** to answer the claim; and further you are hereby directed to file on that day a written statement of your defence and to produce on the said day all documents in your possession or power upon which you base your defence or claim for set-off or counter-claim, and where you rely on any other document whether in your possession or power or not, as evidence in support of your defence or claim for set-off or counter-claim, you shall enter such documents in a list to be annexed to the written statement.

Take notice that, in default of your appearance on the day before mentioned, the suit will be heard and determined in your absence.

Given under my hand and the seal of the Court, this 28-07-2026

**9th Jt Civil Judge**
**Sr.Dn. Akola**

**Civil Judge Sr.Dn. Akola**
**IN THE COURT OF Smt. R.N. Bansal**
**3rd Jt Civil Judge Sr.Dn. Akola, Akola, Akola.**
SUMMONS FOR SETTLEMENT OF ISSUES
(0.5, R. 1, 5.)

R.C.S./396/2025
Sai Construction And Developers LLP Thr Partner Shanky Rajendrakumar Jaiswal Vs Shri Suhas Jaiswal And 1
NEXT DATE : 10-08-2026

To,
**Shri Suhas Jaiswal And 1**
**R/o. 1800 Kalal ki Chawl Akola, Tq.Dist.Akola, AKOLA, MAHARASHTRA**

Whereas **Sai Construction And Developers LLP Thr Partner Shanky Rajendrakumar Jaiswal** has instituted a suit against you for you are hereby summoned to appear in this Court in person, or by a pleader duly instructed, and able to answer all material questions relating to the suit, or who shall be accompanied by some persons able to answer all such questions, on the 10-08-2026 at **11:00 o'clock in the forenoon,** to answer the claim; and further you are hereby directed to file on that day a written statement of your defence and to produce on the said day all documents in your possession or power upon which you base your defence or claim for set-off or counter-claim, and where you rely on any other document whether in your possession or power or not, as evidence in support of your defence or claim for set-off or counter-claim, you shall enter such documents in a list to be annexed to the written statement.

Take notice that, in default of your appearance on the day before mentioned, the suit will be heard and determined in your absence.

Given under my hand and the seal of the Court, this 21-07-2026

**3rd Jt Civil Judge**
**Sr.Dn. Akola**

## जाहीर नोटीस

सर्व जनतेस या जाहीर नोटीस द्वारे कळविण्यात येते की, आमचे पक्षकार नामे सुरेश आत्माराम बोदडे, रा. खडकी बु, अकोला, ता. व जि. अकोला हे ईक्वीटास स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड, शाखा अकोला यांचेकडून रु. १५,००,०००/- (पंधरा लाख रुपये फक्त) रकमेचे कर्ज घेत असून सदरहू कर्ज हे खालील मालमत्ता बँकेकडे गहाण ठेऊन घेत आहेत. त्या मालमत्तेचे वर्णन - पूर्वीचे ग्रामपंचायत खडकी बु. चे हद्दीतील व आताचे महानगरपालिका अकोलाचे हद्दीतील, वार्ड क्र. D- ९ मौजे खडकी बु., अकोला, ता. व जि. अकोला येथील अकोला महानगरपालिका मालमत्ता क्र. ३४२१ (नवीन) व ८२० (जुना), प्लॉट क्र. ६३, सर्वे क्र. ४/१ (जुना) सदर प्लॉटचे एकुण क्षेत्रफळ १०८९.०० चौ. फुट म्हणजेच १०१.१७ चौ.मिटर व त्यावरील बांधकामासहीत ज्याच्या चतु:सीमा पूर्वेस – रस्ता; पश्चिमेस – माकोडे यांचे घर; उत्तरेस – पळसपगार यांचे मालकीचा प्लॉट ; दक्षिणेस – कवडे यांचे घर या प्रकारे आहेत. येणेप्रमाणे सदरहू वरील वर्णनाच्या व चतु:सीमेच्या आतील मिळकती संबंधी इतर कुणासही कसल्याही प्रकारचा अधिकार, हक्क, हितसंबंध, बोजा, गहाण किंवा काहीही वाद असल्यास त्यांनी आमच्याकडे सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३ दिवसाचे आत लेखी हरकत संबंधित कागदपत्रांसह दयावी. वरील मुदतीत हरकत प्राप्त न झाल्यास सदर मालमत्ता ही बिन बोजा व बिन भानगडीची असल्याचे समजून आमचे पक्षकार पुढील व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर कुणाची काहीही हरकत व उजर आमचे पक्षकारावर लागू व बंधनकारक राहणार नाही. करिता ही जाहीर नोटीस.

अकोला, दि. ०२/०८/२०२६.

**ॲड. एस. डी. तायडे**
जगदंबा नगर, खामगांव रोड,
शेगांव.मो. ९७३०८२९९२८

**IN THE COURT OF 3rd Jt. CIVIL JUDGE (SR.DN.), AKOLA [MAHARASHTRA]**
"Summons for Settlement of Issue"

Suit Rs./-
R.C.S. No. 381/2025
EF: 10/08/2026

**Sai constructions...Vrs.... Keshav**

To,
**1) Keshav N. Joshi**
**2) Arefa Khan Raheman Khan**
**Both R/o 1704, Kalal ki Chawl, Akola Tq & Dist. Akola.**

WHEAREAS Plaintiff has instituted a suit in this Court against you **"SUIT FOR EVICTION, POSSESSION, ARREARS OF RENT AND INQUIRY INTO FUTURE MENSE PROFIT"** You are hereby summonsed to appear in this court in person, or by a pleader duly instructed, and able to answer all material questions relating to suit, or who shall be accompanied by some person able to answer all such questions, on the 10/08/2026 at 11.00 O'Clock in the forenoon to answer the claim, (and further you are hereby directed to file on that day a written statement of your defence and to produce on the said day all documents in your possession or power upon which you base your defence or claim for set-off or counter-claim, and where you rely on any other document whether in your possession or power or not, as evidence in support of your defence or claim for set-off, or counter-claim you shall enter such documents in a list to be annexed to the written statement).

Take notice that in default of your appearance on the day mentioned above, the suit will be heard and determined in your absence. Also take notice that, in default of your filling and address for service on or before date mentioned you are liable to have defence struck out. Given under my hand and seal of the Court, this 30/07/2026. "Written Statement filed on within 30 days after service of summons."

**By Order,**
**Asst. Superintendent**
Civil Court (Senior Division), Akola

## जाहीर नोटीस

**वि.सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ११७३/२०२६ प्रोसेस नं.
चौ.ता. ०२/०९/२०२६ दिनांक : २३/०७/२०२६

**अर्जदार :** १. विशाल चंद्रमणी खंडारे, मो. क्र. ७०२८६२५८३३ २. राजेश चंद्रमणी खंडारे, ३. सिध्दांत चंद्रमणी खंडारे, १ ते ३ रा. गोरे किराणा जवळ, राहुल नगर, कृषी नगर, अकोला, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : लक्ष्मीबाई चंद्रमणि खंडारे
**पत्ता :-** रा. व्दारा विशाल चंद्रमणी खंडारे, मो. क. ७०२८६२५८३३ रा. गोरे किराणा जवळ, राहुल नगर, कृषी नगर, अकोला, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत लक्ष्मीबाई चंद्रमणि खंडारे यांचे दि. ११/०६/२०२६ रोजी राधाकृष्ण टॉकिज जवळ, अकोला, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक. ०२/०९/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २३/०७/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि.सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ९७६/२०२६ प्रोसेस नं.९६८७/२०२६
चौ.ता. ०९/०९/२०२६ दिनांक : २९/०७/२०२६

**अर्जदार :** १. श्रीमती. शारदा रामदास ठक्कर २. भावेश रामदास ठक्कर मो. ९८२२६९६१४७ दोघेही रा. अमृत निवास, एस. एस. जिन जवळ, खोलेश्वर, अकोला. ता. जि. अकोला. ३. सोनल कमलेश गनात्रा रा. फ्लॅट नं. २०६, संतकृपा सोसायटी, सी. ए. रोड, आंबेडकर चौक, नागपूर. ता. जि. नागपूर. ४. रूपल विनयकुमार जोबनपुत्रा रा. संगम कॉलनी, उखारी रोड, बलदेवबाग, जय प्रकाश नारायण वार्ड, लमती, विजय नगर कॉलनी, जबलपूर, मध्यप्रदेश. ५. रिता पार्थीव ठक्कर रा. १३०६, सागर हेरिटेज, गगन, सी. एच. एस. ठक्कर पाडा, कल्याण नॉर्थ, बी. एस. एन. एल. ऑफिस जवळ, कल्याण, ता. कल्याण, जि. ठाणे. ६. प्रिती रामदास ठक्कर रा. अमृत निवास, एस. एस. जिन जवळ, खोलेश्वर, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : रामदास गोपालदास ठक्कर
**पत्ता :-** रा. व्दारा भावेश रामदास ठक्कर रा. अमृत निवास, एस. एस. जिन जवळ, खोलेश्वर, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत रामदास गोपालदास ठक्कर यांचे दि. २०/०६/२०२५ रोजी देवकमल हॉस्पिटल, राम नगर, अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक. ०९/०९/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २९/०७/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि.०२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ११३८/२०२६ प्रोसेस नं.९१६१/२०२६
चौ.ता. २७/०८/२०२६ दिनांक : २०/०७/२०२६

**अर्जदार :** १. श्रीमती छाया अशोक कडू रा. उत्सव मंगल कार्यालयासमोर, जठारपेठ, अकोला, ता. जि. अकोला. मो. क्र. ९८२३२३९२३० २. सौ. नेहा अतुल मेंढे रा. व्दारा अतुल मेंढे, ट्रान्सिट ४, ऑफिसर्स मेस, वायुसेना नगर, नागपूर, ता. जि. नागपुर मो. क. ७७६८०००८५८ ३. श्री. स्वजिल अशोक कडू रा. प्रोफेसर कॉलनी, उत्सव मंगल कार्यालयासमोर, जठारपेठ, अकोला ता. जि. अकोला

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : अशोक रूपराव कडू उर्फ अशोक रूपरावजी कडू
**पत्ता :-** रा. उत्सव मंगल कार्यालयासमोर, जठारपेठ, अकोला, ता. जि. अकोला

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७ कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत अशोक रूपराव कडू उर्फ अशोक रूपरावजी कडू यांचे दि. १९/०८/१९९७ रोजी अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २७/०८/२०२६ रोजी सकाळी १:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरून सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २०/०७/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि.सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ११५७/२०२६ प्रोसेस नं.९४०७/२०२६
चौ.ता. ३१/०८/२०२६ दिनांक : २३/०७/२०२६

**अर्जदार :** १. अनिता परमेश्वर तेलंग २. प्रज्वलीत परमेश्वर तेलंग मो. नं. ७५१७८७३६०३ अर्जदार क्र. १ व २ रा. मोहता मिल, गौरक्षण, अकोला. ता. जि. अकोला. ३. सपना अनिल सोगे रा. राहूल बाल सदन जवळ, प्लॉट नं. ४२२, महेंद्र नगर, डॉ. आंबेडकर मार्ग, नागपूर. ता. जि. नागपूर. ४. अर्चना संजय पाटील रा. प्लॉट नं. २३/एन/ ३, बैगनवाडी, गोवांडी मुंबई जुना बस डेपो जवळ, शिवाजी नगर, कुर्ला मुंबई, सुबुरबन, जि. मुंबई. ५. शितल परमेश्वर तेलंग रा. प्लॉट नं. ४२२, महेंद्र नगर, ए. के. कॉम्प्युटर जवळ, डॉ. आंबेडकर मार्ग, नागपूर. ता. जि. नागपूर. ६. दिपा परमेश्वर तेलंग रा. प्लॉट नं. ४२२, जयभिम चौक, महेंद्र नगर, डॉ. आंबेडकर मार्ग, नागपूर. ता. जि. नागपूर. ७. सोनाली परमेश्वर तेलंग रा. प्लॉट नं. ४३ के हाउस नं. ३२ / ए १, नरसाला, गारगोटी परिसर, व्यंकटेश लेआउट, नरसाला, नागपूर. ता. जि. नागपूर.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : परमेश्वर कृष्णाजी तेलंग
**पत्ता :-** रा. मोहता मिल, गौरक्षण, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत परमेश्वर कृष्णाजी तेलंग यांचे दि. १९/११/२०१० रोजी राहत्या घरी, मोहता मिल, गौरक्षण, अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ३१/०८/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २३/०७/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि.०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ११९२/२०२६ प्रोसेस नं.९३३९/२०२६
चौ.ता. २९/०८/२०२६ दिनांक : २२/०७/२०२६

**अर्जदार :** १. कोकीळा अरूण वाठोरे २. किरणकुमार अरूण वाठोरे मो. क्र. ७०५७०२३३५४ ३. कुणाल अरूण वाठोरे क्र. १ ते ३ रा. राहुल नगर, शिवनी, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत :अरूण प्रल्हाद वाठोरे
**पत्ता :-** रा. राहुल नगर, शिवनी, अकोला. ता. जि. अकोला. मो. ७०५७०२३३५४

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत अरूण प्रल्हाद वाठोरे यांचे दि. ११/०२/२०२५ रोजी एम्स, खापरी, नागपूर येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास. दिनांक २९/०८/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २२/०७/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १२२७/२०२६ प्रोसेस नं.९७४७/२०२६
चौ.ता. ०८/०९/२०२६ दिनांक : ३०/०७/२०२६

**अर्जदार :** १. महादेव ईश्नाजी भड २. संदिप महादेवराव भड ३. मोहन महादेव भड ४. सुनिल महादेव भड ५. अनिल महादेव भड सर्व रा. माझोड, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : रत्नप्रभा महादेव भड
**पत्ता :-** रा. माझोड, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत रत्नप्रभा महादेव भड यांचे दि. ०३/०५/२०२० रोजी माझोड, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०८/०९/२०२६ रोजी सकाळी १:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ३०/०७/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला



जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक २३५**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

## संक्षिप्त

### क्षुल्लक कारणातून व्यक्तीस मारहाण

**हिंगणघाट**-क्षुल्लक कारणावरून झालेल्या वादाचे पर्यवसान मारहाणीत झाल्याची घटना सावली (सास्ताबाद) येथे उघडकीस आली. या प्रकरणी हिंगणघाट पोलिसांनी दोन जणांविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शंकर महादेव बोरसे यांनी बांबू दिसत नसल्याबाबत बोलणे केल्याने वाद निर्माण झाला. या वादातून धनराज विठ्ठल राऊत व अल्का राऊत यांनी बोरसे यांना शिवीगाळ करत मारहाण केल्याचा आरोप आहे. गोंधळ सुरू असताना मध्यस्थी करण्यासाठी आलेल्यांनाही मारहाण करण्यात आल्याचे तक्रारीत नमूद आहे. घटनेनंतर जखमींनी हिंगणघाट पोलिस ठाण्यात तक्रार दिली. त्यावरून दोन्ही आरोपींविरुद्ध संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिस पुढील तपास करीत आहेत.

### दुचाकीच्या धडकेत महिला जखमी

**हिंगणघाट** - बसस्थानकासमोरील मार्गावर भरधाव दुचाकीच्या धडकेत एक महिला जखमी झाली. अपघातानंतर दुचाकीस्वार घटनास्थळावरून पसार झाल्याने पोलिसांनी अज्ञात चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.पोलिसांच्या माहितीनुसार, प्रियंका बहादे (३८) या सातेफळ येथे जाण्यासाठी ऑटोरिक्षा पकडण्याच्या उद्देशाने पायी जात होत्या. त्याचवेळी वेगाने आलेल्या दुचाकीने त्यांना जोरदार धडक दिली. धडकेमुळे त्या रस्त्यावर पडून जखमी झाल्या. परिसरातील नागरिकांनी त्यांना मदत केली; मात्र गर्दीचा फायदा घेत दुचाकीस्वार तेथून निघून गेला. जखमी महिलेच्या तक्रारीवरून हिंगणघाट पोलिसांनी अज्ञात दुचाकी चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला असून सीसीटीव्हीच्या आधारे त्याचा शोध सुरू आहे.

### उधार साहित्य नाकारल्याचा राग; दुकान जाळण्याचा प्रयत्न

**वर्धा**-उधारीवर बांधकाम साहित्य देण्यास नकार दिल्याच्या कारणावरून विक्रेत्याला धमकावत दुकान पेटविण्याचा प्रयत्न झाल्याची धक्कादायक घटना तळेगाव (श्या.पंत) परिसरात घडली. या प्रकरणी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.रामधरा येथील मुश्ताक खाँ अजिम खाँ पठाण यांचे बिल्डिंग साहित्याचे दुकान आहे. त्यांच्या मुलाकडे काही ग्राहकांनी साहित्याची मागणी केली. त्यापैकी काही रक्कम देऊन उर्वरित पैसे उधारीवर ठेवण्याची मागणी करण्यात आली. मात्र उधारी नाकारताच आरोपींनी शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिली. त्यानंतर दुकानाला आग लावण्याचाही प्रयत्न केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. तळेगाव पोलिसांनी तक्रारीवरून गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे.

### उपचार सुरू असताना व्यक्तीचा मृत्यू

**वर्धा**-गंभीर आजारामुळे रुग्णालयात उपचार घेत असलेल्या व्यक्तीचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. या घटनेची सेलू पोलिसांनी आकस्मिक मृत्यू म्हणून नोंद घेतली आहे.घोराड (ता. सेलू) येथील आशिष खुशाल माहुरे (४२) यांना प्रकृती बिघडल्याने सेवाग्राम येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. डॉक्टरांकडून उपचार सुरू असतानाच त्यांची प्राणज्योत मालवली. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी रुग्णालयात जाऊन आवश्यक पंचनामा व नोंदी पूर्ण केल्या. मृत्यूचे नेमके कारण वैद्यकीय अहवालानंतर स्पष्ट होणार असून पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद करून पुढील प्रक्रिया सुरू केली आहे.

### नदीपात्रात युवकाचा मृतदेह आढळला

**वर्धा**-कौंडण्यपूर शिवारातील नदीपात्रात एका युवकाचा मृतदेह आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली. या घटनेची नोंद आर्वी पोलिसांनी केली असून तपास सुरू आहे.विशाल गजानन हरणे (२५,रा. अहिरवाडा) हा कामानिमित्त बाहेर जात असल्याचे सांगून घरातून निघाला होता. त्यानंतर तो परत न आल्याने कुटुंबीयांनी शोध घेत पोलिसांत हरवल्याची तक्रार दिली होती. शोधमोहीम सुरू असतानाच त्याचा मृतदेह नदीपात्रात आढळून आला. पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी पाठविला आहे. मृत्यूचे नेमके कारण अहवालानंतर स्पष्ट होणार असून पुढील तपास सुरू आहे.

# पक्षी अभ्यासकाचा अनोखा विक्रम; सलग १००० दिवस पक्षीनिरीक्षण

## १४ राज्ये, ८४ जिल्ह्यांत पक्षीनिरीक्षण; ईबर्डवर सातत्याने शास्त्रीय नोंदी

**वर्धा/ जनमाध्यम**

पक्षीनिरीक्षण हा केवळ छंद नसून निसर्गसंवर्धनाची अखंड साधना असल्याचे आपल्या कार्यातून सिद्ध करणारे वर्धा जिल्ह्यातील पक्षी अभ्यासक व वन्यजीव छायाचित्रकार राहुल वकारे यांनी सलग १००० दिवस अखंडित पक्षीनिरीक्षणाचा उल्लेखनीय विक्रम नोंदविला आहे. ३१ ऑक्टोबर २०२३ रोजी सुरू केलेल्या या उपक्रमाने २६ जुलै २०२६ रोजी १००० दिवसांचा टप्पा पूर्ण केला. या कामगिरीमुळे ते वर्धा जिल्ह्यात सलग १००० दिवस अखंडित पक्षीनिरीक्षण करणारे पहिले पक्षी अभ्यासक ठरले आहेत.

या कालावधीत त्यांनी केलेल्या प्रत्येक पक्षीनिरीक्षणाची शास्त्रीय नोंद जागतिक स्तरावरील 'ईबर्ड' (eBird) संकेतस्थळावर नियमितपणे केली. त्यांच्या नोंदींमुळे पक्ष्यांचे वितरण, स्थलांतर, अधिवास आणि जैवविविधतेसंबंधीची महत्त्वपूर्ण माहिती जागतिक संशोधनासाठी उपलब्ध होत आहे.

राहुल वकारे यांनी या हजार दिवसांच्या प्रवासात महाराष्ट्रासह कर्नाटक, मध्य प्रदेश, तेलंगणा, छत्तीसगड, ओडिशा, उत्तर प्रदेश, गुजरात,पंजाब, गोवा, हरियाणा, झारखंड, राजस्थान, आंध्र प्रदेश या १४ राज्यांसह दिल्ली या केंद्रशासित प्रदेशातील एकूण ८४ जिल्ह्यांत पक्षीनिरीक्षण केले.



त्यांनी महाराष्ट्र पक्षीमित्र संमेलन, जागतिक बिग डे,ऑक्टोबर बिग डे, जागतिक बैकयार्ड पक्षी गणना, ईबर्ड मासिक व वार्षिक आव्हाने,महाराष्ट्र शासनाचा पक्षी सप्ताह, विविध पक्षी शर्यती, आशियाई जलपक्षी गणना, बोर व्याघ्र प्रकल्पाचा निसर्गानुभव उपक्रम तसेच हिंगणघाट परिसरातील सारस पक्ष्यांच्या घरट्यांच्या गणनेत सक्रिय सहभाग घेतला.

याशिवाय बोर, पेंच, ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प, तेलंगणातील इटूरनागारम वन्यजीव अभयारण्य, छत्तीसगडमधील बारनवापारा अभयारण्य तसेच ओडिशातील सिमिलीपाल व्याघ्र प्रकल्प येथे त्यांनी पक्षीनिरीक्षण व पक्षीगणनेत सहभाग नोंदविला.

या प्रवासात त्यांनी ४५ नवीन 'ईबर्ड लाइफर' पक्षीप्रजातींची नोंद केली. तसेच वर्धा जिल्ह्यात प्रथमच टिकेलचा पर्णवटवट्या (Tickell's Leaf WaRler) आणि तपकिरी खाटिक (Brown Shrike) या पक्ष्यांच्या छायाचित्रीत नोंदी करून जिल्ह्याच्या पक्षीवैविध्याच्या दस्तऐवजीकरणात मोलाची भर घातली. हजार दिवसांचा टप्पा गाठल्यानंतरही राहुल वकारे यांचा पक्षीनिरीक्षणाचा प्रवास सुरूच राहणार असून, दररोज निरीक्षण करून ईबर्डवर नोंदी अद्ययावत ठेवण्याचा त्यांचा संकल्प कायम आहे. सलग तीन वर्षे अखंडित पक्षीनिरीक्षण पूर्ण करणे आणि २००० दिवसांचा नवा विक्रम प्रस्थापित करणे हे त्यांचे पुढील लक्ष्य आहे.

निसर्ग, पक्षीसंवर्धन आणि जैवविविधतेप्रती असलेली त्यांची सातत्यपूर्ण निष्ठा, अभ्यासपूर्ण दृष्टी आणि चिकाटी यामुळे हा विक्रम केवळ वैयक्तिक यश न राहता वर्धा जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब ठरली आहे. त्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीचे विविध स्तरांतून कौतुक होत असून, पक्षीनिरीक्षण क्षेत्रातील नव्या पिढीसाठी त्यांचा प्रवास प्रेरणादायी ठरत आहे.

## क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या विचारांचा वारसा जपण्याचा निर्धार



**आष्टी (शहीद)/जनमाध्यम**

आष्टी तालुक्यातील लहान आर्वी ग्रामपंचायतीत स्वातंत्र्यसैनिक व क्रांतिकारक क्रांतीसिंह नाना पाटील यांची जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच सुनिल साबळे होते. व्यासपीठावर ग्रामपंचायत सदस्या ज्योती गायकी, रेश्मा माथने तसेच ग्रामपंचायत अधिकारी अनुराधा धारपुरे उपस्थित होत्या. यावेळी सरपंच सुनिल साबळे यांनी क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या स्वातंत्र्यलढ्यातील योगदानाचा गौरव करत त्यांच्या विचारांचा आणि कार्याचा आदर्श समाजाने कायम जपला पाहिजे, असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाला आशा स्वयंसेविका आशा डेहनकर, सहाय्यक शिक्षक सुहास माणकर, अंगणवाडी सेविका शोभा निमकर्डे, मोनाली गायकी, महसूल सेवक राजकुमार सायरे, ग्रामपंचायत कर्मचारी किशोर खंडारे, पंकज राऊत, संगणक परिचालक मनोहर खानजोडे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मृदा आरोग्य पत्रिकांद्वारे शेतकऱ्यांना वैज्ञानिक शेतीचे मार्गदर्शन

**आंजी/जनमाध्यम**

बजाज कृषी महाविद्यालय, पिपरी (वर्धा) यांच्या ग्रामीण जागरूकता व कार्यानुभव (RAWE) कार्यक्रमांतर्गत कामठी परिसरातील शेतकऱ्यांना मृदा आरोग्य पत्रिकांचे वितरण करण्यात आले. कृषीकन्यांनी माती परीक्षणाचे महत्त्व, संतुलित खत व्यवस्थापन, सेंद्रिय शेती आणि शाश्वत कृषी पद्धतींबाबत मार्गदर्शन केले.

निवडक शेतांमधील मातीचे नमुने संकलित करून महाविद्यालयाच्या प्रयोगशाळेत डॉ. एम. के. घोडे यांच्या मार्गदर्शनाखाली तपासणी करण्यात आली.



तपासणीनंतर शेतकऱ्यांना विनामूल्य मृदा आरोग्य पत्रिका देत पीकनिहाय खतांच्या योग्य मात्रांची माहिती देण्यात आली. या उपक्रमामुळे खतांचा संतुलित वापर, उत्पादनवाढ आणि जमिनीची सुपीकता टिकविण्यास मदत होणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला. उपक्रमात ईशा कत्रोजवार, समृद्धी दोनाडकर, आयुषी बांते, वनश्री बोरकर, डॉली धोटे व कांचन दोनोडे या कृषीकन्यांनी सक्रिय सहभाग नोंदविला.

## रेल्वेतून पडल्याने प्रवाशाचा मृत्यू

**वर्धा**-भूगाव रेल्वे स्थानक परिसरात रेल्वेतून पडल्याने एका प्रवाशाचा मृत्यू झाल्याची घटना घडली. या प्रकरणी अल्लीपूर पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे.मृताची ओळख प्रदीप प्रभू तिडके (५२, रा. जांब, ता. पातुर, जि. अकोला) अशी झाली आहे. प्राथमिक माहितीनुसार, प्रवासादरम्यान तोल गेल्याने ते रेल्वेतून खाली पडले असावेत, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. घटनेची माहिती मिळताच रेल्वे प्रशासन व पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी पाठविण्यात आला असून नेमक्या कारणांचा तपास सुरू आहे.

## १२९ ग्रॅम गांजासह आरोपी जेरबंद

**वर्धा**-उपविभागीय पोलिस अधिकारी कार्यालयाच्या विशेष पथकाने कारवाई करत १२९ ग्रॅम गांजा जप्त केला. या कारवाईत एका संशयिताला ताब्यात घेण्यात आले असून दोन जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलिसांनी आदिवासी कॉलनी परिसरात संशयित मंगेश उर्फ जॉन शंकर कोकाटे याची झडती घेतली. झडतीदरम्यान त्याच्याकडून १२९ ग्रॅम गांजा आढळून आला. यासोबतच मोबाईलसह एकूण १२ हजार ५८० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी अमली पदार्थ प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंदविण्यात आला असून गांजाचा पुरवठा कुठून झाला याचा तपास पोलिसांकडून सुरू आहे.

## गांजा सेवन करणाऱ्यांवर कारवाई

**पुलगाव**-जिल्ह्यात अमली पदार्थविरोधी मोहिमेला वेग देत विविध पोलिस ठाण्यांच्या पथकांनी गांजा सेवन करणाऱ्यांविरुद्ध विशेष कारवाई केली. या मोहिमेत अनेकांना ताब्यात घेऊन त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात आले. पुलगाव शहरातील विविध भागांत साहिल सुरेश हिवसे, मानव रविंद्र रंगारी, शेख इरफान शेख मोहम्मद आणि नर्मेषकांत श्रीकांत पाटील हे गांजा सेवन करताना आढळले. हिंगणघाट येथे राजू गुणवंत दुरगुडे, ऋक्षभ पुरुषोत्तम मडावी व जय अजय वाघ यांच्याविरुद्धही कारवाई करण्यात आली. तसेच रामनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीत सक्षम नितीन नांदुरकर



हा गांजा सेवन करताना आढळल्याने त्याच्यावरही गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी अमली पदार्थांविरोधातील कारवाई पुढेही सुरू राहणार असल्याचे स्पष्ट केले आहे.

## ८ ऑगस्टला हिंगणघाटात 'सहकार संवाद'चे आयोजन

**हिंगणघाट/जनमाध्यम**

सहकार क्षेत्रातील संस्था, पदाधिकारी व कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करण्याच्या उद्देशाने सहकार भारती, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था कार्यालय आणि अभिनव महिला बचत गट यांच्या संयुक्त विद्यमाने 'सहकार संवाद' कार्यक्रमाचे आयोजन शनिवार, ८ ऑगस्ट रोजी नंदोरी रोडवरील स्व. डॉ. रामदासजी आंबटकर योग भवन येथे करण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. नयना तुळसकर राहणार आहेत. प्रमुख अतिथी म्हणून हिंगणघाट कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती ॲड. सुधीरबाबू कोठारी, जिल्हा उपनिबंधक गौतम वालदे, सहायक निबंधक स्वप्नील पुराम आणि सहकार भारतीचे नागपूर विभाग प्रमुख संजय रोकडे उपस्थित राहणार आहेत. महाराष्ट्र प्रदेश सहकार भारतीचे महामंत्री विवेक जुगाडे व विभागीय सहनिबंधक (लेखापरीक्षण) सदानंद वुईके हे प्रमुख मार्गदर्शन करणार आहेत.

जिल्ह्यातील नागरी सहकारी पतसंस्था,बँकांचे संचालक,पदाधिकारी व कर्मचारी यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन सहकार भारतीचे जिल्हाध्यक्ष प्रभाकर कोळसे,संघटन प्रमुख मनोज पाचखेडे, महामंत्री श्यामकुमार खत्री व अन्य पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

## कर्जमाफीची पहिली यादी जाहीर; बँकेत शेतकऱ्यांची झुंबड

### साहूर परिसरातील ४५३ शेतकरी पहिल्या टप्प्यात पात्र

**साहूर/जनमाध्यम**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजनेअंतर्गत साहूर व परिसरातील ४५३ शेतकऱ्यांची पहिली यादी जाहीर होताच बँक ऑफ इंडिया शाखेत शेतकऱ्यांनी मोठी गर्दी केली. यादीत आपले नाव आहे की नाही, याची खात्री करण्यासाठी दिवसभर शेतकऱ्यांची लगबग सुरू होती.

बँक ऑफ इंडिया, साहूर शाखेअंतर्गत २०१९ ते २०२५ या कालावधीत २,४१९ शेतकऱ्यांना पीककर्ज वाटप



करण्यात आले असून त्यापैकी १,८०० शेतकरी कर्जमाफीसाठी पात्र ठरले आहेत. पहिल्या टप्प्यात ४५३ शेतकऱ्यांचा समावेश करण्यात आला असून उर्वरित याद्या टप्प्याटप्प्याने प्रसिद्ध केल्या जाणार आहेत. शासनाच्या धोरणानुसार दोन लाख रुपयांपर्यंतचे पात्र कर्ज माफ करण्यात येणार असून लाभार्थ्यांना 'नो ड्यूज' प्रमाणपत्र देऊन तत्काळ नवीन पीककर्ज उपलब्ध करून देण्याचे निर्देश बँकांना देण्यात आले आहेत.

दरम्यान, ई-केवायसी करताना शेतकऱ्यांनी कर्ज खाते क्रमांक, बँक खाते आणि कर्जाची रक्कम काळजीपूर्वक पडताळूनच प्रक्रिया पूर्ण करावी, अन्यथा लाभात अडचणी निर्माण होऊ शकतात, असा इशारा बँक प्रशासनाने दिला आहे. यादीतील प्रत्येक शेतकऱ्याला युनिक आयडी देण्यात आला असून आधार प्रमाणीकरणानंतरच कर्जमाफीची प्रक्रिया अंतिम होणार आहे.

**कोर्ट विद्यमान श्री. योगेश शिंदे, तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, हिंगणघाट यांचे न्यायालय**

**नोटीस**

क्र.म.सहा./संकीर्ण-८०/कावी-२७४/२०२५/२६ दिनांक:१/०७/२०२६

प्रति, सैय्यद अलतमश अली सैय्यद मुशताक अली रा. शास्त्री वार्ड हिंगणघाट ता. हिंगणघाट जि. वर्धा. मो.नं. ७०२०००५४१२४

**विषयः-प्रकरणात आपले म्हणणे सादर करणेबाबत.**

आपणास या नोटीसीव्दारे सुचित करण्यांत येते की, अर्जदार सैय्यद अलतमश अली सैय्यद मुशताक अली रा.शास्त्री वार्ड हिंगणघाट ता. हिंगणघाट जि. वर्धा. यांनी कलम १३ (३) अन्वये जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ अंतर्गत अर्जदार यांचा जन्म जगन्नाथ वार्ड हिंगणघाट येथील असून नामे सैय्यद अलतमश अली सैय्यद मुशताक अली यांची जन्म तारीख दि. १६/०७/१९७६ ची नोंद नगर परिषद हिंगणघाट यांचे कार्यालयातील अधिकृत नोंदणी पुस्तीकेमध्ये घेण्याचा आदेश होण्याबाबत अर्ज / प्रकरण सादर केलेला आहे.

सदर प्रकरणात आपले लेखी म्हणणे सादर करण्याकरीता दि. २०/०८/२०२६ ला सकाळी ११.०० वाजता या कार्यालयात उपस्थित रहावे. आपण सदर तारखेला गैरहजर राहील्यास आपणास काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहीत धरुन एकतर्फी कार्यवाही करण्यांत येईल याची नोंद घ्यावी.

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, हिंगणघाट**

## कीर्तनाच्या सेवेला मिळाला मानाचा मुकुट

# सातपुते महाराजांची जिल्हाध्यक्षपदी निवड

**विरुळ (आ)/जनमाध्यम**



अध्यात्म, समाजप्रबोधन आणि शिक्षणाची सांगड घालत गेली दोन दशके समाजसेवेचा अखंड वसा जपणारे आर्वी तालुक्यातील विरुळ (आकाजी) येथील ह.भ.प. सातपुते महाराज यांची निरपेक्ष राज्य कीर्तनकार संघाच्या वर्धा जिल्हाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीमुळे विरुळसह संपूर्ण जिल्ह्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून भाविक, शिष्यपरिवार तसेच सामाजिक, शैक्षणिक व धार्मिक क्षेत्रातून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. पदव्युत्तर शिक्षण घेतलेले ह.भ.प. सातपुते महाराज अध्यात्माबरोबरच शिक्षक म्हणूनही कार्यरत आहेत. ग्रामीण भागातील दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांना ते निःशुल्क शैक्षणिक मार्गदर्शन करून अनेक विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वाटचालीला दिशा देत आहेत. मूळचे विरुळ (आकाजी) येथील असलेल्या सातपुते महाराजांचा नागपूर,चंद्रपूरसह संपूर्ण विदर्भात मोठा शिष्यपरिवार आहे. ते गुरुदेव सेवक असून राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या ग्रामगीतेच्या विचारांचा प्रसार करण्यासाठी सातत्याने कार्यरत आहेत.सुमारे वीस वर्षांपूर्वी त्यांनी आपल्या गावात सामुदायिक प्रार्थना आणि ध्यान उपक्रमाची सुरुवात केली. या माध्यमातून अनेक युवकांना व्यसनमुक्त, सुसंस्कृत आणि समाजाभिमुख जीवनाची प्रेरणा मिळाली. त्यांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आध्यात्मिक योगदानाची दखल घेत निरपेक्ष राज्य कीर्तनकार संघाने त्यांच्यावर वर्धा जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी सोपविली आहे. सातपुते महाराज यांच्या या निवडीमुळे विरुळ (आकाजी) गावाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून त्यांच्या पुढील कार्यासाठी सर्व स्तरांतून शुभेच्छा व्यक्त होत आहेत.

## सच मॉड्युलर किचन'ला'विदर्भ रत्न २०२६' पुरस्काराचा मान

### सिनेअभिनेत्री वर्षा उसगांवकर यांच्या हस्ते सचिन धांदे यांचा गौरव

**वर्धा/जनमाध्यम**

विदर्भातील इंटेरियर व मॉड्युलर किचन क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या वर्ध्यातील 'सच मॉड्युलर किचन' या संस्थेला 'विदर्भ रत्न २०२६' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. नागपूर येथे झालेल्या पुरस्कार सोहळ्यात सुप्रसिद्ध सिनेअभिनेत्री वर्षा उसगांवकर यांच्या हस्ते संस्थेचे संचालक सचिन धांदे यांनी हा प्रतिष्ठेचा पुरस्कार स्वीकारला.

'रिसील' संस्थेतर्फे विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्थांचा गौरव करण्यासाठी नागपूर येथील सॉलीटेअर हॉटेलमध्ये रविवारी पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात रिसील संस्थेचे अध्यक्ष



सुधीर पठाडे यांच्या उपस्थितीत मानपत्र व गौरवचिन्ह देऊन सचिन धांदे यांचा सन्मान करण्यात आला. गेल्या १६ वर्षांपासून इंटेरियर व मॉड्युलर किचन क्षेत्रात सातत्याने दर्जेदार सेवा देणाऱ्या 'सच मॉड्युलर किचन'ने विदर्भात आपला वेगळा ठसा उमटविला आहे. उत्कृष्ट कामाची गुणवत्ता, नाविन्यपूर्ण संकल्पना आणि ग्राहकाभिमुख सेवेमुळे संस्थेला हा मानाचा पुरस्कार प्राप्त झाला. पुरस्कार स्वीकारल्यानंतर सचिन धांदे यांनी हा सन्मान आपल्या सर्व ग्राहक,हितचिंतक आणि सहकाऱ्यांना समर्पित असल्याचे सांगितले. या पुरस्कारामुळे अधिक जबाबदारी वाढली असून भविष्यातही दर्जेदार सेवा देत विदर्भातील अधिकाधिक ग्राहकांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी आम्ही कटिबद्ध राहू, असे त्यांनी सांगितले. या पुरस्कार सोहळ्यास विदर्भातील नामवंत उद्योजक, बिल्डर्स तसेच सामाजिक, सांस्कृतिक व विविध क्षेत्रांतील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

वर्धा आवृत्ती वर्ष- १४ अंक २४८
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३

**मुख्य कार्यालय**– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# वैभव अभ्यंकर यांनी दिल्ली विद्यापीठातून एलएलबी पदवी केली संपादन

**अमरावती/प्रतिनिधीः-** राहुल नगर, अमरावती येथील रहिवासी वैभव अभ्यंकर यांनी भारतातील नामांकित दिल्ली विश्वविद्यालय येथून सन २०२३ ते २०२६ या कालावधीत एलएलबीचा अभ्यासक्रम यशस्वीरित्या पूर्ण करून पदवी संपादन केली आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल सर्व स्तरांतून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

अत्यंत प्रतिकूल परिस्थिती, मर्यादित संसाधने आणि अनेक आव्हानांचा सामना करत वैभव अभ्यंकर यांनी जिद्द, चिकाटी आणि आत्मविश्वासाच्या बळावर हे यश मिळवले आहे. 'गल्ली ते दिल्ली' असा त्यांचा प्रेरणादायी प्रवास अनेक तरुणांसाठी आदर्श ठरत आहे.

दिल्लीमध्ये शिक्षण घेत असताना त्यांनी केवळ अभ्यासातच उत्कृष्ट कामगिरी केली नाही, तर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अपेक्षित असलेल्या जागरूक, अभ्यासू आणि समाजाभिमुख विद्यार्थ्याची भूमिका निभावत विद्यार्थ्यांच्या विविध प्रश्नांवरील आंदोलनांमध्ये तसेच सामाजिक व शैक्षणिक चळवळींमध्ये सक्रिय सहभाग नोंदविला.



या यशाबद्दल त्यांचे आजी गोकर्णबाई अभ्यंकर, जिजा वसंतराव तसरे, वडील दादा अभ्यंकर, बाबाराव अभ्यंकर, आई वंदना अभ्यंकर, वीणा अभ्यंकर यांनी त्यांचे विशेष कौतुक केले असून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत. तसेच परिसरातील गजानन पवार, इंजि. सुशील गुडदे, इंजि. संजय ढवळे, नितीन आठवाले (फार्मासिस्ट), सतीश गवई, कलेश कांबळे, राजेंद्र गवई, सिद्धार्थ गुडदे, विजय वानखडे, मोहन इंगळे, प्रा.अरुणा तसरे (राऊत), रुपेश सरदार, देवेन ढोके, विजय दांडगे सर, इंड राहुल तसरे, इंड अतुल इंगोले, इंजि. अनिल बागडे, अमोल अडेकार, विजय लव्हाळे, सचिन बनसोड, सागर वानखडे, चेतन अभ्यंकर तसेच मानवता बुद्ध विहार व परिसरातील नागरिकांनी वैभव अभ्यंकर यांचे मनःपूर्वक अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# कर्जमुक्तीच्या लाभासाठी शेतकऱ्यांनी संभ्रम न ठेवता आधार प्रमाणीकरण करावे

## जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांचे आवाहन

## -दोन लाख रूपयांपर्यंत कर्जमाफी होणारच

**अमरावती/प्रतिनिधीः-** राज्य शासनाने जाहीर केलेल्या 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना, २०२६' ची अंमलबजावणी जिल्ह्यात वेगाने सुरू आहे. या योजनेचा लाभ जिल्ह्यातील ७६ हजार ९७६ पात्र शेतकऱ्यांना मिळणार आहे. त्यामुळे लाभार्थ्यांनी त्वरित आधार प्रमाणीकरण पूर्ण करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी आज पत्रपरिषदेत केले. सहकार विभागामार्फत जिल्ह्यातील १ लाख २४ हजार १४२ शेतकऱ्यांची माहिती महाआयटी पोर्टलवर नोंदवण्यात आली आहे. २५ जुलै २०२६ रोजी प्रसिद्ध झालेल्या पहिल्या यादीनुसार ७६,९७६ शेतकरी या योजनेच्या लाभासाठी पात्र ठरले आहेत. यातून अद्यापपर्यंत ४६ हजार ४२१ शेतकऱ्यांनी प्रमाणीकरण केले आहे. तर ३० हजार ५५५ शेतकऱ्यांनी प्रमाणीकरण केलेले नाही.

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
**वि.श्री.आर.आर.खामतकर,५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्र.१५६२/२०२६
मैनाताई +१ - वि.- निरंक
पुढील ता.०२.०९.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार :- १. **मैनाताई माणिकराव डकरे,** वय ८४ वर्षे, व्यवसाय-निरंक
रा.बारी पुरा, जुनी वस्ती बडनेरा, ता.जि.अमरावती
२. **विनोद माणिकराव डकरे,** वय ५५ वर्षे, व्यवसाय-मजुरी
रा.बारी पुरा, जुनी वस्ती बडनेरा, ता.जि.अमरावती

-- विरुध्द --

Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत नारायण जानुजी डकरे** हया दिनांक **२५.१२.१९९०** रोजी **अमरावती** येथे मयत झाले. **अर्जदार मैनाताई माणिकराव डकरे +१** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **अर्जदार मैनाताई माणिकराव डकरे +१** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दि.०३.०८.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**विद्यमान श्री.ए.बी.कट्टे, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्र.१५४०/२०२६
**सलीम खॉं व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.११.०९.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :** १. सलीम खान सैफुल्ला खान
वय ५५ वर्षे, व्यवसाय - मजुरी
रा.अलीम नगर नं.१, अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत सैफुल्ला खान समशेर खान** यांचे दिनांक **१८.०२.२०२३** रोजी **अमरावती** येथे निधन झाले. **अर्जदार सलीम विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **अर्जदार सलीम विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**१८.०७.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का

**आदेशानुसार,**
सहायक अधीक्षक
**दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर**
**अमरावती**

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१३३३८/२०२६
**श्रीमती किर्ती अधिक एक -वि- निरंक**
पुढील ता.२०.०८.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :** 1. Kirti Subhash Kanhere, Age 51 Yrs. Occu.: Household
R/o Flat No.5, Saurabh Apartment, Ganesh Nagar, Pimple Nilakh, Pune City, Aundh camp Pune City Pune
2. Mohan Ganeshrao Sabale, Age 53 Yrs. Occu.: Labour
R/o Near Railway Station Govardhan Chal, Rukhmini Nagar, Amravati.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** NIl

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **गणेश महादेवराव साबळे** हे दिनांक **२८.०२.२०२५** रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. व मयत **सुलोचना गणेश साबळे ही** १६.०१.२०२५ रोजी अमरावती, ता.जि.अमरावती येथे मयत झाली. अर्जदार **किर्ती अधिक एक विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **किर्ती अधिक एक विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१३.०७.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.ए.बी.कट्टे, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१६१८/२०२६
**साहिल व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.२१.०९.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :** 1. Sahil Ganesh Bankar
Age 22 Yrs. Occu.: Education
R/o At Post Chikhali (Kanhoba) Tq. Ner, Dist. Yavatmal
2. Suraj Ganesh Bankar
Age 20 Yrs. Occu.: Education
R/o Ranganj Amravati, Tq. Dist. Amravati.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** NIl

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **गणेश प्रभाकर बनकर आणि ज्योती गणेश बनकर** हे अनुकमे दिनांक **१९.०१.२०१० आणि दि.०९.०७.२०१९** रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **साहिल व ईतर** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **साहिल व ईतर** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०१.०८.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

**जाहीर नोटीस**

**विद्यमान २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती**

आर.एम.जे.सी.क्र.३६४/२०२६ ने.ता.०१.०९.२०२६

**अर्जदार :** १. **सुनिता सुनिल गायकवाड,** वय ४१ वर्षे, व्यवसाय-मजुरी
२. **शुभम सुनिल गायकवाड,** वय २० वर्षे, व्यवसाय-शिक्षण
३. **अंकुश सुनिल गायकवाड,** वय १९ वर्षे, व्यवसाय-शिक्षण
सर्व रा.इंदिरा नगर, चांदूर बाजार, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** निरंक

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार वरील ठिकाणी राहतात. **मृतक सुनिल माधवराव गायकवाड** यांचा मृत्यू दिनांक **०७.०८.२०२२** रोजी रा.इंदिरा नगर, चांदूर बाजार, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झालेला आहे.

यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

अर्जदारांना मय्यताचे कायदेशिर वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्राची कार्यालयीन कामाकरीता आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.३६४/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमााण्पत्र देण्यात येईल.

आज दि.२७.०७.२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,
चांदूर बाजार

---

**मा.दिवाणी न्यायाधिश क.स्तर (CJJD) नांदगाव खंडेश्वर यांचे न्यायालयामधील**

**किरकोळ (RMJC) अर्ज क्र.१६८/२०२६** **ने.ता.०७.०९.२०२६**

**शकुंतला व ईतर -विरुध्द- निरंक**

**१. शंकुतला प्रभाकरराव वाघ,**
**२. रविंद्र प्रभाकरराव वाघ**
दोघेही रा.कोठोडा, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती
**३. विद्या गजाननराव सोनोने,**
रा. खरपी, ता.अचलपुर, जि.अमरावती

**// वि //**
**निरंक**

**ज्याअर्थी, प्रभाकर गुलाबराव वाघ यांचा मृत्यू दि.०८.०७.२०२५ रोजी कोठोडा, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती** येथे झाला असून ते तेथीलच मुळ रहिवासी होते. अर्जदार क्र.१ ही त्यांची पत्नी असुन अर्जदार क्र.२ मुलगा व अर्जदार क्र.३ ही त्यांची मुलगी आहे. अर्जदार हेच मयत यांचे कायदेशिर वारस आहेत. करिता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळणेकरिता अर्जदार यांनी विद्यमान न्यायालयामध्ये मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ०८ परि.२ अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस रोजी सकाळी **१०.३०** वाजता मा.दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर येथे न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

**आज दिनांक १८ जुन, २०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
मा. दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१४७७/२०२६
**श्रीमती ललीता अधिक तीन -वि- निरंक**
पुढील ता.०१.०९.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :** 1. Lalita Vitthal Gathe, Age 58 Yrs. Occu.: Housewife
2. Akshay Vitthal Gathe, Age 29 Yrs. Occu.: Labour
Both R/o Thakur Welding Workshop, Bharat Nagar, Wadali, Amravati.
3. Pranju Vitthalrao Gathe (Before Marriage Name)
Pranju Ram Bayaskar (After Marriage Name)
Age 35 Yrs. Occu.: Service
R/o Malipura Barsitakali, Tq.Barsitakali, Dist. Akola
4. Nitu Sachin Pise, Age 32 Yrs. Occu.: Housewife
R/oV.H.B.Colony, Malkapur, Po.Gandhinagar, Dist.Akola

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** NIl

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Vitthal Mahadeorao Gathe हे दिनांक **०२.११.२०२३** रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Lalita + 3 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Lalita + 3 वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२८.०७.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.बी.कळदाते, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.११३५/२०२६
**मंगला व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.१०.०८.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :** 1. Mangala Dilip Pawar, Age 55 Yrs. Occu.: Household
R/o Chanduri, Po.Kawatha Bahale, Tq. Dist. Amravati.
2. Shital Pritam Barge, Age 39 Yrs. Occu.: Household
R/o Rukhmini Nagar, Amravati
3. Vikas Dilip Pawar, Age 35 Yrs. Occu.: Labour
R/o Chanduri, Po.Kawatha Bahale, Tq. Dist. Amravati.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** NIl

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **दिलीप रुपरावजी पवार** हे दिनांक **२१.०८.२०२५** रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **मंगला व ईतर** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **मंगला व ईतर** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१८.०६.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती विभाग, अमरावती**

**चौकशीची जाहीर नोटीस**

फेरफार अहवाल/अर्ज क्र. **115/19/2026**
सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक **आद्यगुरु महानुभाव मठ, मु.पो.वलगांव, ता.जि.अमरावती**
बाबत अर्जदार - **श्री कृणाल वसंतराव ओकटे**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की,

सहायक धर्मादाय आयुक्त-०३ अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत.

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय, आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

**(अ) जंगम मिळकत - निरंक**
**(ब) स्थावर मिळकत (वर्णन) - निरंक**

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक २७.०७.२०२६ रोजी दिली.

शिक्का

**सही/-**
**श्रीमती डी.बी.गायकवाड**
अधीक्षक,(न्याय शाखा)
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अमरावती

---

प्रो.क्र.६९६/२०२६

**वारसाचे प्रमाणपत्राबद्दल जाहीरनामा/सायटेशन नोटीस**

**मा.विजय जी.परवरे, दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), भातकुली, जि.अमरावती यांच्या न्यायालयात**

**आर.एम.जे.सी.क्रमांक २५४/२०२६** **ने.ता.०७.०९.२०२६**

**अर्जदार :** 1. **Vitthal Shamrao Tale,** Age 60 Yrs. Occu.: Labour,
2. **Priya Dipak Mutkare**, Age 31 Yrs. Occu.: Housewife,
R/o. At post Pimplod, Tq.Daryapur, Dist. Amravati
3. **Vivek Vitthalrao Tale,** Age 27 Yrs. Occu.: Education,
Application No.1 & 3 both R/o. Umrapur, Po. Nirul Gangamai, Tq. Bhatkuli, Dist. Amravati

*विरुध्द*

**गैरअर्जदारः** Nil

ज्यापेक्षा **Ranjana Vitthalrao Tale** हे दि.०२.०९.२०२५ रोजी मयत झाले. अर्जदार **Vitthal Shamrao Tale, Age 60 yrs, Occu- Labour, R/o. Umrapur, Po. Nirul Gangamai, Tq. Bhatkuli, Dist. Amravati** व इतर यांनी **बॉम्बे रेग्युलेशन कायदा, १८२७ चे कलम २ प्रमाणे कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता** या न्यायालयामध्ये दि.**२३.०७.२०२६** रोजी अर्ज केला आहे. या अर्जाप्रमाणे वरील अर्जदार हे मयत **Ranjana Vitthalrao Tale** यांचे वारस आहेत. ते सदरहू अर्जदार फक्त मयत **Ranjana Vitthalrao Tale** यांचे वारस नाहीत असे कोणास सांगावयाचे असेल तर या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत दाखल करावी.

तसेच या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती दाखल न केल्यास सदरहु न्यायालय अर्जदारांना वारसा प्रमाणपत्र बाबत पुरावा घेऊन त्यांना सदरहू अर्जदारांना मयताचे वारस म्हणून घोषित करण्यात येईल आणि त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दिनांक २७.०७.२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले असे.

शिक्का

**आदेशान्वये,**
**सहायक अधीक्षक,**
**दिवाणी न्यायालय, (कनिष्ठ स्तर), भातकुली**
**दि.२७/०७/२०२६**

---

**अमरावती येथील ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) यांच्या न्यायालयातील**

मकामुना (जे-८४)-८-२००८-१ए००ए००-पी एफ दिवाणी अ ५३ म
बजावणीचा हुकूम का करु नये याची कारणे दाखविण्याविषयी नोटीस
**(U/O 21 Rule-22 of Civil Procedure Code)**
**Case No.: Spl.Dkst/45/2022**
ने.ता.२४.०८.२०२६
कांताबाई साबळे .... धनको/अर्जदार
--- विरुध्द ---
भास्कर बंड ....ऋणको/गैरअर्जदार

**२.** गोपाल महादेवराव अवताळे, रा.द्वारा - भास्कर गुलाबराव बंड, रा.शेंदोळा बु., ता.तिवसा, जि.अमरावती
३. शब्बीर खान रहीम खान
४. राजीक खान हबीब खान
दोन्ही ३ व ४ रा.छाया नगर, अमरावती, ता.जि.अमरावती

ज्याअर्थी धनको यांनी सन ............ च्या केस यातील हुकूमनामा आपणास लेखी हस्तांतरित करुन देण्यात आलेला आहे. या प्रतिपादनावर सदर हुकूमनाम्याच्या बजावणीसाठी न्यायालयात दरखास्त केली आहे. त्याअर्थी या लेखावरुन तुम्हास नोटीस देण्यात येत आहे की, बजावणीचा हुकूम का देऊ नये याचे कारण दाखविण्यासाठी दिनांक २४.०८.२०२६ रोजी या न्यायालयासामोर तुम्ही हजर व्हावे.

आज **दिनांक २८.०७.२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिला.

शिक्का

आदेशान्वये,
**सहायक अधीक्षक,**
दिवाणी न्यायालय (व-स्तर)
अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१४५१/२०२६
**श्री.गजानन अधिक एक -वि- निरंक**
पुढील ता.२९.०८.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :** 1. Gajanan Santoshrao Hire, Age 62 Yrs. Occu.: Farmer
R/o Behind Khandelwal Rashan Dukan, Frejarpura, Amravati.
2. Ramesh Santoshrao Hire, Age 55 Yrs. Occu.: Farmer
R/o Gut No.98/99, Plot No.D, Building Flat No.708, Kryshtal City, Moshi, Pune

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** NIl

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **संतोष शंकर हिरे** हे दिनांक **०५.०२.२००७** रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **गजानन अधिक एक विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **गजानन अधिक एक विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२७.०७.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

**तहसिलदार मोर्शी यांचे न्यायालय**

**रा.मा.क्र./१९८/एमआरसी-८१/अंबाडा/२०२५-२०२६**

**जाहीरनामा**

**या कार्यालयाचे ज्ञापनाद्वारे कळविण्यात येते की, प्रकरणात अर्जदार** शिरिन परवीन मोहम्मद हनीफ ,रा.अंबाडा, ता.मोर्शी, जि.अमरावती **यांचा स्वतः जन्म दि. ३१.०१.१९८७ रोजी अंबाडा येथे झाल्याने जन्माची नोंद ग्रामपंचायत** अंबाडा **येथे करण्याकरिता निबंधक, ग्रा.पं.अंबाडा यांना आदेश मिळण्याबाबत या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.**

**त्याअर्थी प्रकरणात ज्या कोणास आक्षेप वा हरकती घ्यावयाच्या असेल त्यांनी सदर जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून** १५ दिवसांचे आत **लेखी स्वरुपात आक्षेप वा हरकती दाखल कराव्या. दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या आक्षेपांचा वा हरकतीचा विचार करण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.**

दि.०३/०८/२०२६

शिक्का

**स्वा/-**
**तहसीलदार, मोर्शी**

---

**जाहीर नोटीस**

**विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती**

आर.एम.जे.सी.क्र.३६५/२०२६ ने.ता.२८.०८.२०२६

**अर्जदार :** १. **पुरुषोत्तमजी दुलीचंदजी राठी,** वय ६६ वर्षे, व्यवसाय-शेती
२. **नुपुर अनुराग टावरी,** वय ३४ वर्षे, व्यवसाय- घरकाम
३. **कोमल राजिव इंदानी,** वय ३२ वर्षे, व्यवसाय- घरकाम
४. **शुभम पुरुषोत्तम राठी,** वय ३० वर्षे, व्यवसाय- डॉक्टर
५. **चेतन पुरुषोत्तमजी राठी,** वय २८ वर्षे,
अर्जदार क्र.१,४ व ५ रा.चांदूर बाजार, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
अर्जदार क्र.२ रा.गुंडेरदेवी ता.गुंडेरदेही, जि.बालोद, राज्य-छतीसगढ
अर्जदार क्र.३ रा.धामणगाव रेल्वे, ता.धामणगाव रेल्वे, जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** निरंक

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात.**मृतक कल्पना पुरुषोत्तम राठी** यांचा **मृत्यू दि.०२/०७/२०१३** रोजी आयकॉन हॉस्पीटल, अकोला, ता.जि.अकोला येथे मृत्यू झालेला असून त्या कायमच्या रा.चांदूर बाजार, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथील रहिवासी होत्या.

त्यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

अर्जदार मयतांचे कायदेशिर वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्राची कार्यालयीन कामाकरिता आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.३६५/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमााण्पत्र देण्यात येईल.

आज दि.२८.०७.२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,चांदूर बाजार

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**विद्यमान श्री.ए.बी.कट्टे, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्र.१५३४/२०२६
**अब्दुल व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.११.०९.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :** १. अब्दुल सत्तार शेख मुसा, वय ७४ वर्षे, व्यवसाय - मजुरी
रा.खारतळेगांव, ता.भातकुली, जि.अमरावती
२. मोहम्मद अफसर शेख निजाम, वय ६८ वर्षे, व्यवसाय - मजुरी
रा.अलमास नगर, बडनेरा, ता.जि.अमरावती
३. अब्दुल खलील अब्दुल सलाम, वय ५३ वर्षे, व्यवसाय - मजुरी
रा.यास्मिन नगर, अमरावती
४. अब्दुल फारुक अब्दुल शहीद, वय ४९ वर्षे, व्यवसाय -मजुरी
रा.खारतळेगांव, ता.भातकुली, जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत अलमोबी गुलाम मोहम्मद** यांचे दिनांक **१०.०७.१९७२** रोजी **अमरावती** येथे निधन झाले. **अर्जदार अब्दुल व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **अर्जदार अब्दुल व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**२३.०७.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.आर.आर.खामतकर,४थे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१४६४/२०२६
**प्रमोदिनी अधिक चार -वि- निरंक**
पुढील ता.२५.०८.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :** 1. Smt.Pramodini Prabhakar Labdi, Age about 90 Yrs. Occu.: Household
R/o Akoli Road, Near Telecom Colony, Amba Colony, Amravati.
2. Sau.Madhuri Sudhakar Joshi, Age about 62 Yrs. Occu.: Household
R/o **Mauli** Plot No.9, Near Sai Coaching Classes, Ganesh Colony,Amravati
3. Prashant Prabhakar Labdi, Age about 58 Yrs. Occu.: Service
R/o Akoli Road, Near Telecom Colony, Amba Colony, Amravati.
4. Sau.Varsha Mohan Kurhekar, Age about 56 Yrs. Occu.: Household
R/o Rashtrabhasha Road, Ganesh Mandir, Hindanagar, Wardha.
5. Nitin Prabhakar Labdi, Age about 54 Yrs. Occu.: Service
R/o Plot No.81-84, Flat No.C-208, Siddvinayak Apartment, P.M.G.Layout Narendra Nagar, Nagpur. Tq. Dist. Nagpur.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** NIl

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Prabhakar Laxmanrao Labdi हे दिनांक **०९.१२.२०१३** रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Smt.Pramodini Prabhakar Labdi+4 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Smt.Pramodini Prabhakar Labdi+4 वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२८.०७.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

संपादक- प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)
अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक ३२७
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025
मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६९
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त



### अधिधम्म व त्रिपीटक ग्रंथाचे धम्मदेशना

**अमरावती-** गुरुकृपा कॉलनी अमरावती येथे अधिधम्म व त्रिपीटका या पवित्र ग्रंथा विषयी धम्मदेशना चा कार्यक्रम नुकताच झाला. गुरुकृपा कॉलनी अमरावती येथे प्रबुद्ध संकृती उपासक उपासिका यांच्या वतीने थायलंड येथील आदरनिय भुकुनी अय्या गंभीरा व त्यांचा पुर्ण भिकुनी संघ यांनी अधिधम्म व त्रिपीटका या पवित्र ग्रंथा विषयी धम्मदेशना देण्यात आली.प्रबुद्ध संकृती बुद्ध विहार गुरुकृपा कॉलनी अमरावती येथे उपासिका यांनी भिक्खुनी संघास भोजनदान दिले. सदर कार्यक्रमाचे संचालन रावसाहेब गवई यांनी केले तर आभार सुभाष वानखडे यांनी मानले. कार्यक्रमाचे आयोजन लता खेडकर,कोकीळा वानखडे,वनमाला सांभारे,साधना कांबळे, किरण प्रधान, इंदुमती खडसे, अर्चना गुलदेकर, किरण मेश्राम, प्रभा मनोहर,रजनी ढोके,अनिता वाघमारे,तर उपासक नागसेन वरघट,गौतम कांबळे,रविंद्र वानखडे,गजानन आठवले, टेंभुर्णेसर, दिनेश अनभोरे, रघुनाथराव माहुरे आदी उपस्थित होते.



### रस्ता रुंदीकरणाबाबत व्यापाऱ्यांची बैठक

**अचलपूर-** शहरातील देवडी व्यापारी परिसरात रस्ता रुंदीकरणाचा प्रस्ताव अचलपूर नगर परिषदेने ठेवला आहे. त्यासंदर्भात सर्व व्यापाऱ्यांचे मत ऐकून घेण्यासाठी आणि त्यांना शासकीय कार्याची माहिती देण्यासाठी अचलपूर नगर परिषद नगरसेवक अभय माथने यांच्या प्रमुख उपस्थितीत देवडी, हिरापुरा गेट, सराफा लाईन या परिसरातील व्यापाऱ्यांची एक बैठक आयोजित करण्यात आली.रस्त्याची मोजणी करण्यासाठी नगरपरिषद प्रशासनाने भूमी अभिलेख कार्यालयात निधीसुद्धा भरला आहे. लवकरच रस्त्याची मोजणी करून व्यापाऱ्यांना नोटीस व तोडलेल्या बांधकामाचा मोबदलाही शासकीय नियमानुसार देण्यात येईल, असे नगरसेवक अभय माथने यांनी बैठकीत स्पष्ट केले. यावेळी स्वीकृत नगरसेवक राजू उर्फ नील महेश्वरी, दीपक तांबी, रमण तांबी, रोशन सीरोया, श्रीकांत रावत, शंकर वानखडे, गजू लखपती, चेतन गुजराती, बंडू म्हाला, गोविंद खंडेलवाल, दिलीप सिंगर, प्रज्वल पिहुलकर, मंगेश प्रांजळे, पंकज गुप्ता, सुभाष डागा, धीरज रावत, प्रफुल्ल विखार, दिलीप राऊत, जयेश काशीकर, योगेश उघडे, प्रदीप वरेकर, विजू चरपटे, गजू दीक्षित, सुशांत चेडे, प्रवीण घाटे, शेख राजिक आदी उपस्थित होते.



### प्राथमिक कन्या शाळाते व्यवस्थापन समितीची स्थापना

**अंजनगाव बारी-** जिल्हा परिषद प्राथमिक कन्या शाळा, अंजनगाव बारी येथे शाळेच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्यासाठी व पालकांचा शैक्षणिक प्रक्रियेत सक्रिय सहभाग वाढविण्याच्या उद्देशाने शाळा व्यवस्थापन समितीची स्थापना करण्यात आली. समितीच्या अध्यक्षपदी स्नेहा सुनील पोकळे यांची, तर उपाध्यक्षपदी गोपाल आनंदराव हटवार यांची निवड करण्यात आली. तसेच सदस्य म्हणून कैलास प्रकाश मसराम, प्रियंका निलेश दुधे, सुमय्या परवीन अब्दुल साजिद, दिनेश नेवारे, शारदा शंकर इंदोरे, कांचन गविराज भगत, सीमा जितेंद्र खानापुरे, रूपाली जितेंद्र शेवतकर व ज्योत्स्ना दशरथ लोखंडे यांचा समावेश करण्यात आला आहे. समितीमध्ये पूजा हेमंत भस्मे यांची शिक्षणतज्ज्ञ म्हणून, संगीता सुरज मंडे यांची शिक्षक प्रतिनिधी म्हणून, तर शाळेच्या मुख्याध्यापिका विजया शंकरराव झाडे या सचिव म्हणून कार्यभार सांभाळणार आहेत. याशिवाय धनश्री माहेकर व मेघा अंबाडकर या विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून समितीत सहभागी आहेत. नवनियुक्त अध्यक्ष, उपाध्यक्ष व सर्व सदस्यांचे परिसरातून अभिनंदन होत असून, त्यांच्या कार्यकाळात शाळेच्या विकासाला नवी दिशा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

# रास्त भाव दुकानांतून तीन महिन्यांचे रेशन व धान्यासह मोफत साड्या

**अमरावती/का.प्र.**

वस्त्रोद्योग महामंडळाद्वारे जिल्ह्यातील सर्व गोदामांमध्ये साड्यांचा पुरवठा झालेला आहे. त्यामुळे आता ऑगस्टपासून एकाच वेळेत तीन महिन्यांचे रेशन धान्यासह मोफतच्या साड्या रेशन दुकानातून वितरित होतील. फक्त १,२९,४६६ अंत्योदय रेशन कार्डधारकांना या साड्यांचा लाभ मिळेल.

राज्य शासनाने मार्च महिन्यात श्रीरामनवमीपासून अंत्योदय कुटुंबांना दरवर्षी एक मोफत साडी देण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळाकडून जिल्ह्यात वेळेत साड्यांचा पुरवठा होऊ शकला नाही. परिणामी, ही वितरण प्रक्रिया रखडली होती. आता जिल्ह्यातील गोदामांमध्ये साड्यांचा मेळघाटात होणार सर्वाधिक साड्या वाटप पुरवठा विभागाच्या माहितीनुसार,



नियतन होते. यामध्ये प्रामुख्याने मेळघाटातील आदिवासीबहुल धारणी तालुक्याला सर्वाधिक ३३,६७२ आणि चिखलदरात १२,९६४ साड्यांचे वाटप केले होईल. पुरवठा करण्यात आलेला आहे. त्यामुळे सर्व रास्त भाव दुकानांतून मिळणाऱ्या या साड्यांचे वाटप बायोमेट्रिक पद्धतीने म्हणजेच 'ई-पॉस' मशीनद्वारे अंगठा लावूनच केले जाईल.

यासाठी पोर्टलवर ऑनलाइन पद्धतीने सर्व नोंदी ठेवण्याच्या सूचना जिल्हा पुरवठा अधिकारी दिल्या आहेत.

**तलुकानिहाय लाभार्थी**

अचलपूर तालुक्यात ६,७२३, अमरावती (ग्रा.) ६,०७१, मोर्शी ८,०६७, अंजनगाव सुर्जी ६,२११, भातकुली ४,६४९, अमरावती शहर ८,३७३, चांदूर रेल्वे ४,३४०, चांदूर बाजार ८,५३३, दर्यापूर ६,३८१, धामणगाव रेल्वे ५,४८६, नांदगाव खंडेश्वर ५,२७५, तिवसा ४,३९८ व वरूड तालुक्यात ८,३२३ लाभार्थी पात्र आहेत.

# दुसऱ्या गणवेशाचा निधी अद्याप नाही, शाळांचा कारभार शिक्षकांच्या खिशातून

**अमरावती/वार्ताहर**

नवीन शैक्षणिक सत्र सुरू होऊन एक महिना उलटला असतानाही अमरावती जिल्ह्यातील पहिली ते आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी देण्यात येणाऱ्या दुसऱ्या गणवेशाचा निधी अद्याप प्राप्त झालेला नाही. त्यामुळे स्वातंत्र्य दिन जवळ आला असतानाही अनेक विद्यार्थ्यांना दुसरा गणवेश मिळालेला नसल्याने पालक, मुख्याध्यापक आणि शिक्षकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.



अमरावती जिल्ह्यातील १४ पंचायत समित्यांमधील विद्यार्थ्यांच्या दुसऱ्या गणवेशासाठी जिल्हा परिषद शिक्षण विभागाला ३ कोटी ३९ लाख ९ हजार ३०० रुपयांच्या निधीची प्रतीक्षा आहे. शिक्षण विभागाने नवीन ऑनलाइन प्रणालीद्वारे वरिष्ठ स्तरावर निधीची मागणी पाठविली असून निधी लवकरात लवकर उपलब्ध करून देण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. जिल्ह्यातील १,५५७ शासकीय व अनुदानित शाळांमध्ये इयत्ता पहिली ते आठवीपर्यंत शिक्षण घेणाऱ्या १ लाख १ हजार ३३१ विद्यार्थ्यांना मोफत गणवेश योजनेचा लाभ दिला जातो. शासनाने पहिल्या टप्प्यात प्रति गणवेश २४० रुपये या प्रमाणे २ कोटी ४३ लाख १९ हजार ४४० रुपये निधी मंजूर करून तालुकास्तरावर वितरित केला होता. मात्र या रकमेवरही अनेक पालकांना स्वतःच्या खिशातून अतिरिक्त खर्च करून विद्यार्थ्यांचा गणवेश शिवून घ्यावा लागल्याची माहिती समोर आली आहे. शासनाच्या नियमानुसार प्रत्येक पात्र विद्यार्थ्याला दरवर्षी दोन गणवेशांसाठी एकूण ६०० रुपयांचे अनुदान मिळणे अपेक्षित आहे. यामध्ये एक नियमित शालेय गणवेश आणि दुसरा स्काऊट-गाईड गणवेशाचा समावेश असतो. या योजनेचा लाभ सर्व मुली, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, बीपीएल, ओबीसी तसेच सर्वसाधारण प्रवर्गातील पात्र विद्यार्थ्यांना दिला जातो.दुसऱ्या गणवेशाचा निधी, समग्र शिक्षा अभियानाचा निधी आणि सादिल रक्कम तातडीने शाळांना उपलब्ध करून देण्यात यावी, अशी मागणी मुख्याध्यापक, शिक्षक आणि शाळा व्यवस्थापन समित्यांकडून करण्यात येत आहे.

# प्रा.डॉ.इशांत राजगुरे यांचा समाजभूषण पुरस्काराने गौरव

**अमरावती/का.प्र.**

महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभा, अमरावती व जिल्हा तैलिक समिती, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने अभियंता भवन, अमरावती येथे आयोजित 'गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व समाजभूषण पुरस्कार वितरण सोहळा' उत्साहात पार पडला. या सोहळ्यात शैक्षणिक, सामाजिक व औद्योगिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल प्रा. डॉ. इशांत गजानन राजगुरे यांना महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभेचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा माजी खा.रामदासजी तडस यांच्या हस्ते, माजी खा.नवनीत राणा यांच्या उपस्थित प्रतिष्ठेचा 'समाजभूषण पुरस्कार' प्रदान करून गौरविण्यात आले.

या कार्यक्रमात प्रा. डॉ. राजगुरे यांनी जीवनाची यशोगाथा : शैक्षणिक दृष्टिकोन व सामाजिक समतोल' या विषयावर विद्यार्थी, पालक आणि युवकांना प्रेरणादायी मार्गदर्शन व करिअर कौन्सिलिंग केले. त्यांच्या व्याख्यानाला उपस्थितांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.मूळचे अकोला जिल्ह्यातील पातूर-नंदापूर येथील असलेले राजगुरे कुटुंब शिक्षणाच्या निमित्ताने लहानपणापासून अमरावतीत स्थायिक झाले. प्रा. डॉ. इशांत राजगुरे यांनी KG ते PG पर्यंतचे संपूर्ण शिक्षण अमरावतीत पूर्ण केले. त्यानंतर राजस्थान येथील युनिव्हर्सिटी ऑफ टेक्नॉलॉजी, जयपूर येथून पीएच.डी. संपादन



केली.इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकी शाखेत पॉलिटेक्निक, बी.ई.,एम.ई. आणि पीएच.डी. पूर्ण केल्यानंतर यावर्षी एमबीए (बिझनेस ॲनालिटिक्स) मध्ये संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत प्रथम मेरिट मिळवून त्यांनी आणखी एक मानाचा टप्पा गाठला आहे.

सौर ऊर्जा क्षेत्रात हजारो उद्योजकांना तांत्रिक प्रशिक्षण देऊन आत्मनिर्भर बनविण्याचे कार्यही ते सातत्याने करीत आहेत. Sunsathi Solar Inverter Manufacturing Company ने त्यांच्या कार्याची दखल घेत टेक्निकल ॲडव्हायझर म्हणून सन्मानित केले असून ते सोलार इंडस्ट्रीतील मास्टर ट्रेनर म्हणूनही ओळखले जातात.

प्रा. डॉ. राजगुरे हे महाराष्ट्र शासनाचे प्रमाणित इलेक्ट्रिकल सुपरवायझर असून त्यांच्या संशोधन कार्याला विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर गौरव प्राप्त झाला आहे. Power Line Communication प्रकल्पासाठी तीन राष्ट्रीय पुरस्कार, Teachers Enlightenment Award-२०२५, SMART International Conference Best Paper Presentation Award-२०२४, ३०हून अधिक कौशल्यविकास प्रमाणपत्रे, ११ राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संशोधन प्रकाशने आणि ३ कॉपीराइट त्यांच्या नावावर आहेत.त्यांच्या व्यापक कार्याची दखल घेत महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभेने त्यांच्यावर अमरावती विभागीय मंडळाचे प्रमुख प्रवक्ते व संपर्कप्रमुख ही महत्त्वाची जबाबदारी सोपविली आहे.

या कार्यक्रमाला समाजभूषण शंकरराव हिंगासपुरे,स्वाती गुल्हाने नगराध्यक्ष, आर्वी,प्रतीक्षा गुल्हाने नगराध्यक्ष, मोर्शी,प्रा. विजय ढोले, विदर्भ अध्यक्ष,महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभा,नगरसेवक संजय शिरभाते,प्रीती रेणवे,दीपक साहू, संजय हिंगासपुरे,महाराष्ट्र प्रांतिक तैलिक समिती अमरावतीचे पदाधिकारी चंद्रशेखर जावरे,अतुल मांडवे, डॉ. विजय गुल्हाने, राजस गुलवाडे, प्रवीण गुल्हाने, दीपक गीरोळकर,किशोर शिरभाते, मोनिका उमक,विनोद अजमिरे,संजय जावरे ,शंकर श्रीराव,प्रकाश गुल्हाने, दिगंबर गुल्हाने राजेश शिरभाते, आदी मान्यवर उपस्थित होते.

# आ.प्रा.संजय भेंडे यांचा सहकार क्षेत्राकडून सत्कार सोहळा

**अमरावती/वार्ताहर**

महाराष्ट्र राज्य सहकारी बँक असोसिएशन लि. मुंबई, अमरावती विभागीय अर्बन बँक असोसिएशन लि. अमरावती आणि जिल्हा नागरी सहकारी बँक असोसिएशन लि. अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने येथील हॉटेल गौरी इन येथे सहकारी बँकांची विभागीय सभा उत्साहात पार पडली. यावेळी विधानपरिषदेचे नवनिर्वाचित आमदार तथा नागपूर नागरिक सहकारी बँकेचे अध्यक्ष प्रा. संजय भेंडे यांचा तसेच महाराष्ट्र राज्य सहकारी बँक असोसिएशनच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अमरावती विभागीय अर्बन बँक असोसिएशनचे अध्यक्ष इंजी. अरविंद गावंडे होते. व्यासपीठावर





महाराष्ट्र राज्य सहकारी बँक असोसिएशनचे उपाध्यक्ष प्रा. डॉ. दिगंबर दुर्गाडे, अमरावती जिल्हा नागरी सहकारी बँक असोसिएशनचे अध्यक्ष राजेंद्र महल्ले, तज्ज्ञ संचालक डॉ. विनायक तराळे, भारती विद्यापीठाचे संचालक डॉ. अजित मोरे, सीए भाऊसाहेब कड, माजी अध्यक्ष महाराष्ट्र राज्य सहकारी बँक असोसिएशन तसेच वसंतराव घुईखेडकर यांची प्रमुख उपस्थिती होती. सभेला अमरावती विभागातील विविध सहकारी बँकांचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, संचालक, मुख्य कार्यकारी अधिकारी आणि पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी जिजाऊ बँकेचे अध्यक्ष बबनराव आवारे यांचाही सत्कार करण्यात आला.

प्रास्ताविकानंतर प्रा. डॉ. दिगंबर दुर्गाडे यांनी सहकारी बँकांसमोरील आव्हाने, भविष्यातील दिशा आणि टीमवर्कचे महत्त्व यावर सखोल मार्गदर्शन केले.यानंतर iDigi Technology Pvt. Ltd. चे संचालक प्रवीण वानखेडे यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता (ंघ) चा सहकारी बँकांच्या दैनंदिन कामकाजात प्रभावी वापर कसा करता येईल, याचे प्रात्यक्षिक सादर केले.

डॉ. अजित मोरे यांनी भारती विद्यापीठ आणि महाराष्ट्र राज्य सहकारी बँक असोसिएशनच्या संयुक्त विद्यमाने सुरू करण्यात आलेल्या विविध शैक्षणिक अभ्यासक्रमांची माहिती दिली. तर डॉ. विनायक तराळे यांनी केंद्र सरकारच्या नव्या सहकार धोरणावर प्रकाश टाकत प्रत्येक बँकेने त्यावर सविस्तर चर्चा करून सूचना व अभिप्राय नोंदवावेत, असे आवाहन केले.

सत्काराला उत्तर देताना आ.प्रा.संजय भेंडे यांनी सहकार क्षेत्रातील आपल्या ३० ते ३५ वर्षांच्या प्रवासाचा उल्लेख करत सहकारी बँकांसमोरील बदलत्या परिस्थितीचा आढावा घेतला. RBI च्या नव्या धोरणांचा उल्लेख करत त्यांनी अनुभवी संचालकांनी नव्या पिढीला नेतृत्वाची संधी देण्याची गरज व्यक्त केली.

अध्यक्षीय समारोपात इंजी. अरविंद गावंडे यांनी RBI च्या नव्या दिशानिर्देशांचा गांभीर्याने अभ्यास करण्याचे आवाहन केले. लवकरच सर्व अर्बन सहकारी बँकांसाठी एकसमान पोटनियम लागू होण्याची शक्यता असल्याने त्याबाबत सर्व बँकांनी एकत्रित भूमिका मांडावी, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रभावी संचालन जिजाऊ बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी हरीश नसीरकर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी अमरावती विभागीय सहकारी बँक असोसिएशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी शरद भोकसे तसेच महाराष्ट्र राज्य सहकारी बँक असोसिएशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी विरसेन गुरव यांनी विशेष परिश्रम घेतले. स्वादिष्ट भोजनानंतर कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# तलवार तुझ्या गाण्यांची बिजलीसम तळपत राहो...!

## 'आशा सुमनांजली'ने अमरावतीकरांना घडवली गाण्यांची सुरेल सफर

**अमरावती/का.प्र.**

व्हर्सटाईल गायिका आशा भोसले आणि 'प्रतिलता' असा उल्लेख केला जाणाऱ्या सुमन कल्याणपूर यांच्या अवीट गोडीच्या गाण्यांनी सजलेल्या 'आशा- सुमनांजली' या कार्यक्रमाचे संस्कार भारती अमरावती महानगरच्या वतीने या सुरेल कार्यक्रमाचे आयोजन संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवना करण्यात आले होते.

कार्यक्रमाची सुरवात महानगरपालिका विरोधी पक्षनेते विलास इंगोले, सभागृह नेते चेतन गावंडे आणि स्थायी समिती सभापती अविनाश मार्डीकर यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली. सभागृहाच्या कॅफेट एरियात संध्या देवळे, स्वप्नील जोशी, विदुला जोशी, शीतल पटेरिया, शर्वरी धनोकर, अपूर्वा उमप यांनी साकारलेली आशाबाई आणि सुमनताई यांची रांगोळी लक्षवेधी ठरली.'साधयती संस्कार भारती भारते नव जीवनम' या संस्कार भारतीच्या ध्येय गीताने कार्यक्रमा प्रा. डॉ. जयश्री वैष्णव, आशुतोष देशपांडे, प्रा. डॉ. सोनाली





शिलेदार, शीतल भट, केतकी मोहदरकर-देशपांडे, शुभम पांडे, आदित्य खारोकार, कोमल ढोके, श्रावणी भडके आणि अंबिका ठाकरे- बडनखे यांनी आपल्या प्रभावी गायकीचे रंग भरत रसिकांना सुरिली सफर घडविली. आशा भोसले यांनी गाऊन अजरामर केलेली जय शारदे वागीश्वरी, गोरी गोरी पान, मागे उभा मंगेश चांदण्यात फिरताना, घनरानी, आला आला वारा, आज कुणीतरी यावे, तरुण आहे रात्र अजुनी, चंद्र आहे साक्षीला, तुमसे मिलकर, छोड दो आंचल, हाल कैसा है जनाब का, दीवाना हुवा बादल, इशारो इशारो मे दिल देनेवाले तनहा तनहा यहां पे जीना अशी बहारदार गाणी तर केतकीच्या बनी तिथे, जिथे सागरा, आजकल तेरे मेरे प्यार के चर्चे आणि अजहु न आये बालमा अशी सुमन कल्याणपूर यांनी गायलेली रसिकप्रिय गाणी अमरावतीच्या नव्या जुन्या गायकांनी हुकुमी सादर करून दमदार दाद मिळवली. निवेदनाची बाजू रसिका वैष्णव, रसिका वडवेकर- वानखडे आणि नितीन भट यांनी समर्थपणे सांभाळत कार्यक्रमाची रंगत वाढवत नेली. सिंथसायझरवर सचिन गुढे, तबल्यावर ॲड. मिलिंद वैष्णव आणि शीतल मांडवगडे, ऑक्टोपॅडवर राजदीप चावरे, गिटारवर दिनेश कांबळे, ढोलक आणि कोंगोवर योगेश गजभिये, बासरीवर अरविंद उपाध्ये तर व्हायोलिनवर हरीश लांडगे यांनी दमदार संगत केली. कार्यक्रमाच्या अखेरीस 'अभी न जाओ छोडकर' या गीतात मध्ये मध्ये सुरेश भट यांच्या आशाबाईंवरील कवितेच्या सादरीकरणाने कार्यक्रमाला उंची बहाल केली.रफिकभाई यांच्या उत्कृष्ट ध्वनीव्यवस्था आणि प्रकाशयोजनेने कार्यक्रमाच्या देखणेपणात भर घातली. संस्कार भारतीच्या पदाधिकाऱ्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले. गायक मंडळी गात असलेली गाणी रंगमंचावरील डिजिटल स्क्रीनवर दाखवून ॲड. श्रेयस वैष्णव यांनी रसिकांच्या डोळ्यांपुढे गतकाळाच्या स्मृती जाग्या केल्या. कार्यक्रमाला संस्कार भारतीचे विदर्भ प्रांत महामंत्री विवेक कवठेकर, अमरावती महानगरचे अध्यक्ष दीपक जोशी, मुरलीधर भोंडे, सूरमणी डॉ. कमर्ला भोंडे, प्राचार्या डॉ. मीनल ठाकरे, डॉ. अलकनंदा तुळजापूकर, गज़लगायक सुरेश दंडे यांच्यासह अमरावती शहरातील विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळी रसिक म्हणून मोठ्या संख्येने उपस्थित होती.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय


# ४८ कोटींचा दंड प्रलंबित ठेवून 'चांडक' मालामाल

## -अकोट एसडीओ अन् तहसीलदारांकडून हायकोर्टाच्या आदेशाची अवमानना ?

### -आदिवासींच्या जमिनींवर उभारले क्रशर-डांबर प्लांट उद्योगांचे साम्राज्य

### -जिल्हाधिकाऱ्यांची दिशाभूल करत अकोट महसूल प्रशासनाची करोडोंची वसुली 'मॅनेज'?

**ॲड. समीर ठाकूर**

**अकोला** : शासकीय तिजोरीवर तब्बल ४८ कोटी रुपयांचा भार टाकून अवैध उत्खनन करणाऱ्या मे. साई स्टोन क्रशरचे मालक संतोष चांडक आणि अकोटचे महसूल अधिकारी यांच्यातील अनाधिकृत साठे गाठ 'जनमाध्यम'च्या हाती आलेल्या आधिकृत पुराव्यांनी चव्हाट्यावर आणली आहे. बॉम्बे उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिलेले कडक आदेश पायाखाली तुडवून अकोटचे




उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदार हे या बड्या दंडग्रस्तावर 'करोडोंची महेरबानी' करत आहेत. हायकोर्टाचा कोणताही 'स्टे' नसताना थकीत ४८ कोटींची शासकीय वसुली गती मंदावत थकबाकीदाराला रोज लाखो रुपयांची कमाई करण्याची खुली सूट महसूल प्रशासनाने नेमकी किती रुपयांमध्ये 'मॅनेज' केली, असा संतप्त सवाल आता अकोट तालुक्यात विचारला जात आहे.

अकोट तहसीलदारांच्या ३०/०१/२०२४ रोजीच्या आदेशाविरुद्ध दंडग्रस्त संतोष चांडक व विलास चिमोटे यांनी हायकोर्टात धाव घेतली होती. यावर ९ ऑक्टोबर २०२५ रोजी न्यायमूर्ती सिद्धेश्वर एस. थोंबरे यांनी याचिका निकालात काढताना कडक कायदेशीर कालमर्यादा आखली होती. परंतु, अकोटच्या अधिकाऱ्यांनी या आदेशाची अंमलबजावणी न करत एकप्रकारे थट्टाच लावली आहे. यामध्ये सर्वात पहिला मुद्दा म्हणजे ☞(पान २ वर)

### ■ जिल्हाधिकाऱ्यांच्या डोळ्यात धूळफेक; एसडीओ यांचे 'ते' पत्र उघड!

'जनमाध्यम'ने या ४८ कोटींच्या दंड घोटाळ्याबाबत सातत्याने बातम्यांची मालिका प्रकाशित केल्यावर अकोला जिल्हाधिकाऱ्यांच्या खनिकर्म विभागाने एसडीओ अकोट यांना कडक पत्र लिहून सद्यस्थितीचा अहवाल मागवला होता. त्यावर ६ जुलै २०२६ रोजी जिल्हाधिकाऱ्यांना पाठवलेल्या पत्रात एसडीओ अकोट यांनी अत्यंत चलाखीने उत्तर दिले की, 'प्रकरण न्यायप्रविष्ठ असून अपिलार्थींचे म्हणणे ऐकून आदेश पारित करण्याची तजवीज ठेवली आहे.' मात्र, हायकोर्टाने दिलेली ८ आठवड्यांची मुदत मे महिन्यातच संपली असून आपण स्वतः न्यायालयाचा अवमान करत दंडग्रस्ताला पाठीशी घालत आहोत, ही खरी गोम एसडीओ यांनी जिल्हाधिकाऱ्यांपासून जाणीवपूर्वक दडवून ठेवली आणि जिल्हाधिकाऱ्यांच्या डोळ्यात सरळ-सरळ धूळ फेकली!

### करोडोंची शासकीय देयके गोठवण्यास तहसीलदारांची टाळाटाळ ?


दुसरीकडे, अकोट तहसीलदारांचा 'सिलेक्टिव्ह मोड' कमालीचा संशयास्पद ठरला आहे. सुरुवातीला चांडक यांची मालमत्ताच सापडत नसल्याचा बनाव तहसीलदारांनी रचला. 'जनमाध्यम'ने मालमत्तांची यादी छापताच तहसीलदारांनी काही किरकोळ मालमत्तांवर बोजा चढवला, परंतु मुख्य मौल्यवान मालमत्ता मोकळ्याच ठेवल्या होत्या जेणेकरून चांडक त्या विकून पळून जाऊ शकतील, मात्र वारंवार प्रकाशित होणाऱ्या वास्तववादी बातम्यांमुळे तहसीलदार यांची डोकेदुखी वाढली अन् नाईलाजाने तहसीलदार यांनी उर्वरित मालमत्ता यांच्यावर बोजा चढविला. थकबाकीदार संतोष चांडक हा मोठा शासकीय कंत्राटदार असून प्रधानमंत्री ग्राम सडक योजना, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि जागतिक बँक प्रकल्प 'नाबार्ड' या विभागांमध्ये त्याची कोट्यवधी रुपयांची देयके आणि सुरक्षा ठेव प्रलंबित आहेत. महसूल कायद्याच्या कलम १८१ नुसार तहसीलदार हे एका पत्राद्वारे ही सर्व देयके तात्काळ गोठवू शकत होते आणि ४८ कोटींची वसुली करू शकत होते. परंतु, चांडक यांची आर्थिक कोंडी न करता त्यांना शासकीय तिजोरीतून पैशांची उचल करण्याची अप्रत्यक्ष मुभा देऊन तहसीलदारांनी स्वतःवरच प्रशासकीय कसुरी केल्याचा ठपका लावून घेतला आहे.

# अर्जुन नगर परिसरात कारमध्ये आढळला मृतदेह

**३-४ दिवसांपासून होता बेपत्ता**

**अमरावती/प्रतिनिधीः-**

राजापेठ पोलीस ठाणे हद्दीतील बूटी प्लॉट परिसरात राहणाऱ्या एका प्रॉपर्टी ब्रोकरच्या ३७ वर्षीय मुलाचा मृतदेह आज सोमवार ३ ऑगस्ट सकाळी बंद कारमध्ये अर्जुन नगर परिसरात आढळून आल्याने एकच खळबळ उडाली.विरल सुनील जसापारा (वय ३७, बुटी प्लॉट) असे मृतक तरुणाचे नाव आहे. विरल हे गेल्या ३-४ दिवसांपासून घरातून बेपत्ता होते. कुटुंबीयांनी त्याचा शोध घेतला होता. पण तो नाही मिळाला. शेवटी त्याचा मृतदेह आढळला. माहिती नुसार सोमवारी सकाळी १० वाजता सुमारास अर्जुन नगर





परिसरात एमएच-२० बीवाय २३२८ क्रमांकाची कार बंद अवस्थेत उभी असल्याचे नागरिकांच्या निदर्शनास आले. कारच्या आत एका तरुणाचा मृतदेह दिसताच नागरिकांनी तात्काळ गाडगे नगर पोलिसांना माहिती दिली. माहिती मिळतात गाडगे नगर पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले. कारचे दरवाजे आतून लॉक होते. पोलिसांनी कसेतरी दरवाजा उघडून आत पाहणी केली असता विरलचा मृतदेह आढळला. कारमध्ये दारू आणि बिसलरीच्या पाण्याच्या बाटल्या मोठ्या प्रमाणात होत्या.विरलला दारूचे व्यसन होते. त्याने कार मध्येच बसून जास्त प्रमाणात दारू सेवन ☞(पान २ वर)

# पालकमंत्र्यांची दखल, जिल्हाधिकाऱ्यांना चौकशीचे आदेश

### -सोंदळी-हिरापूर स्मशानभूमी प्रश्न मार्गी लागणार

**खल्लार/प्रतिनिधीः-**

सोंदळी-हिरापूर येथील श्मशानभूमीच्या प्रश्नावर दै. जनमाध्यमने दि. ३१ऑगस्ट रोजी प्रकाशित केलेल्या 'अंत्यसंस्कारासाठी गाठावे लागले दुसरे गाव' या वृत्ताची अखेर दखल घेण्यात आली असून, या पाठपुराव्याला यश मिळाले आहे. पालकमंत्र्यांच्या निर्देशानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी तातडीने चौकशीचे आदेश दिले. त्यानुसार तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, दर्यापूर यांनी संयुक्त पाहणी करून सविस्तर अहवाल जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर केला आहे.

३१ जुलै रोजी तहसिलदारांनी सादर केलेल्या अहवालात मंडळ अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी




व ग्रामसेवक यांच्या संयुक्त पाहणीत गट क्रमांक १३ मधिल १.१६ हेक्टर जागा स्मशानभूमीसाठी सर्वाधिक योग्य असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. सदर जागा गावालगत असून नागरिकांच्या दृष्टीने सोयीची असल्याचेही अहवालात नमूद करण्यात आले आहे.

पर्यायी म्हणून सुचविण्यात आलेला गट क्रमांक ५३ हा गावापासून सुमारे २.५ ते ३ किलोमीटर अंतरावर असून तेथे जाण्यासाठी रस्त्याची सुविधा उपलब्ध नसल्याचे पाहणीत आढळून आले. त्यामुळे गट क्रमांक १३ मधिल जागेवरच स्मशानभूमी विकसित करण्याची शिफारस करण्यात आली आहे.

अहवालात स्मशानभूमीसाठी आवश्यक रस्ता, कंपाऊंड वॉल आणि इतर मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक प्रशासकीय निर्णय घेण्याची विनंतीही करण्यात आली आहे.

दै. जनमाध्यमने मांडलेल्या या जनहिताच्या प्रश्नाची पालकमंत्र्यांनी गंभीर दखल घेतल्याने प्रशासनाला तातडीने हालचाल करावी लागली. त्यामुळे अनेक वर्षांपासून रखडलेल्या स्मशानभूमीच्या प्रश्नाला आता न्याय मिळण्याची आशा ग्रामस्थांमध्ये निर्माण झाली आहे.

# ८३ माकडे पकडली, प्रदीप वडतकर यांच्या पाठपुराव्याला यश

### येवदा येथे वन विभागाची कारवाई

**खल्लार/प्रतिनिधीः-**

येवदा गावात गेल्या काही दिवसांपासून माकडांचा वाढता वावर आणि त्यापासून ग्रामस्थांना होणारा त्रास लक्षात घेता वन विभागातर्फे माकडे पकडण्याची विशेष मोहीम हाती घेण्यात आली आहे. शिवसेना शिंदे गटाचे प्रदीप वडतकर यांनी अमरावती येथिल वन विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे ही मोहीम यशस्वीरीत्या सुरू झाली



आहे. वन विभागाच्या पथकाने आज (दि.३) गावात धडक मोहीम राबवत बसस्थानक परिसर, शास्त्रीनगर आणि आंबेडकर नगर या भागांतून तब्बल ८३ माकडे पकडून त्यांना सुरक्षित स्थळी हलविले आहे.

या मोहिमेत वन विभागाचे संजय इंगोले, समाधान गिरी, जयप्रकाश धनदर, खंदारे व इतर कर्मचाऱ्यांनी सक्रिय सहभाग घेतला. गावात उर्वरित असलेल्या माकडांचा बंदोबस्त करण्यासाठी वन विभागाचा☞(पान २ वर)

# महिनाभरात ८७.५५ लाखांचा दंड

### अमरावती ग्रामीण पोलिसांची विशेष वाहतूक मोहीम

**अमरावती/प्रतिनिधीः-**

जिल्ह्यातील वाढत्या रस्ते अपघातांना आळा घालण्यासाठी अमरावती ग्रामीण पोलिसांनी जुलै महिनाभर राबविलेल्या विशेष वाहतूक अंमलबजावणी मोहिमेत वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर मोठ्या प्रमाणात कारवाई केली. अवघ्या एका महिन्यात १७ हजार ५४५ वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली असून तब्बल ८७ लाख ५५ हजार रुपयांचा दंड आकारण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांच्या संकल्पनेतून आणि अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली १ ते ३१ जुलैदरम्यान जिल्हा वाहतूक शाखा, अचलपूर वाहतूक शाखा तसेच ग्रामीण हद्दीतील ३१ पोलीस ठाण्यांनी संयुक्तपणे ही मोहीम राबविली. या काळात हेल्मेट न वापरणाऱ्या ४,८११, सीटबेल्ट न लावणाऱ्या ४३३, वाहन चालविताना ☞(पान २ वर)

# पोलिस कस्टडीतील युवकाचा ट्रेनमधून पडून मृत्यू

**अमरावती/प्रतिनिधीः-**

नागपुरहून बेपत्ता झालेल्या २९ वर्षीय युवकाचा मृतदेह बडनेरा पोलीस ठाणे हद्दीतील टिमटाळा-मालखेड रेल्वे डाउन लाईनजवळ संशयास्पद परिस्थितीत आढळला. यामुळे खळबळ उडाली आहे. मृत युवकाचे नाव सौरभ गणवीर आहे. तो नागपुरातील बस स्टँड जवळील रूपाभूई नगर क्रमांक-२ येथील रहिवासी होता. माहिती नुसार शनिवारी १ ऑगस्ट रोजी सौरभ अचानक घरातून निघून गेला होता. कुटुंबीयांनी प्रतापनगर पोलीस



ठाण्यात बेपत्ता झाल्याची तक्रार दिली होती.तो अकोल्याला पोहोचला होता. तेथे रेल्वे पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. चौकशी दरम्यान त्याची ओळख पटली. अकोला रेल्वे पोलिसांनी नागपुर पोलिसांशी संपर्क साधून सौरभला नागपुरला नेण्यासाठी कस्टडी दिली. त्याला अकोला वरून घेऊन पोलीस भुसावळ- निजामुद्दीन गोंडवाना एक्सप्रेसने नागपुरकडे निघाले होते. बडनेरा स्टेशन पार करताच सौरभ शौचालयात जाण्यासाठी उठला. तो परत आलाच नाही. बडनेरा स्टेशनवर पोलीस कर्मचाऱ्यांनी शोध घेतला असता तो ट्रेनमध्ये आढळला नाही.याची माहिती रेल्वे पोलिसांना दिली. पोलिसांनी त्याचा शोध सुरू केला. ☞(पान २ वर)

# बापट चौक हत्याकांडाचा काही तासांत उलगडा

### तिन्ही आरोपी पोलिसांच्या ताब्यात





**अमरावती/प्रतिनिधीः-**

शहरातील बापट चौक येथे रविवारी मध्यरात्री घडलेल्या खूनप्रकरणाचा अमरावती शहर गुन्हे शाखा आणि सिटी कोतवाली पोलिसांनी अवघ्या काही तासांत छडा लावत तिन्ही आरोपींना ताब्यात घेतले. शहरातून पळून जाण्याच्या तयारीत असतानाच पोलिसांनी सापळा रचून ही धडक कारवाई केली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २ ऑगस्ट रोजी रात्री साडेअकराच्या सुमारास बापट चौक परिसरात तिघा हल्लेखोरांनी संगनमत करून शरीफ बेग रशीद बेग (वय ३१, रा. लालखडी, वॉटर सप्लायजवळ) याच्यावर धारदार शस्त्राने सपासप वार केले. त्यानंतर लाथाबुक्क्यांनीही बेदम मारहाण करण्यात आली. गंभीर जखमी झालेल्या शरीफ बेग यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला.

या प्रकरणी मृताचा भाऊ अहमद बेग रशीद बेग यांच्या तक्रारीवरून सिटी कोतवाली पोलिस ठाण्यात बीएनएस कलम १०३(१) व ३(५) अन्वये खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला. घटनेची माहिती मिळताच गुन्हे शाखा☞(पान २ वर)

# महिला मुक्ती मोर्चाची जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक

**अमरावती/प्रतिनिधीः-**

अंजनगाव बारी येथील बजरंग नगर मध्ये गेल्या १५ वर्षांपासून राहणाऱ्या कुटुंबांनी त्याच जागेवर कायमस्वरूपी निवासाचा अधिकार मिळावा अशी मागणी करत भारतीय महिला मोर्चा पार्टीच्या नेतृत्वाखाली आज सोमवार ३ ऑगस्ट रोजी नागरिकांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक दिली. जिलाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, बजरंग नगरमध्ये राहणारे कुटुंबीय गेल्या १५ वर्षांपासून एकाच जागेवर वास्तव्यास आहेत. ग्राम पंचायत अंजनगाव बारीने त्यांना हाऊस टॅक्सची पावती देखील दिली आहे.



याशिवाय शासनाच्या विविध योजनाखाली वीज आणि इतर मुलभूत सुविधा त्यांना मिळत आहेत.अनेकांचे नाव सरकारी घरकुल योजनेच्या लाभार्थी यादीतही आहे. त्यांनी मेहनतीने त्याच जागेवर पक्के घर बांधले आहे.निवेदनात आरोप करण्यात आला आहे की ,ग्रामपंचायतीतील काही अधिकाऱ्यांनी मोकळ्या जागेवर घरकुल योजनेचा प्रस्ताव पाठवला आहे. तसेच रहिवाशांना सध्याची जागा रिकामी करून दुसरीकडे स्थलांतरित करण्याचा दबाव टाकला जात आहे.शासकीय सुविधा आणि सामाजिक परिस्थिती येथे स्थिर झाल्याने त्यांना दुसरीकडे जाऊन नव्याने घर बांधणे शक्य नाही. तसेच आर्थिकदृष्ट्या ते कमकुवत आहेत.त्यांच्या प्रदीर्घ वास्तव्य, उपलब्ध शासकीय सुविधा आणि सामाजिक परिस्थिती लक्षात घेऊन त्यांना त्याच जागेवर कायमस्वरूपी बसवण्यात यावे. तसेच सरकारी घरकुल योजनेचा लाभही त्यांना देण्यात यावा अशी मागणी ☞(पान २ वर)

# मनुष्यबळ कंत्राटावरून नेकॉफला सुप्रीम कोर्टाचा झटका

### 'यथास्थिती' कायम ठेवण्याचे न्यायालयाचे आदेश

**अमरावती/प्रतिनिधीः-**

अमरावती महानगरपालिकेतील मनुष्यबळ कंत्राट प्रकरणात सोमवारी मोठा ट्विस्ट आला आहे.या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने 'यथास्थिती' कायम ठेवण्याचे आदेश दिले आहेत.यामुळे आता मनपाला नवीन कंत्राट देण्याची प्रक्रिया थांबवावी लागणार आहे.

मनपातील जुने मनुष्यबळ कंत्राट संपल्याने नवीन कंत्राटाची



निविदा प्रक्रिया सुरू करण्यात आली होती. मात्र निविदेच्या नियमांकडे दुर्लक्ष करून संबंधित कंपनीला कंत्राट दिल्याचा आरोप करत प्रतिस्पर्धी एस्कॉर्ट कंपनीने न्यायालयात याचिका दाखल केली होती. या प्रकरणात या पूर्वी जिल्हा न्यायालय आणि उच्च न्यायालयाने नेकॉफ कंपनीच्या बाजूने निकाल दिला होता. त्यामुळे एस्कॉर्ट कंपनीने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती.शुक्रवारी या प्रकरणावर सुनावणी होणार होती. मात्र सुनावणी न झाल्याने आज सोमवार ३ ऑगस्ट रोजी सुनावणी निश्चित झाली. दोन्ही ☞(पान २ वर)

# प्रधानमंत्री पिक विमा योजनेला १० ऑगस्टपर्यंत मुदतवाढ

### कृषी विभागाचे शेतकऱ्यांना तातडीने अर्ज करण्याचे आवाहन

अमरावती/प्रतिनिधीः-

नैसर्गिक आपत्तीमुळे पिकांचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना आर्थिक आधार मिळावा, यासाठी कृषी विभागामार्फत 'प्रधानमंत्री पिक विमा योजना' राबवण्यात येत आहे. खरीप हंगाम सन २०२६ साठी या योजनेतील सहभागास सुरुवात झाली असून आजअखेर ८३ हजार ६०५ शेतकऱ्यांनी आपला सहभाग नोंदवला आहे.

यापूर्वी पीक विमा काढण्याची अंतिम तारीख ३१ जुलै २०२६ ही निश्चित करण्यात आली होती. मात्र, केंद्र शासनाने १ ते १० ऑगस्ट २०२६ या कालावधीसाठी १० दिवसांची मुदतवाढ दिली आहे. जिल्ह्यात सध्या पीक विमा नोंदणी वेगाने होत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी पिकांचा विमा काढून या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन कृषी विभागाने ☞(पान २ वर)

# अवैध खताची वाहतूक करणाऱ्या दोघांविरुद्ध गुन्हा दाखल

**अमरावती/प्रतिनिधीः-**

जिल्ह्यातील नांदगाव खंडेश्वर पोलीस ठाणे हद्दीत संशयास्पद रासायनिक खताची अवैध वाहतूक करणाऱ्या कारला पोलिसांनी पकडले आहे. कृषी विभागाच्या तक्रारीवरून पोलिसांनी ही कारवाई केली. टोयोटो कार सह दोघांना ताब्यात घेतले. माहितीनुसार बस स्टँडवर नियमित नाकाबंदी दरम्यान एम एच -२७/बीजे ९४६८ क्रमांकाची टोयोटा कार पोलिसांनी थांबवली.तपासणी दरम्यान कारमध्ये विविध प्रकारची रासायनिक खते आणि शेती



विषयक साहित्य आढळले. पॅकिंगवर उत्पादकाचे नाव, बॅच नंबर, उत्पादन तारीख आणि दर्जाबाबत कोणतीही माहिती नसल्याने हे खत संशयास्पद असल्याचे दिसून आले.पोलिसांनी तात्काळ कृषी विभागाला माहिती दिली. तहसील कृषी अधिकारी संजय नारायणराव पाटील (वय ५२ ) यांनी इ(पान २ वर)